नं. 23

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

भू. प्रवास

संग्रहालय क्रमांक

66

लेखक गौरीशंकरशास्त्री बिन ज्ञानेश्वरशास्त्री

सन १८८७

पुस्तकाचें नांव यात्राकल्पलता

23

सं. क्र.

# यात्राकल्पकता

भू प्रवास

मू ५२

# यात्राकल्पलता.

श्रीमंत राजमान्य राजश्री अण्णा साहेब
विंचूरकर यांनीं दक्षिण व उत्तर कानडा
प्रदेशांतील तीर्थ यात्रा केल्या त्यांचा

इतिहास

AGRICULTURAL HO...
NAGPUR

हा ग्रंथ

चांगल्या माहितीच्या आधारानें.
गौरीशंकर शास्त्री बिन्नअनंतशास्त्री
निसबत विंचूर संस्थान
यांनीं तयार करून

पुणें येथें.

पुणेंवैभव छापखान्यांत छापविला.

ज्यानेवारी सन १८८४ इसवी.

(सन १८६७च्या २५ व्या आक्टाप्रमाणें हा
ग्रंथ राजिष्टर केला आहे.)
( या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आप-
लेकडे ठेविले आहेत. )

मू ४२

श्री

# समर्पणपत्र.

श्रीमंत राजमान्य राजेश्री रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णा साहेब विंचूरकर फर्स्ट क्लास सरदार राजे उमदे तुलमुल्क् बाहादूर कंप्यानियन् आफ् धी मोस्ट एक्झालटेट् आरडर आफ् धी स्टार आफ इंडिया विंचूर संस्थानचे मालक, यांशी

कृतानंत वेदोक्त आशीर्वाद विनंति विशेषः—मी मोठ्या परिश्रमानें आपले संनिध सतत असणारीं सुज्ञ माणसें यांजपासोन तोंडची माहिती, दप्तरांतील हिशेबाचे दाखले व स्थल विशेषांची लिहून ठेविलेली माहिती, या सर्वांच्या आधारानें सन १८८१ चे जून महिन्यापासोन सन १८८४ चे मार्च अखेर पर्यंत आपण केलेलें वर्तन, तीर्थयात्रा, आणि धर्मकृत्यें वगैरे यांचा हा ग्रंथ इतिहासरूपानें यथामति तयार केला आहे. याची लोकांत प्रसिद्धी करण्यास्तव मी आपली परवानगी मागितली ती देण्याची मेहेरबानगी केल्यानें मी सर्व प्रकारें आपला आभारी झालों आहें.

विशेष सौजन्यता, दातृत्व, मनाचा थोरपणा, संस्कृत विद्येचा अभ्यास, लोकप्रियता, देशपर्यटणाच्या योगानें प्राप्त झालेली माहितगारी, निःपक्षपात, परोपकार बुद्धी, वगैरे अनेक गुणांचा संग्रह आपले ठिकाणीं निष्कंलक प्रकाशित आहे; दुसरें आपल्या कडील उपजीविकेवर माझे पूर्वजांनीं निर्वाह केला व मी ही करीत आहें, यामुळें माझे अंतःकरणांत आपल्या विषयीं किती पूज्यबुद्धी आहे ती लिहून विशद करणें अप्रासंगिक आहे. बहुत दिव-

टीपः— १ स्पष्ट करणें २ या समयीं अयोग्य.

सांपासोन आपले धर्मसंबंधाविषयीं कांहीं ग्रंथ लिहावा अशी मला इच्छा होती; आणि विद्यमानकालीं त्या इच्छेस अवसर मिळून हेतु सिद्धीस गेला यास्तव नूतन तयार झालेला हा ग्रंथ मी आपणांस परमादरानें नजर केला आहे. याचा संतुष्ट मनानें स्वीकार करावा अशी आपल्यास विनयपूर्वक प्रार्थना आहे. बहुत काय लिहूं श्रुत होय हे अलमति लेखनेन सुज्ञतमेष्वित्याशीः सहस्र मजस्रं समुछसतु.

मुक्काम विंचूर } आपले पदरचा आश्रित
गौरीशंकर शास्त्री बिन अनंत शास्त्री.

# प्रस्तावना.

विंचूरकर यांच्या घराण्याचे मूळ पुरुष विठ्ठल शिवदेव हेच सत्किर्तीचे आणि दौलतीचे संपादक होत. या शूर व जगविख्यात पुरुषानें छत्रपति शाहूमहाराज सातारकर यांच्या व थोरले बाजीराव आणि चिमणाजी आप्पा साहेब पेशवे यांच्या कारकिर्दींत जीं जीं शूरत्वाचीं कामें करून तरवार गाजविली त्यांचें चरीत्र व त्यांच्या पुढें त्या वंशांत उत्पन्न झालेल्या मोठ्या पराक्रमी पुरुषांचीं चरित्रें विंचूर संस्थानांतील इंग्रजी दप्तराचे वरिष्ट अधिकारी हरीपंत गाडगीळ यांनीं मोठ्या परिश्रमानीं समग्र लिहिलीं आहेत. त्यांतच मूळ संपादकापासून पांचवे पिढीस रघुनाथराव अण्णा साहेब, जे हल्लीं विंचूर संस्थानचे मुख्य मालक आहेत, त्यांचें चरित्र सन १८८१ चे जून महिन्यापर्यंत ह्मणजे शके १८०३ चे जेष्ट अखेरपर्यंत लिहिलें तें थोडे दिवसांपूर्वीं छापून प्रसिद्ध झालेंच आहे. याप्रमाणेंच गणेशशास्त्री लेले त्रिंबककर यांनीं रघुनाथराव अण्णा साहेब यांच्या पूर्व वयांत ज्या उत्तर प्रदेशांतील, महाराष्ट्र आणि कर्नाटक देशांतील झालेल्या अशा अनेक तीर्थयात्रा व यांनीं केलेलीं धर्मकृत्यें आणि साधु पुरुषांचे समागम या सर्वांचें इतिहासरूपानें वर्णन लिहून "**तीर्थयात्रा प्रबंध**" अशा नावानें तो ग्रंथ छापवून प्रसिद्धीस आणिलाच आहे.

सदर्हू दोन्ही ग्रंथांत सन १८८१ सालीं रघुनाथराव यांचे पत्नीस नरसिंहपूर क्षेत्रीं देवाज्ञा झाली त्या योगानें अग्निहोत्र विच्छिन्न झालें यामुळें त्यांचें मन निरुत्साह होऊन ते नृसिंहपूर क्षेत्रीं आपले कुलस्वामीचे संनिध सदाचरणें करून वास: करीत आहेत येथेंपर्यंत इंग्लिश क्लार्क गाडगीळ व लेलेशास्त्री या उभयतांनीं रघुनाथराव यांचा इतिहास लिहिला आहे.

---

टीप:— १ उदास २ वर लिहिलेल्या सालचे जून अखेर पर्यंत.

हल्लीं तेथून पुढें सन १८८४ चे मार्च अखेर ( शके १८०६ नारायणनामसंवत्सराची चैत्र शुद्ध प्रतिपदा भृगुवासरपर्यंत ) त्या उदार पुरुषाचा इतिहास लिहिण्यास खालीं सही करणारानें आरंभ केला आहे. यांत रघुनाथराव यांनीं दक्षिण व उत्तर कानडा प्रदेशांतील केलेल्या तीर्थयात्रा शिवाय, केलेले धर्म संबंधी व्यवहार वगैरे सर्व कृत्यें इतिहास रूपानें लिहून प्रसिद्ध करीत आहें.

खालीं सही करणारा हा पिढीजाद विंचूर संस्थानांत पुराण सांगण्याचे संबंधानें आश्रित असोन विद्यमानही विंचूरचे चीफ यांचे संनिध त्याच कामावर कायम आहे. बहुत दिवसांपासून अण्णासाहेबांसारख्या सत्पुरुषाचें कांहीं चरित्र लिहून प्रसिद्ध करावें असें त्याचे मनांत वागत होतें परंतु तशी संधी त्यास मिळाली नाहीं. अनुकूल समय पाहून तसें करण्यास आरंभ करवा तर जीं साधनें इतिहास लिहिण्यास अवश्य पाहिजेत तीं त्या जपाशीं नव्हतीं यास्तव तीं संपादन करण्याचा त्यानें उद्योग चालविला. तेव्हां अण्णा साहेबांचे संनिध वागणारी मंडळी यांजपासून तोंडची माहिती त्यांस विपूल मिळाली. शिवाय तीर्थयात्रेंतील प्रवासाचे जमाखर्चसंबंधी रोजखर्डे मोठया यत्नानें मिळोल आणखी तीर्थ विशेषीं केलेल्या धर्म कृत्याचे संकल्प त्यानें पाहिले. याखेरीज तीर्थयात्रेंत स्वारीबरोबर असलेल्या मंडळीनीं क्षेत्रोपक्षेत्रींची व देशाची थोडी टिपून ठेविलेली माहिती ही मिळाली. अशाप्रकारें बरीच सामग्री संपादन केली. तथापि येवढ्यानेंच आपले इच्छेनुरूप वर लिहिलेल्या यात्रेचा इतिहास किंवा चरित्र शेवटास जाईल असें त्यास वाटेना.

याकरितां त्यानें आपले मालक रघुनाथराव अण्णा साहेब यांस आपला हेतु कळवून त्यांच्या वर्तनाचें रोजनिशी बूक ( डायरी ) त्यांजपाशी मागितलें असतां, तें त्यांनीं देण्याची मेहरबानगी केली. अशा प्रकारें अनुकूलता होतांच त्यानें चार महिन्यांत हा इतिहास तयार केला.

खालीं सही करणारा हा सांप्रतकाळीं वाचकांस अतिनम्रतेनें अशी विनंति करितो कीं—जरी मला थोडें संस्कृत समजतें तरी अशा प्रकारचा इतिहास लिहिण्याचा प्रसंग मजवर आतांच आला आहे. यामुळें ग्रंथांत पुष्कळ प्रकारचे दोष असतील यांत संशय नाहीं. कारण ज्याचे दोष त्यास कळून येत नाहींत हा साधारण नियम आहे. "नाहि सकलः सकलः" असाही एक शास्त्रीय नियम आहे. यावरून सगळ्याच गोष्टी सर्वांस कळतात असें कोणालाही कधींच ह्मणतां येणार नाहीं. सारांश त्रिभुवनांत निर्दोष व चुकत नाहीं असा एक सर्वज्ञ परमेश्वरच आहे. असें मानून या ग्रंथांत ज्या चुका अढळतील त्यांबद्दल सुज्ञ वाचकांनीं क्षमा करावी हीच विज्ञाप्ति.

गौरिशंकर शास्त्री बिन्न अनंत शास्त्री
निसबत संस्थान विंचूरकर.

# सूचना.

या इतिहासांत फारशी (पराशीयन) किंवा उर्दु असे भाषांतराचे शब्द यांचा विशेष संग्रह केला नाहीं. कोठें संस्कृत अथवा अप्रसिद्ध शब्द आले तथें खूण करून खालीं टिपेंत पर्याय शब्दांनीं त्यांचा खुलासा केला आहे. या खेरीज कोठें विशेष माहिती होण्याकरितां टिप लिहून स्पष्ट खुलासा केला आहे. तीर्थ, देवता, क्षेत्र यांच्या संबंधानें जे जे इतिहास थोडक्यांत लिहिले आहेत, ते ते त्या क्षेत्राचे माहात्म्यांतील असोन कोठें ऐकिलेली माहितीही लिहिली आहे. या शिवाय स्थलविशेषीं वाचकांचे समजुती करितां माहात्म्यांतील श्लोकही सार्थ लिहिले आहेत.

या ग्रंथांत भाग कल्पना केली आहे ती अशी कीं, रघुनाथराव यांचें अग्निहोत्र सिद्ध झाल्यापासून गोकर्णयात्रा समाप्त होईपर्यंत प्रथम भाग तेथून पुढें ग्रंथ समाप्तीपर्यंत दुसरा भाग. याप्रमाणें दोन कल्पून या समग्र ग्रंथास यात्रा कल्पलता असें नांव दिलें आहे.

पूर्वीं गणेश शास्त्री लेले यांनीं केलेल्या ग्रंथाशीं नूतन लेखाची संगति जुळावी याकरितां रघुनाथराव यांनीं अग्निहोत्र घेतल्यापासून हा इतिहास लिहिण्याला आरंभ केला आहे.

आतां शिष्टाचारास अनुसरून हा इतिहास निर्विघ्नतेनें समाप्त होण्यास्तव मंगलाचरण श्लोकरूपानें लिहून ग्रंथ लिहिण्यास आरंभ करितों.

स. क्र. ७१
AGRICULTURAL HOSTEL NAGPUR

# यात्राकल्पलता

## मंगलाचरण

### शार्दूलविक्रीडित वृत्त.

श्लोक.

कांता साध्वि उमा हिमाद्रितनया शोभे यदंकीं-
निंकी॥ गंगा ही विलसे अघांतकनदी प्रख्यात यन्म-
स्तकीं॥यद्भालीं निशिचा पती शशि वसे इंद्रादि ज्या
वंदिती॥ तो श्रीसांब गजानना तुज पिता हें वेद ही
वर्णिती ॥ १ ॥ ऐसा श्रेष्ठ पिता सुमाय गिरिजा
देवा गणेशा तुला ॥ यासाठीं नमितात सर्व तुजला,
नाहीं असें विस्तुला ॥ स्वांगेंही नत संकटांतक बरा
तूं वंद्यबा यास्तव॥ कार्यारंभ करावयास करिती आधीं
सुधी त्वत्स्तव ॥ २ ॥

### पृथ्वावृत्त.

ह्मणून तुज वंदुनी विनवितो अनंतात्मज ॥ असें वद,
खराचिहा न परकीय आहे निज ॥ नसे मग उणें
मला मजकडे कृपेनें पहा॥ तरीच रघुनाथभूपीतक-
था निवेदील हा ॥ ३ ॥

### शिखरणीवृत्त.

विधात्याची:कन्या नच कुमतिचा दे पदरजी॥ तुझी कां-
ता ती बा मम मन रमे तत्पदरजीं ॥ तिला भावें जा-
तां शरण, मतिचिंताब्धि सुकवी ॥ कृपादृष्टीनें ती
त्वरित करिते मूढ सुकवी ॥ ४ ॥

### इंद्रवज्रावृत्त.

वागीश्वरीचा मतिमंद बाल॥ऐसे वदावेत जनें न बोल॥
प्रार्थीतसे शंकरदीन दास ॥दे सन्मती या न करी उदास॥ ५ ॥

---

टीप:—१ चांगली २ निरूपमा.

**वसंततिलकावृत्त.**

प्रख्यात वृश्चिकपुराधिपवंश होय ॥ आहेत त्यांत बरवे रघुनाथराय ॥ वर्णावया तदीत हा स्वशिरीं करास ॥ ठेऊन सिद्ध करि किंकर शंकरास ॥ ६ ॥

**गीति ( आर्या )**

श्रीमद्रघुनाथनृपतिवंशाची शारदे असो वृद्धि ॥ तच्चिरितास कथाया होवो मद्वंशजांस सद्बुद्धि ॥ ७ ॥ गणपति वाग्देवीतें आठवुनी श्लोक हा करी आठ ॥ विनत अनंत सुताची रक्षावी संकटीं तिहीं पाठ ॥ ८ ॥

रघुनाथराव अण्णासाहेब यानीं सन १८८० इसवी सालीं माघ शुद्ध १३स अग्न्याधान(अग्नि होत्र)पुष्य नक्षत्रावर केलें.शास्त्राप्रमाणें अग्नीहोत्र घेतल्या नंतर प्रथम संवत्सरीं प्रवास वर्ज आहे यास्तव त्यांनीं विंचूरास राहून आग्निसेवेंत वर्ष घालविलें. वर्षापूर्तीचे[1] दिवशीं सायंकाळचे होम समयीं विशेष उपस्थान[2] कर्तव्य तें केल्यावर त्यांनीं दीपोत्सव, ब्राह्मणभोजन, मंत्रजागर वगैरे उत्सव करून संवत्सराची पूर्णता केली.

पुढें कुलस्वामी नरहरीचें दर्शन करून नीराभीमासंगमतीर्थासंनिध चातुर्मास्यें[3].व ऐंद्राग्नीय[4] पशुबंध करावा या इच्छेनें अग्निहोत्रासह ऋत्विजमंडळी बरोबर घेऊन पायमार्गें रघुनाथराव हे नृसिंहपुरक्षेत्रीं जाण्यास निघाले. प्रथमतः त्र्यंबकक्षेत्रीं श्री त्र्यंबकेश्वराचें दर्शन करून चैत्रवद्य अष्टमीस क्षेत्र नृसिंहपूर येथें पोंहचले. तेथें बृहस्पतीचे अस्ताचा प्रतिबंध दूर होतांच चातुर्मास्यें व पशुबंध करण्याचा निश्चय होऊन सर्व तयारी झाली. नंतर क्रमानें वैशाखशुद्धपक्षीं श्री नृसिंहजयंतीचा उत्सव प्राप्त झाला. तो त्यांनीं उत्तम प्रकारें करून शुद्धपौर्णिमेस नीलोद्वाह ( वृषोत्सर्ग ) केला.

---

टीपाः— १ वर्ष समाप्ति २ प्रार्थना ३ पांच किंवा सात दिवसांचा नियम करून वारंवार इष्टी करण्याचा पक्ष आहे तें—४ इंद्र आणि अग्नि यांच्या प्रीत्यर्थ एक पशू करून इष्टी करणें.

त्याचदिवशीं रघुनाथराव यांची पत्नी [ सौभाग्यादिगुणमंडितसती धर्माग्रसरश्रीमती जानकीबाई साहेब ] यांस ज्वर आला. दुसरे दिवशीं इष्टी असल्याकारणानें स्नान होऊन थोडे परिश्रम झाल्यामुळें त्यांचा ज्वर अधिक वाढला. पुढें दिवसेंदिवस प्रकृती बिघडत जाऊन स्पष्ट कफक्षयाचीं चिन्हें दिसू लागलीं. त्या रोगावर वैद्यांनीं अनेक उपचार केले. परंतु कांहींच उपयोग न होतां ज्येष्ट वद्य अष्टमी रविवारीं बारा वाजतां अग्निहोत्रवेदींत भगवन्नामस्मरण आणि दानधर्म करीत असतां त्या पुण्यश्लोकबाईचें देहावसान झालें. नंतर रघुनाथराव यांनीं अग्निहोत्रविधीनें शेवटचा विधी नीराभीमासंगमतीर्थासंनिध करून पुढें तेरा दिवसपर्यंत यथाशास्त्र कर्तव्य तें सर्व कृत्य बहुत खर्च करून चांगलें केलें. या बाईच्या वियोगापासून रघुनाथराव यांस दुःख होणें ठीकच आहे; परंतु विंचूर इलाख्यांतील सर्व जातीचे स्त्रीपुरुषरूपप्रजाजन हीं त्याप्रसंगीं बहुत कष्टी झाले यांत संशय नाहीं. असो.

याच संधीस रघुनाथराव यांचें प्रपंचांतून मन उठण्यास एक विशेष कारण झालें होतें. त्याचा विस्तार हरिपंत गाडगीळ यांनीं विंचूरकर घराण्याचे इतिहासांत पृष्ठ २९६ पासून ३०५ यांत लिहिला आहे. तो सुज्ञवाचकांनीं पहावा. सारांश, सर्व प्रकारें मनास नाउमेद होऊन इतउत्तर दुसरा कोणचाच व्यासंग न करितां क्षेत्रवास करून शेषआयुष्याचे दिवस परलोकसाधनांत घालविण्याचा रघुनाथराव यांनीं निश्चय केला. अशा स्थितींत त्यांचे कनिष्ठ बंधु माधवराव दादासाहेब, व आप्त, इष्ट आणि पदरची मंडळी यांनीं वरचेवर पत्रें लिहून शेवटीं असा निश्चय कळविला कीं "आपण जर आतां विंचुरास येत नाहींत तर आह्मी सर्व आपलेसंनिध येऊन राहूं." त्यावरून श्रावण शुद्ध पंचमीस ( नागपंचमीस ) नरहरीची महापूजा, व ब्राह्मणभोजन करून तेचदिवशीं रघुनाथराव हे विंचुरास जाण्याकरितां आगगाडीमार्गें चालते झाले.

त्यांनीं प्रथम त्र्यंबकक्षेत्रीं जाऊन देवाचें दर्शन केलें. आणि त्या क्षेत्रीं पत्नीचे और्ध्वदेहिक संबंधीं संवत्सराचीं उदकुंभश्राद्धें

---

टीपः—१ मरणोत्तरची क्रिया.

एकदम करून ते श्रावणवद्यपक्षीं विंचुरास आले. तेव्हां त्यांचे बंधू व इतर आश्रितजन आणि इलाख्यांतील प्रजा या सर्वांस बहुत संतोष वाटला. पुढें थोडे दिवसांत संधी पाहून त्यांची मातुश्री व बंधु आणि पदरची सर्व मंडळी यांनीं गृहस्थाश्रम करून पूर्ववत् अग्निहोत्रसेवा करण्याविषयीं रघुनाथराव यांस बहुत आग्रह केला. परंतु त्यांनी मोठ्या शाहणपणाचे घाटानें आपल्या वयाचें मान आणि लोकस्थिती पाहून पुनः विवाह करण्याचें बिलकूल कबूल केलें नाहीं. या कारणानें त्यांचे बंधु व मातुश्री आणि परिवारमंडळी या सर्वांस दुःख वाटून निरुपायामुळें ते सर्व स्वस्थ बसले. असो.

या समयीं घरांतील मनुष्यांचे आग्रहामुळेंच क्षेत्र सोडून रघुनाथराव यांचें येणें विंचुरास झालें हें खरें पण क्षेत्रवास टाकून विंचुरास किंवा दुसरे कोणते ही ठिकाणीं राहणें त्यांस बरें वाटेना. कारण पत्नीचा वियोग झाल्या दिवसापासून क्षेत्रवासानें परलोक साधनांतच आपलें शेषआयुष्य घालविण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केला होता. सबब पुनः नरसिंहपुरास जाण्याची तयारी करून ते चालते झाले. प्रथम त्यांनीं आगगाडीनें आपले जहागीरीचें गांव मनमाड येथें जाऊन मुक्काम केला. या गांवीं स्टेशन असून दोन आगगाडीचे रस्त्यांचा संयोग झाल्यामुळें हमेषा मोठी रहदारी असते. व व्यापार ही बराच चालतो. तेथून बारा कोशांवर गोदातीरीं पुणतांबे गांव आहे. त्यास पुराणांत पुण्यस्तंभ अशी संज्ञा असून गोदावरीमाहात्म्यांत त्या क्षेत्राचें वर्णन केलें आहे. त्या क्षेत्रीं पोंहोचण्याकारितां आगगाडीनें गेले.

या क्षेत्रीं पूर्वीं फार मोठाले विद्वान ग्रंथकर्ते झाले असून त्यांनीं केलेले ग्रंथ हल्लीं प्रचारांत आहेत. याच क्षेत्रीं वाजसनीय शाखेत चांगदेव ह्मणोन बहुत काला पूर्वीं महान् योगी उत्पन्न झाले होते त्यांचा वंश अद्यापपर्यंत त्या क्षेत्रीं आहे. या योगीश्वराविषयीं भक्तिविजय नामक प्राकृत ग्रंथांत कथा आहे ती अशीः—

चांगदेव यांनीं योगबलेंकरून मृत्यूचें निवारण केलें. ह्मणजे योगशास्त्रांत कथन केल्याप्रमाणें मृत्युसमयीं समाधीचा स्वीकार

करून त्याची ( मृत्यूची ) वंचना केली अशा प्रकारें त्यांनीं आपले आयुष्याची वृद्धी चौदाशें वर्षेंपर्यंत केली. या योगसिद्ध पुरुषाच्या योगसमाधी ठिकठिकाणीं तेरा आहेत. ज्ञानेश्वराचा उपदेश जाहल्यावर जी चौदावी समाधी या पुण्यस्तंभ क्षेत्रीं झाली ही शेवटची समजावी.

निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, हे चार अवतारी जीव उत्पन्न झाले त्यांची अमानुष कृति चांगदेवांनीं श्रवण करून त्यांचें दर्शन करण्याविषयीं त्यांस उत्कंठा उत्पन्न झाली. तेव्हां चौदाशें शिष्यमंडळी बरोबर घेतली आणि आपण योगबलानें दमन केलेले व्याघ्रावर आरोहण करून हस्तांत सर्पाचा प्रतोद ( चाबुक ) ग्रहण केला आणि अशा समारंभानें ते इंद्रायणीतिरीं अलकापुरीस ( आळंदीस ) गेले. ते दिवस थंडीचे असल्यामुळें निवृत्ती वगैरे त्रिवर्ग बंधू गांवच्या लहान पडक्या भिंतीवर ऊन घेत बसले होते. तेथें चांगदेव आपल्या भेटीस आल्याचें वर्तमान त्यांनीं ऐकिलें तेव्हां त्यांस सामोरें जाऊन त्यांचा उत्तम सत्कार करण्याकारितां ज्या भिंतीवर बसले होते त्या भिंतीसच चालण्याविषयीं त्यांनीं आज्ञा केली. त्याप्रमाणें भिंत चालूं लागली. तिकडून चांगदेवहीं आले. त्यांनीं निर्जीव भिंत चालत आहे हें पाहिल्यानें त्यांस जो योगसिद्धीचा गर्व झाला होता तो नाहींसा झाला. मग त्रिवर्गास साष्टांग नमस्कार घालून शरणांगत होत्साते त्यांनीं ज्ञानेश्वरापासून ब्रह्मविद्येचा उपदेश ग्रहण केला आणि कांहीं दिवस त्यांचे सन्निध वास करून सर्व शंकांचें व विपरीतभावनांचें निरसन झाल्यावर गोदातीरीं पुण्यस्तंभ क्षेत्रीं येऊन शेवटची चौदावी समाधी ग्रहण केली नंतर ते कैवल्यास पावले.

हें समाधीचें स्थळ गांवाचे पूर्व बाजूस थोडे अंतरावर गोदातीरीं आहे. तेथें मोठा पार असून त्यावर अश्वत्थवृक्ष आहे. त्याचे खालीं त्या सत्पुरुषाची समाधी आहे. पुढचे बाजूस विठ्ठलरखुमाईच्या मुर्ती असून देवापुढें सभामंडप आहे. आसमंतात्

---

१ नम्र २ वस्तु एकाप्रकारची असून मनाचा ग्रह दुसरे प्रकारचा होणें ३ मोक्षास.

ओऱ्या बांधिल्या आहेत. हें स्थल गोदातीरीं मोठें रमणीय दिसतें. समीप पुराणप्रसिद्ध विश्वेश्वराचें मंदीर असून त्यांत स्वयंभू लिंग आहे. आणखी एकदोन शिवस्थानें समीपच आहेत. या गांवा नजिक अहिल्याबाई साहेब होळकर यांनीं गंगेस घांट बांधून शिवस्थापना केली आहे. गांवांत व्यंकटेश देवाचें संस्थान बहूत प्राचीनकालचें असून त्या प्रदेशीं त्या संस्थानची सर्वत्र प्रसिद्धि आहे.

या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं क्षेत्रांतील प्रसिद्ध देवतेस व चांगदेवाचे समाधीस अभिषेक, पूजा, ब्राह्मणभोजन करून ते आगगाडी मार्गें चालते झाले. आणि नगरावरून दौंडचे स्टेशनावर मुक्कामास आले.

दौंड हा गांव भिमातीरीं असून श्रीमंत नाना साहेब पेशवे यांनीं रामचंद्रबाबा शेणवई यांस इनाम दिला होता. त्यांनीं त्या गांवीं दगडी विठ्ठलमंदीर फार अपूर्व बांधिलें आहे. त्या नामांकित पुरुषाचा औरस वंश नसल्या कारणानें डलहौसी गवरनर जनरल यांचे कारकिर्दींत तो इनाम गांव दत्तकाकडे न चालतां खालसा झाला. या शेणवई गृहस्थाची पूर्ण माहिती ग्रचांडडफ यांनीं केलले मराठ्याचे इतिहासांत लिहिली आहे, असो.

तेथून रघुनाराव आगगाडीनें निघाले आणि केमचे स्टेशनावर उतरून त्या गांवीं मुक्काम केला. तेथें गांवचे उत्तर बाजूस थोडे अंतरावर एक अत्युत्कृष्ट स्वयंभू असें उत्तरेश्वर नामक शिवस्थान आहे. देवमंदिरासमीप उत्तम वापी ( विहीर ) बांधलेली असून ती जागा अतिरमणीय दिसते. केमगांव मोठा आहे; तेथें कुंकुम फार होतें तें पंढरपूर वगैरे ठिकाणचे व्यापारी खरेदी करून नेतात. केमस्टेशनापासून नऊ कोसाचे अंतरावर नरसिंहपूर राहतें तेथून सन १८८१ चे नोवेंबर महिन्यांत ह्मणजे शके १८०३ चे मार्गशिर्षांत ते त्या क्षेत्रीं पोंचले.

या क्षेत्रीं विंचूरकर यांचे घराण्यांतलि मूळपुरुष विठ्ठल शिवदेव यांनीं मोठें भव्य असें श्रीनरहरीचें मंदीर बांधविलें असून पुढें त्यांचे वंशांत जे पुरुष झाले त्यांचे कारकीर्दींत त्या मंदिराची बहुत कामें जास्ती झालीं आहेत. मंदिराचें शिखर जीर्ण

दशेस आल्यामुळें रघुनाथराव यांनीं त्याचा जीर्णोद्धार करण्याची सुरवात करून सन १८६९ इसवी सालीं मार्गशीर्ष वद्य ९स संपूर्णता केली. तो आनंदाचा दिवस मानून प्रतिवर्षी वद्य ९ पासोन उत्सवास आरंभ करून दशमीस क्षेत्रसमाराधना झाली ह्मणजे उत्सवाची पूर्णता करावी असा त्यानीं नियम केला तो बहुतवर्षें चालू आहे. तो नियमित उत्सव त्याच संधीस अनायासें प्राप्त झाल्यामुळें तो रघुनाथराव यांनीं उत्तम प्रकारें केला.

पुढें चैत्र व वैशाख या दोन महिन्यांत त्यांनीं मंदिराचे पाश्चिम द्वारा संनिध नवीन बांधिलेल्या धर्मशाळेचा उत्सर्ग व जानकीश्वर नांवाचे शिवलिंगाची स्थापना हीं धर्मकृत्यें केलीं. जानकीश्वराचें मंदीर नीरा व भीमा संगम तीर्थाचे टोंकावर असून तें त्यांनीं आपले जानकीनामक मृतपत्नीचे स्मरणार्थ बांधविलें होतें व त्यांतच त्या लिंगाची स्थापना केली. पुढें क्रमप्राप्त नृसिंहजयंतीचा उत्सवही त्याच क्षेत्रीं झाला. या संधींतच त्यांचे कनिष्ठबंधू दादा साहेब यांचे कनिष्ट चिरंजिवाचा विवाह, धुळेकर वामनराव अण्णा गरूड--होळकर सरकारचे नायबदिवाण--यांचे नातीबरोबर वैशाख वद्य तृतियेस झाला. त्या लग्नाकारितां नृसिंहपुराहून शुद्ध पौर्णिमेचे उत्तररात्रीस निघोन आगगाडीमार्गें विंचुरास सिमांतपूजन समयीं येऊन पोंहचले. हें लग्न उभय पक्षांकडून मोठ्या हौसेनें थाटमाटाचें झालें. लग्न समारंभ आटोपल्यावर त्या सालीं वैशाख वद्य अमावास्येस सूर्यग्रहण प्राप्त झालें होतें. त्या पर्वास रघुनाथराव हें त्र्यंबकक्षेत्रीं गेले. तेथें पर्वकालीं तीर्थस्नान व दानधर्म वगैरे करून विंचुरास न जातां परभारें आगगाडीमार्गें तें नृसिंहपुराकडे चालते झाले.

त्या क्षेत्रीं प्रत्यहीं प्रातःस्नान, श्रीनरहरिची पूजा, तिसऱ्या प्रहरीं पुराण श्रवण, या प्रमाणें करून कालक्षेप करीत असतां जेष्ट वद्य अष्टमीस पत्नीचें प्रथम सांवत्सरिक श्राद्ध प्राप्त झालें तें केलें. पुढें चातुर्मास्यारंभाची सूचक आषाढ शुद्ध एकादशी प्राप्त झाल्यावर त्यांनीं विशेष नियम धारण करून क्षेत्रवास केला. या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं तीर्थरुपांचीं व स्वताहांचीं जीं प्रदोषा-

दिव्रतें होतीं त्या सर्वांचीं उद्यापनें केलीं. अशा प्रकारें त्यांनीं सत्कर्मांत काळ घालविला.

पुढें आश्वीन शुद्ध पौर्णिमेपासोन श्रीनृसिंहमंदिरांत कार्तिक मासाचे संबंधानें प्रतिदिवशीं प्रदोषकालीं उत्तम प्रकारचा दिपोत्सव करून गवयी लोकांचें गाणें केलें.याचप्रमाणें मागील प्रहर रात्रींचे सुमारास मंदिरांत दिपोत्सव आणि गाणें व नानाविध वाद्यांचे गजर इत्यादि करवून स्वतः रघुनाथराव हे प्रत्यहीं विधिपूर्वक देवाचा प्रबोधोत्सव करीत असत. नंतर संगमीं कार्तिकस्नान करून नित्याचें आन्हिक करीत. अशा प्रकारें सर्व कार्तिक मास त्यांनीं पूर्णतेस नेला.

कार्तिक शुद्ध १४ ( वैकुंठचतुर्दशी ) स श्रीनृसिंहप्रीत्यर्थ गरुड वाहनाचा महोत्सव वार्षिक नियमाप्रमाणें सुरू झाला. हा उत्सव रघुनाथराव यानींच सन १८८१ इसवी साला पासोन प्रवृत्त केला आहे.

या प्रमाणें चातुर्मास्य क्षेत्रवास झाल्यावर शेवटीं त्यांनीं देवाची महापूजा करून ब्राह्मणभोजन घातलें आणि चातुर्मास्यांत जीं व्रतें स्वीकारिलीं त्यांची उत्तम प्रकारें समाप्ती केली.

अशा प्रकारें चातुर्मास्य पूर्णतेस गेल्यावर रघुनाथराव यांस अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, शृंगेरीस जाऊन जगद्गुरु शंकराचार्य यांनीं मठांत स्वहस्तानें शारदांबा देवीचें स्थापन केलें आहे, त्या भगवतीचें दर्शन करावें आणि ज्या भूप्रदेशांत सद्गुरुनीं चिरकाल संचार केला त्या पवित्र भूमीचें दर्शन करून वंदन करावें याचें कारण एक्या आर्यारूप वृत्तांत लिहिलें आहे.

### आर्या

चित्रं काशी क्षेत्रं गुरुचरणोपांतभूतलं वंदे ॥
यन्नतिमात्रान्मुक्तिर्मृतिं विनैवास्त्यनायासात् ॥

### अर्थ

मरणावांचोन अनायासें केवळ नमस्कारानेंच मोक्ष देणारा असा श्रीगुरुचरणांच्या निकटभागाचा भूप्रदेश हेंच प्रसिद्ध काशीक्षेत्रा-

हून विचित्र* काशीक्षेत्र होय. यास्तव त्यास ( गुरुचे निवासस्थानास ) मी वंदितों.

ब्राह्मणकुलास शृंगेरीमठ हा सर्वप्रकारें पूज्य आहे. तो प्रत्यक्ष नेत्रांनीं पहावा. व विद्यमानमठांतील अधिकारावर जे स्वामी असतील त्यांचें दर्शन घेऊन ब्रह्मसूत्राचा व त्यावरील आचार्य यांचे भाष्यग्रंथाचा त्यांजपासोन उपदेश ग्रहण करावा, ही गोष्ट ईश्वरप्रसादें शेवटास गेली ह्मणजे मनुष्यजन्मांतील मुख्य कर्तव्य तें आपण केलें असें होईल, असा रघुनाथरावांनीं आपल्या मनाचा निश्चय केला, आणि असें ही ठरविलें कीं या प्रवासांत रस्ता सोडून अजुबाजूचे प्रदेशांतील देवता व क्षेत्रें असतील त्या स्थलीं जाऊन तेथील विधीप्रमाणें यात्रा कराव्या. असा विचार करून त्यांनीं पायमार्गें प्रवास करण्याची तयारी केली.

नंतर आपला यात्रेस जाण्याचा विचार कनिष्ट मातुश्री सत्यभामाबाईसाहेब यांस कळविला. तेव्हां त्यांचें यात्रेस येण्याविषयीं मानस दिसल्या वरून त्यांस ही बरोबर घेण्याचें ठरविलें.

या शिवाय रघुनाथराव यांनीं आपल्यास ठिकठिकाणचीं क्षेत्रमाहात्म्यें श्रवण करण्याची अडचण पडूंनये व समयपरत्वें एखादा शास्त्रार्थ विचारण्यास व हरएक धर्मसंबंधाचे कृत्यांत हरकत येऊं नये ह्मणोन वेदशास्त्रसंपन्न दिनकरशास्त्रीबावा खांबेटे व बाळ शास्त्री लेले या उभयतांस व शृंगेरी पर्यंत कानडी भाषा प्रवृत्त असल्यामुळें कर्नाटकदेशस्थ कृष्णाचार्य गंजीहाळकर यांस ही बरोबर घेतलें. शिवाय भिक्षुक, कारकून, आचारी, खटपटी, पाणके, अशी दहा बारा ब्राह्मणमंडळी, या खेरीज खिजमतगार, मशालजी, पहारेकरी, कामाठी, गाडीवाले, वगैरे शूद्र ही बरेच बरोबर घेऊन निघण्याची सर्व तयारी केली.

नंतर कार्तिक वद्य ९ तारीख ९डिसेंबर सन१८८२ रोजीं उत्तर व दक्षिण कानडा प्रदेशांतील तीर्थयात्रा करण्यास्तव मातुश्रीसह रघुनाथराव हे नरसिंहपुराहून निघाले ते पंढरपुराचे दक्षिणभागास

*काशी क्षेत्र मरणोत्तर मोक्षसुखानुभव देतें व गुरुचरणाच्या निकट भागाचा भूप्रदेश जिवंतपणींच तो देतो. हें विचित्र पदाचें तात्पर्य आहें.

सुमारे २९ कोसाचे दरम्यान मार्गांत सडक सोडून चार कोसाचे अंतरावरजें मोठें जागृत मारुतीचें स्थान आहे व ज्यास निंबरगीचा मारुती असें ह्मणतात त्याचे दर्शनाकरितां गेले. हें स्थान निंबरगी या गांवापासून बरेंच अंतरावर असोन एक रमणीय जागा आहे तेथें नदीतिरीं मोठा चिरेबंदी पक्का कोट बांधीव असून आंत भव्य मंदीर आहे. त्यांत श्रीरामचंद्राची मूर्ती व तिच्या उजवे बाजूस एक शिवलिंग आहे. त्यापुढें थोडे अंतरावर चौक आहे. त्याचे मध्यभागीं मोठा अश्वत्थ असून मंदिराच्या आसमंतात् धर्मशाळा आहेत. त्यांतील धर्मशाळेंत त्यानीं मुक्काम केला. नंतर तेथील क्षेत्रमहात्म्याचा शोध केला परंतु तें देवाचे पुराणिकापाशीं असोन पुराणीकबोवा प्रवासास गेले होते यामुळें तेथील क्षेत्रमहात्म्य दृष्टीस पडलें नाहीं.

हें देवस्थान पुराणप्रसिद्ध अनादि असोन त्या प्रदेशांतील बहुत लोकांची उपास्यदेवता हीच आहे. पंढरपूर येथील श्री पांडुरंगाचे पुजारी ( बडवे ) यांचें मुख्य उपास्य हेंच स्थान असून ओहोर यात्रेनिमित्य लोक येत असतात. त्यास्थानीं सेवा करणाऱ्या अशा सेवेकरी स्त्रीपुरुषांचा समुदाय हमेषा असतो. थोरले माधवराव साहेब पेशवे हे टिपुसुलतानास नम्र करण्याकरितां कर्नाटकचे स्वारीस गेल्यावेळीं त्यांनीं यास्थलीं येऊन देवास नवस केला होता. नंतर हेतूप्रमाणें कार्यसिद्धी झाल्यावर त्यांची या देवावर बहुत भक्ती बसली. त्यांनींच देवाचें मंदीर बांधून पूजा वगैरे खर्चास सातशें रुपयांची नेमणूक करून दिली.ती अद्याप चालत आहे. पुढें कधीं कधीं कर्नाटकांत पेशव्यांची स्वारी आली असतां ते या स्थानीं मुद्दाम येऊन दर्शन घेत असत.

तेथील ब्राह्मणमंडळींचे सांगण्यांत एक्याच पाषाणचे दोन भाग होऊन एक भागाचें शिवलिंग व एक भागाची मूर्ती झाली आहे. हें केवळ हरिहरात्मक स्थान आहे. रामाची मूर्ती बहुतकाळची असल्यामुळें फार सूक्ष्म झाली आहे व जो अवयव अति सूक्ष्म झाला त्या ठिकाणीं पुजारी लोक चांदीची पट्टी लुकणांत

---

१ भक्तिमान पुरुषास प्रत्यक्ष फल देणारें.

[stamp]

वसविितात. या स्थळीं प्रत्यक्ष राममूर्ती व शिवलिंग असून मारुतीचें नांवें स्थलप्रसिद्धी होण्याचें काय कारण झालें याचा शोध करितां तेथील एक वयोवृद्ध ब्राह्मणानें क्षेत्रमहात्म्यांतील इतिहास रघुनाथराव यांस सांगितला तो खाली लिहिल्या प्रमाणें.

"लंकेस रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येस आल्या नंतर मारुतीनीं श्रीरामाची आज्ञा घेऊन यास्थलीं येऊन हरिहरप्रसादप्राप्त्यर्थ चिरकाल तप केल्यावर भगवद्दर्शन झालें त्यासमयीं उभय देवांनीं असा वर दिला कीं "तुझे नामानेंच हें स्थल प्रसिद्ध राहून येथें आह्मी हरिहररूपानें निरंतर वास करूं. जे भक्तजन यास्थलीं येऊन आह्मां उभयतांचे दर्शन व पूजन करतील त्यांचीं सर्व पातकें दूर करूं. जे सकामा असतील त्यांची कामपूर्ती[1] करूं. व जे निष्काम असतील त्यांस मोक्षफल देऊं." असा वर प्राप्त झाल्यावर आज्ञा घेऊन मारुती तप करण्यास्तव गंधमाधन पर्वताकडेस गेले."

हें स्थान प्रत्यक्ष हरिहरात्मक असून वरदानाप्रमाणें मारुतीचें स्थान अशी प्रसिद्धी आहे. व पूजादि प्रकार सर्व मारुतीचेच नांवानें होतात.

या देवालयासंनिध नदी आहे. त्या नदींतच रामतीर्थ म्हणून स्थान आहे. मोठ्या भक्तीनें यात्रेकरू लोक त्या रामतीर्थाचें स्नानपान करून भगवत्सेवा करितात.

या स्थानीं रघुनाथराव यांनीं रामतीर्थाचें स्नान करून देवाची महापूजा केली. नंतर ब्राह्मणभोजन करून मार्ग क्रमीत विजापूर येथें दाखल झाले.

विजापूर शहर ३।४ कोस राहिलें ह्मणजे " गोलघुमट " या नामानें एक सुंदर इमारत आहे ती दिसूं लागते. पुढें थोडें दूर गेल्या वर कबरा, मशीदी, दर्गे हजारों दृष्टीस पडतात. या शहराचा देखावा बाहेरून फार रमणीय दिसतो. सर्व शहरास पक्का कोट असून त्याची मर्यादा अतिशय विस्तृत आहे. शहराचे सर्व घेराची प्रदक्षिणा केली तर दहा कोशांहून कमी येणार नाहीं असें वाटतें.

---

१ मनोरथ पूर्णकरणें.

शहरांत ठिकठिकाणीं जुन्या इमारती हजारों आहेत. त्यांत कितीएक अवश्य पाहण्या सारख्या अशा इमारती, दर्गे, मशीदी, असोन त्या तयार होण्यास किती द्रव्य खर्च झालें असेल याचें अनुमान सुद्धां लवकर होत नाहीं.

कोटाचे बाहेरील एक्या बुरुजावर मोठी भयंकर तोफ आहे. तीस " मुलुक मैदान " असें नांव असोन ती तोफ अवश्य पाहण्या सारखी आहे. त्या शहरीं जो जातो तो ती तोफ पहातो.

तेथून जवळ एक " उपल्या "या नांवाचा बुरूज आहे.त्यावर दोन तोफा आहेत, याही फार मोठ्या असोन. लोखंडी आहेत. या बुरुजास उपल्या बुरूज हे नांव पडण्याचे कारणाचा शोध करितां रघुनाथराव यांचे ऐकण्यांत असें आलें कीं, बादषाही अमलांत एक वृद्ध दासी उपल्या ( गोंवऱ्या ) विकून सधन झाली. तिनें तो बुरूज आपलें नांव चिरकाल रहाण्याकरितां बांधविला सबब त्यास उपल्या बुरूज असें ह्मणतात. त्या बुरूजावर चढून पाहिलें ह्मणजे सर्व शहराचा भाग नजरेस येतो. या शहरांत हल्लीं वस्ती अगदीं थोडी असोन सर्वत्र रान झालें आहे. मध्यवर्ती कांहीं शेतेंही आहेत.

शहरांत बादषाही किल्ला आहे त्यास खंदक असोन त्याचे समीप श्रीनरसिंहाचें मंदीर आहे. त्या मंदिरांत रघुनाथराव यांचा मुक्काम झाला. ह्या देवळांत नरसिंहाची मूर्तीं नसोन मोठा तांदळा आहे त्यास शेंदूर लावितात. त्या तांदळ्यासच मुखाचा व डोळ्याचा आकार दिसतो. या देवाचे दर्शनास प्रत्यहीं शहरांतील बहूत लोक येत असतात.

किल्यांत बादषहा रहाण्याच्या जागा ठिकठिकाणीं कांहीं कायम राहिल्या आहेत, त्या ही पहाण्या सारख्या आहेत. त्या ठिकाणीं वस्ती बिलकूल नसल्याकारणानें अरण्यांतील जनावरें कोल्हीं वगैरें बहुत रहातात हें पाहून कालगती विचित्र आहे असा मनास ग्रह होतो.विजापूर शहर कोणत्या बादषहानें वसविलें आणि शेवटीं त्या शहरासह तेथील बादषहाचा अंत कोणी केला हा सर्व वृत्तांत ग्र्यांडाफ यानें केलेल्या मराठ्यांचे बखरींत सविस्तर लिहिला आहे.

कालगतीनें जगांत अनेक प्रकारच्या घडामोडी हमेषा चालू असतात. या व्यावहारास अनुसरून हल्लीं कलादगीजिल्हा मोडून विजापूरजिल्हा इंग्रज सरकार करणार, सबब सरकारी कचेऱ्यांकरितां किल्लचांतील कांहीं इमारतींची दुरस्ती चालू होती. व अगगाडीचें स्टेशन ही त्या शहरा लगत होण्याचा कारखाना सुरू होता, अशा कारणानें ओस पडलेलें तें शहर कदाचित् दैवगतीनें अबाद होईल असें अनुमान आहे.

विजापूरचे भागांतच "त्वरवी" म्हणून एक गांव आहे. तो किल्लचापासुन सुमारें तीन कोस लांब असोन तेथें श्रीनरहरीचें एक प्रसिद्ध स्थान आहे तेथपर्यंत शहरच्या मोडक्या इमारती बहुत दृष्टीस पडतात. त्वरवीगांवीं ब्राम्हणांची वस्ती बरीच आहे. त्यांत मध्वसंप्रदायी ब्राह्मणांचीं पुष्कळ घरें आढळतात. त्या गांवचे मध्यभागीं एक बांधीव चौसोपी इमारत असोन तिचे खालीं एक चांगलें मजबूत बांधीव भुयार आहे. त्यांत काळ्या पाषाणाची अष्टभुजा अशी श्रीनरहरीची मूर्ति फार अप्रतिम आहे, हा देव त्या प्रदेशांतील बहुत लोकांचा कुलस्वामी असल्यामुळें तेथें पुष्कळ लोक यात्रोद्देशानें येतात. देवाजवळच मोठ्या विहिरी सारखें बांधीव तीर्थ आहे त्यास नृसिंहतीर्थ असें ह्यणतात, तेथें भाविक लोक स्नान करून देवाचें दर्शन पूजा ब्राह्मणभोजन वगैरे करितात. या ठिकाणीं रघुनाथराव गेल्यावर त्यांनीं या नरसिंह क्षेत्र संबंधी कांहीं प्रसिद्धी आहे किंवा कसें याचा शोध केला तेंव्हां तेथील ब्राह्मणांनीं असें सांगितलें कीं, दुर्वास ऋषींनीं ही नरसिंहमुर्ती स्थापिली याविषयीं स्कंदपुराणांत प्रमाण आहे. असो, तेथील विधीप्रमाणें तीर्थस्नान नरसिंहाची महापूजा ब्राह्मणभोजन इत्यादि करून मार्ग क्रमीत कृष्णातीरीं कोल्हार गांवीं येऊन नांवेच्या साधनानें कृष्णानदी उतरले आणि तेथें कृष्णातीर्थ प्रयुक्त क्षौरश्राद्ध करून ते पुढें चालते झाले.

पुढें त्यांस मार्गांत घटप्रभा नदी लागली. त्या स्थलीं मुक्काम करून तीर्थस्थान वगैरे तीर्थ संबंधीं विधी झाल्यावर ते तेथून निघाले. दुसरे मुक्कामीं त्यांस मलप्रभा नदीचें दर्शन झालें. तेथें तीर्थ

संबंधीं विधी झाल्यावर ते क्रमानें नरगुंद या गांवीं मुक्कामास आले.

नरगुंदास पहाडी किल्ला असोन त्याचे उत्तरबाजूचे माचीस गांवची वस्ती आहे. हा गांव व किल्ला नरगुंदकर जहागिरदारां-कडे बहुत दिवस होता. इंग्रजी राज्याचे आरंभीं अप्पासाहेब म्हणून जहागिरदार होते ते फार कर्मनिष्ट असोन भगवद्भक्त असत; त्यांनीं आपले प्रजेचें उत्तम प्रकारें पालन केल्याचा लौकीक अद्यापपर्यंत त्या प्रदेशीं आहे. त्यांनींच [अप्पा साहेब यांनीं] किल्ल्याचे माचीस श्रीव्यंकटेशाचें उत्तम मंदीर बांधून देवाची स्थापना केली असें ऐकण्यांत आहे. त्या देवाचे नित्यपूजोत्सवास व शारदी नवरात्रांतील उत्सवांस त्यांनीं पांच हजार रुपयांची नेमणुक करून देऊन शिवाय ते स्वतःचे जहागिरींतून देवप्रीत्यर्थ बहूत खर्च करीत असत.

त्यांनीं देवालया संनिध चार शाळा स्थापन केल्या होत्या. त्या प्रांतीं अप्पासाहेब नरगुंदकर यांचा धर्मसंबंधीं फार मोठा लौकीक ऐकण्यांत आला. त्यांचे चिरंजीव बाबासाहेब नरगुंदकर यांनीं सन १८२८ इसवी सालीं मोठें भयंकर बंड उद्भवलें त्या प्रसंगीं आद्यंत विचार न करितां स्वतः बंड करून म्यानशीन साहेब इनामकमिशनर यांस ठार मारिलें. या कारणानें तें संस्थान इंग्रज सरकारांनीं खालसा करून बाबासाहेब नरगुंदकर यांस बेळगांव मुक्कामीं फांशीं दिलें. त्या समयींचे लष्करी कायद्या अन्वयें गांवाची लूट झाली. त्या गर्दींत किल्ल्यावरील श्रीव्यंकटेश मूर्तीचाही विध्वंस झाला. रामदुर्गकर जहागिरदार हे त्यांचे ( नरगुंदकरांचे ) निकट भाऊबंद आहेत.

पुढें रामदुर्गकर जहागिरदार यांनीं परवानगी घेऊन त्या देवळांत नवीन व्यंकटेश मूर्तीची स्थापना केली. व पूर्वींपासून चालत आलेली पांच हजार रुपयांची नेमणूक चालविण्याविषयीं ब्रिटिशसरकारास विनंति केली. ती सरकारांनीं मान्य करून रामदुर्गकर जहागिरदार यांचे मार्फत त्या रकमेचा देवाकडे खर्च होत जावा ह्मणोन ठराव केला. त्याप्रमाणें जहागिरदार यांजकडून व्यंकटेशदेवाकडे त्या नेमणुकेचा खर्च होत आहे.

रघुनाथराव यांनीं त्या व्यंकटेशाचें दर्शन करून नरगुंद गांव आणि नरगुंदकर जहागिरदार यांचा वाडा वगैरे सर्व पाहिलें. तें संस्थान नष्ट झाल्यामुळें तेथील लोकांची स्थिति व किल्ला आणि देवाकडील सर्व प्रकारचा देखावा पाहून रघुनाथराव यांचें अंतःकरण फार दुःखी झालें. नंतर तेथून निघून ते क्रमानें प्रसिद्ध हुबळी शहरीं मुक्कामास गेले.

हुबळी शहर फार मोठें आहे. या शहरांत सर्व प्रकारचा व्यापार चालतो. येथें दहा हजारांवर कापडाचे माग आहेत असें सांगतात. येथील कापड सर्व देशांत विकलें जातें. ब्राह्मण लोकांचीही वस्ती या गांवीं बरीच आहे. त्यांत मध्वमती ब्राह्मणांचा भरणा फार आहे. तेथें मुख्यत्वें करून कानडी भाषा चालते. रघुनाथराव यांनीं दोन मुक्काम करून सर्व शहर पाहिलें. नंतर तेथून हरिहरक्षेत्रीं जाण्याचे उद्देशानें निघाले. मार्गांत पुराणप्रसिद्ध वर्धानदी लागली. तेथें स्नानादिविधी जो कर्तव्य तो करून ते क्रमानें तुंगभद्रतीरीं हरिहरक्षेत्रीं दाखल झाले.

या देशास गुहारण्य अशी संज्ञा आहे. कारण येथें पूर्वकालीं गुह नामक दैत्यानें घोर तप केलें होतें. तेव्हां त्यास वर देण्यास्तव स्वतः ब्रह्मदेव प्राप्त झाले असतां, कोणापासूनही मृत्यू नसावा असा त्या दैत्यानें वर मागितला. त्या वेळेस ब्रह्मदेवांनीं त्या दैत्यास असें सांगितलें कीं, वर देणारा असा मी सुद्धां कालावधीनें मरणार आहें. अमर्ग इतरानीं अमर होण्याविषयीं इच्छा करणें मृगजलांत स्नानपान करणें व आकाशवृक्षाच्या पुष्पाचें धारण करणें अशा असंभवनीय वस्तूंची संभावना केल्याप्रमाणें होणार. यास्तव हा आग्रह सोडून इतर वर मागणें श्रेयस्कर आहे. ब्रह्मदेवाचें हें ह्मणणें खरें आहे असें मानून त्या दैत्यानें लोकाविलक्षण अशी एक कल्पना काढली कीं शिव आणि विष्णु यामध्यें अनादिसिद्ध भेद असल्यामुळेंच विचारी व त्रिकालज्ञ अशा ऋषिसमुदायांत प्रसिद्धपणें कोणी शैव व कोणी वैष्णव अशा भेदानें उभय देवांच्या उपासना वेगळाल्या पद्धतीनें चालू आहेत. ब्रह्मसृष्टींत स्वतंत्रतेनें केव्हां विष्णुपासून व केव्हां शिवापासून दैत्यवध झा-

त्याचें ऐकण्यांत येतें, परंतु शिव आणि विष्णु हे उभयतां एकरूप होऊन त्यांनीं दैत्यांचा घात केला असें कधींच घडलें नाहीं. या करितां अमर व्हावें अशी माझी इच्छा ती ब्रह्मदेवापासून युक्तीनच पूर्ण करून घेण्यास ही सवड चांगली आहे असें मनांत कल्पून त्यानें मोठ्या हर्षानें अशी प्रार्थना केली कीं, " हे ब्रदेवा ! जर शिव आणि विष्णु हे एक रूप होऊन माझा अंत करितील तर हरकत नाहीं. पण भिन्न भिन्न रूपानें शिव, विष्णु,विधाता, इंद्र, चंद्र इत्यादि त्रयस्त्रिंशत् कोटी देवगण आहे. यां पैकीं कोणा पासोन ही मला मृत्युभय नसावें अशा वरदानानें मला कृतकार्य करावें." ही त्या गुह दैत्याची विनंति श्रवण करून " बरें आहे, हा वर तुला दिला " असें बोलून ब्रह्मदेव सत्यलोकास चालते झाले.

नंतर त्या वरदानेंकरून उन्मत्त झालेल्या गुहदैत्यानें पुष्कळ दैत्यसेना जमवून त्रैलोक्यांत जयजयकार करण्यास आरंभ केला. तेव्हां इंद्रादि लोकपाल हे दैत्यतेजानें पराजित होऊन पृथ्वीतलीं गुप्तरूपें संचार करूं लागले. लोकपालांचे अधिकारावर आपले दैत्य स्थापनकरून सर्व त्रैलोक्याचा प्रभु गुहदैत्य असता झाला. याप्रमाणें सहस्त्र मन्वंतरें गेलीं. तेव्हां सर्व देव फार दुःखी होऊन ब्रह्मदेवास शरण गेले. त्या कालीं ब्रह्मदेव यांनीं सांगितलें कीं, " थोडेच दिवसांत एकरूपोंन हरिहरात्मक अवतार होऊन मदोन्मत्त झालेल्या गुहदैत्याचा नाश होईल. तुह्मी स्वस्थ असावें."

या संधीसच तुंगभद्रानदीतीरीं वसिष्ट ऋषींनीं बृहस्पतिसव या नांवाच्या यज्ञास आरंभ केला.त्या ब्रह्मर्षींच्या यज्ञमहोत्सवास पृथ्वीवरील सर्व ऋषी वसिष्टाचे आश्रमीं एकत्र जमले असतां,एकेसमयीं हरिहर या उभय देवांत सर्वोत्तम कोण, जग कोणापासून उत्पन्न होऊन कोणाचे ठायीं रहातें, शेवटीं जगाचा लय कोठें होतो, असा परस्परें ऋषींत वाद उत्पन्न झाला. तेव्हां त्या ऋषीसमुदायांत जें शिवभक्त होते ते ह्मणाले सर्वांस कारण महादेव असोन ब्रह्मांडाची उत्पत्ती, स्थिति, लय, त्या ईश्वराच्या सत्तेनेंच होतात. असें

वेदांत स्पष्ट सांगितलें आहे. विष्णुभक्तही विष्णूस मुख्य मानून वेदांतील प्रमाणें सांगून बोलूं लागले. असा परस्परांत मोठा कलह चालला तेव्हां एकाएकीं भयंकर कडकडाट शब्द होऊन पृथ्वीचा कांहीं भाग फाटला व त्यांतून सुलक्षण अशी चतुर्भुज एक मूर्ती निघाली. ती अर्ध भागानें श्वेतवर्ण व अर्ध भागानें कृष्णवर्ण अशी असोन तिचे एका बाजूचे दोन हातांत त्रिशूळ व डमरू, त्या प्रमाणें दुसरे बाजूचे दोन हातांत शंख आणि चक्र, मस्तकाचे अर्ध भागावर जटामुकुट, आणि अर्ध भागावर रत्नमुकुट, एका बाजूस पार्वती व एक बाजूस लक्ष्मी, एकीकडे नंदिकेश्वर, व दुसरे बाजूस पक्षिराज गरुड, असे होते. हें लोकविलक्षण हरिहराचें एक ध्यान पाहून ते सर्व ऋषी चकित होत्साते अभेदप्रतिपादक अशा उपनिषद्वाक्यें करून हरिहरांची स्तुती करण्यास प्रवृत्त झाले. शेवटीं शिव विष्णू हे एकरूपच आहेत असा निश्चय करून हा काळपर्यंत भ्रांतीनें जो विवाद झाला हा व्यर्थ असें समजून ते लज्जित झाले.

या संधीस इंद्रादिलोकपालांसह ब्रह्मदेवाचें त्या स्थलीं आगमन होऊन सर्वांनीं हरिहरात्मक देवाची पूजा केली आणि गुह दैत्याच्या नाशाविषयीं ही त्यास प्रार्थना केली. त्या प्रमाणें मोठा धुरंधर युद्धप्रसंग करून शेवटीं देवांनीं गुह दैत्याचा नाश केला.

नंतर देव आणि ऋषी या सर्वांनीं तुंगभद्रा नदीचे तीरीं निरंतर आपण वास करून जगाचा उद्धार करावा अशा विषयीं देवांची प्रार्थना केली. त्यामुळें त्या स्थलीं एक रूपानें हरिहर निरंतर राहिले अशी पुराणांत कथा आहे.

तुंगभद्रेंत हरिहर तीर्थ आहे. तेथें क्षौरादिविधी करितात. आणखी ही तेथें बहुत तीर्थें आहेत. त्या स्थलीं नदींत रुद्रपद आहे. त्यावर पिंडदानादि करण्याचा प्रचार आहे. देवाचें मंदीर फार मोठें आहे परंतु बहुत दिवसांचें असल्यामुळें आतां फार जीर्ण दशेस पावलें आहे.

भूमंडलांत कलियुगधर्माचे प्राबल्यानें वेदप्रतिपाद्य शुद्धाद्वैत मत मलिन होऊन चार्वाक, बौद्ध, कापालिक, इत्यादि पाखंड

मतें सोज्वल झालीं असतां त्यांचीं खंडनें होऊन निर्मल वैदिक धर्मास परम पूज्य असें जें शुद्ध अद्वैतमत त्याचें मंडन व्हावें याच हेतूनें प्रत्यक्ष शिव सर्वोत्तमांनीं मानवरूपानें अवतार धारण केला. त्यासच जगांत प्रसिद्धपणें जगद्गुरू शंकराचार्य असें मनुष्यमात्र म्हणतात. त्या शंकराचार्यांनीं स्वमतांस विरोधी असोन भिन्न भिन्न पाखंड मतोत्तेजक असा मोठा विद्वान् वादी जनसमुदाय त्यासह वादविवाद करण्यास्तव ते शंकराचार्य स्वामी अपल्या शिष्यांसुद्धां सुप्रसिद्ध शृंगेरीमठ येथून प्रथमतः या क्षेत्रीं आल्यावर हरिहरेश्वराचे संनिध याच देवालयांत आचार्यांचा वादी लोकांबरोबर शास्त्रसंमत कडेकोट वादप्रतिवाद प्रवृत्त झाला. तो शास्त्रीय वाद श्रवणकरण्यासत तद्देशीय व इतरदेशीय असे सहस्रावधी विद्वान ब्राम्हण अग्रेसर असोन या वादांत कोणाच जयपराजय होतो हें पाहण्यास इतर मनुष्यांचाही समाज भारी मिळाला होता. आचार्यांनीं प्रत्येक मताचें योग्य खंडन करून स्वमताचें स्थापन[1] केलें. अशा प्रकारें त्यांनीं समस्त वादी लोकांस कुंठित करून वादाचा शेवट केला. इतक्यांत सर्वांचे समक्ष एकाएकीं हरिहरात्मक मूर्तीच्या मुखांतून असे शद्ब निघाले कीं "शंकराचार्यांनीं पाखंडमताचें खंडन करून स्वमताचा सिद्धांत वर्णिला हेंच वेदाचें खरें रहस्य आहे." अशा प्रकारें त्रिवार शब्द निघाले. नंतर ती वादी मंडळी शंकराचार्यास शरण होऊन सर्वांनीं त्यांस नमस्कार केले अशी कथा शंकरविजयांत आहे.

या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं तीर्थविधि वगैरे करून हाहिहराची उत्तम महापूजा केली. नंतर ब्राह्मणसमुदाय सुरस अन्नांनीं तृप्त केला. अशा प्रकारें त्रिरात्र क्षेत्रवास करून तेथून तुंगा आणि भद्रा या उभय नद्यांचे संगमीं महा नरसिंह क्षेत्र आहे ( त्यास "कुडलगी" ह्मणतात.) तेथें जाण्याच्या उद्देशानें ते चालते झाले. तेथून पुढें ह्मैसूरकर राजे यांचा मुलुख लागतो.

तु[ंगा] भद्रातीरीं बहुत क्षेत्रें जरी आहेत तरी त्या सर्व क्षेत्रांत तुंगा आणि भद्रा यांचे संगमीं महा नरसिंह क्षेत्र आहे. त्याचे

[1] स्थापन.

महात्म्य तुंगामहात्म्यांत अतिशय वर्णिलें आहे त्याविषयीं त्या माहात्म्यांतील प्रमाणें:—

श्लोक.

स्नानं प्रयागे बहुपापनाशनं ॥
दानं गयायां पितृमुक्ति कारकं ॥
शस्तं नराणां मरणंच काश्यां ॥
त्रिभिः समानं भुविनारासिंहं ॥ १ ॥

अर्थ

प्रयाग क्षेत्रीं त्रिवेणी तिर्थाचें स्नान बहुपातकातें नाहींसें करितें. गयाक्षेत्रीं केलेला दान प्रसंग पितरांच्या मुक्तीस कारण होतो. काशी क्षेत्रांत झालेला मृत्यू मोक्ष देतो. या तिन्हीं क्षेत्रांची बरोबरी करण्यास व तसें वर्णणीय फल देण्यास हेंच एक नृसिंह क्षेत्र भूमंडलीं वर्णित आहे.

या क्षेत्रीं देवतांची स्थानें बहुत आहेत. संगमासंनिध संगमेश्वर महादेव व दुसरें एक नृसिंहस्थान फार प्राचीन आहे. त्याची पूजा रामानुज्यांकडे असल्यामुळें त्या देवास पुजाऱ्यांवांचून इतरांचा स्पर्श होत नाहीं. विश्वेश्वर, रामेश्वर, अशीं शिवस्थानेंही आहेत. येथेंहीं एक रुद्रपद आहे त्यास्थानीं पिंडदान वगैरे करितात. आणि भद्रासंगमीं स्नानाचें मोठें फल वर्णिलें आहे. त्याविषयीं त्या महात्म्यांत असें ह्मटलें आहे:—

श्लोक.

तुंगा नारायणः साक्षात् भद्रादेवो महेश्वरः ॥
तुंगभद्रात्मकं विद्धि हरिशंकरयोर्वपुः ॥ १ ॥
आश्रमाणां परित्यागी दुराचारी नराधमः ॥
संगमे स्नानमात्रेण कृतकृत्योनसंशयः ॥ २ ॥

अर्थ

तुंगानदी ही साक्षात् नारायणरूप होय. अशीच भद्रानदी ही शिवरूप आहे. यास्तव हें तुंगभद्रानदीरूप विष्णू आणि शिव यांचें शरीर आहे असें जाणावें. ब्रह्मचर्यादि आश्रम धर्मांचा परित्यागी किंवा कसाही पातकी पुरुष असो त्यानें तुंगा-आणि

भद्रा या उभयनद्यांच्या संगमांत स्नान मात्र करावें त्यायोगें निष्पाप होऊन तो अधम पुरुष कृतकृत्य होतो यांत संशय नाहीं.

या क्षेत्रीं शंकराचार्यांचा मठ आहे. तो कुडलगीचा मठ ह्मणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. येथील मुख्य स्वामी आचार्य यांचे शिष्यपरंपरेंतील असून त्याप्रदेशीं बहुत प्रांतांवर या मठांतूनच धर्मसंबंधीं दंडानुशासनाधिकार चालू आहे. मठाचे खर्चास म्हैसूरकर राजे यांजकडून दहा हजार रुपयांपर्यंत जाहागीर असून शिवाय उत्पन्नही बरेंच आहे.

हा मठ फारच मोठा बांधलेला असोन आंत विद्याशंकराचें मंदिर व शारदांबेचा स्वतंत्र एक चौक, शिवाय त्या मठांतील आजपर्यंत जे स्वामी समाधिस्त झाले त्यांच्या समाधीही पुष्कळ आहेत. याच मठांत रघुनाथराव यांचा मुकाम झाला होता. ते समयीं तेथील स्वामी देशसंचारार्थ गेल्यामुळें स्वामींचें दर्शन रघुनाथराव यांस झालें नाहीं. असो, त्यांनीं या क्षेत्रीं संगमीं स्नान व मुख्य देवतेचें दर्शन इत्यादि क्षेत्रसंबंधीं विधि करून मठांतच ब्राह्मणभोजन घातलें. त्यासमयीं मठांतील व गांवांतील सर्व ब्राह्मण भोजनास आले होते.

या क्षेत्राहून रघुनाथराव निघाले ते शुद्ध तुंगातीरानेंच मार्ग क्रमीत तुंगातीरीं " शिमगी "ह्मणोन मोठें शहर लागतें तेथें आले. तेथून डोंगराळ प्रदेश, झाडीचीं अरण्यें उत्तरोत्तर प्रतिमुक्कामास जास्तच लागत गेलीं. अशा प्रकारें मार्ग क्रमीत ते परशुराम क्षेत्रीं आले. या क्षेत्रास त्या देशांतील प्राकृत लोक " तीर्थनहाळ्ळी " म्हणतात;येथें परशुरामेश्वर नामें करून मोठें जगत्प्रसिद्ध शिवस्थान आहे.तुंगानदीस घांट बांधलेला असोन तेथून कांहीं अंतरावर नदी

---

शंकराचार्यांचे मुख्य चार शिष्यः—पद्मपादाचार्य, हस्तमलक, त्रोटकाचार्य, आणि सुरेश्वराचार्य. हे चार शिष्य असोन त्यांची पुढें शिष्यपरंपरा चालली तेव्हां ठिकठिकाणीं धर्मसंस्थापनेकरितां आचार्यांनीं मठ स्थापिले. त्या मठांत स्वामीनीं राहून पातक्यांस बहिष्कार घालणें, पुनः प्रायश्चित देऊन शुद्ध करणें, वर्षास गुरुपूजा म्हणोन द्रव्य ग्रहण करणें, यांस शासनाधिकार असें ह्मणतात, तो अधिकार चालाविण्यास प्रांत नेमून घेतले आहेत त्या त्या सीमेंत त्यांनीं अधिकार चालवावा असें अनादि सिद्ध चालत आहे.

तच एक रामतीर्थ व दुसरीं ही अनेक तीर्थें आहेत. या क्षेत्रीं सोमवती अमवास्येस हजारों लोक रामतीर्थीं स्नान करून परशुरामेश्वराचें दर्शन करितात. या देवास झैसूरकर राजे यांजकडून तीनशें रुपयांची सालीना नेमणूक चालते. शिवाय देवास इतर उत्पन्न नवसाचें फार आहे. या स्थानीं देवास नवस बहुत लोक करून पुष्कळ लोक आपल्या इष्ठसिद्धीस पावतात. येथें तुंगातीरीं नृसिहाचें मंदीर आहे. तेथें रघुनाथराव यांनीं मुक्काम करून प्रदोष कालीं अर्चन केलें. दुसरे दिवशीं रामतीर्थीं स्नान व इतर देवतांचीं दर्शनें, आणि ब्राम्हणभोजन इत्यादि धर्मकृत्यें करून पुढें पवित्र तुंगातीरीं जगद्गुरु शंकराचार्य यांचा मुख्य मठ शृंगेरी नांवें आहे, आणि मुख्य शंकाराचार्य स्वामी यांनींच स्वहस्तें या मठांत शारदांबेची स्थापना केली, तेथें जाण्यास निघाले.

येथून कोंकणांत उतरण्याचे तोंडीं घांटावर " आगंबा " ह्मणून गांव लागतो. तेथून शृंगेरी आठ कोस रहाते. त्या मार्गांत बहुत झाडी लागली. अनेक प्रकारचे अनेक वृक्ष त्या अरण्यांत फार मोठाले गगनचुंबी आढळले. झाडींतील कांहीं वृक्षांची उंची साठ ऐशीं हात पर्यंत असेल यांत संशय नाहीं. त्यांत चंदनाचे वृक्ष आतिशय असोन शिवाय अरण्यांतील झाडांवर मिऱ्यांचे वेल बहुत आढळले. वेळूंच्या जाती पांच चार आहेत. त्या सर्व जातींचे वेळू त्या अरण्यांत दृष्टीस पडले. अशाच वेतवृक्षांच्या जाळ्या व अनेक प्रकारच्या वनस्पतींचे वेल असोन झाडांची फार दाटी असल्यामुळें मार्ग चालण्यास उष्ण बिलकुल लागत नाहीं. मोठें गहन अरण्य आहे. तथापि त्या मार्गांत घातुक श्वापदांचा उपद्रव बिलकुल नाहीं. ठिकाठिकाणीं स्वच्छ उदकाचे प्रवाह असोन कोश अर्ध कोशाचे अंतरावर झोंपडीं आढळतात. त्यांत रहाणारे लोक नारळी सुपारीचीं झाडें लावून सरकारी सारा देतात. ते लोक नारळी सुपारीचीं झाडें इतकीं लावितात कीं कोश कोश नारळी व सुपारीचेंच दाट वन आहे असा भास होतो. तेथलि हवेच्या व जमिनीच्या गुणांनीं नारळी व सुपारी होण्यास किंचित् ही आयास पडत नाहीं. याचप्रमाणें केळींचीं हीं झाडें येथें बहुत लावितात.

या प्रदेशांत केळीचीं फळें फार उत्तम होतात. तशीं इकडील प्रांतांत होत नाहींत. अशाप्रकारें विलक्षण अरण्याची शोभा पाहून मनास अत्यंत संतोष वाटतो. ईश्वराची करणी अगाध आहे असा अंतःकरणाचा ग्रह झाल्यावांचून राहत नाहीं. असो, आतां शृंगेरी क्षेत्राविषयीं थोडें लिहिणें आहे तें लिहूं.

शृंगेरी हें स्थान सह्याद्रीचे शिखरावर तुंगा आणि भद्रा यांचे उत्पत्तिस्थानासंनिध आहे. तें स्थल पाहिलें ह्मणजे हें खचितच तपोवन असावें असा मनाचा निश्चय होतो. तें ठिकाण शृंगऋषीचा पिता जो विभांडक ऋषी याचा आश्रम होय. तेथून पांच कोसांवर तुंगानदीचा उगम आहे त्या स्थलीं शृंगऋषीचा आश्रम असोन वराह नामें मोठा पर्वत आहे. या पर्वताच्या एक्या भागांतून तुंगा व एक्या भागांतून भद्रा अशा पवित्र नद्या निघाल्या आहेत.

क्षेत्रमहात्म्यांत अशी कथा आहे कीं विष्णूनीं वराह अवतार धारण करून अवतारकृत्य समाप्त झाल्यावर तो वराहदेह त्या स्थलीं स्थापन केला. तोच पर्वतरूपानें तेथें आहे. त्या पर्वतरूपी वराहाच्या एक्या दाढेंतून तुंगा व एक्या दाढेंतून भद्रा, नेत्रापासोन नेत्रावती, मस्तकापासोन वाराही अशा चार नद्यांचें उत्पत्तिस्थान तो पर्वत आहे.

शृंगेरी गांवाजवळ एक लहान पर्वत आहे त्यावर उत्तम बांधीव मंदीर असोन आंत स्वयंभू शिवलिंग आहे. त्यास विभांडकेश्वर ह्मणतात. हें शिवलिंग विभांडक ऋषीनीं आपल्या नांवानें स्थापिलें. या पर्वतावर जाण्यास उत्तम पायऱ्या केल्या आहेत. पर्वतावरील मंदिराचे आसमंतात् धर्मशाळा असोन ती जागा अत्यंत रमणीय दिसते. विभांडकेश्वरास पूजा नैवेद्य वगैरे राजोपचार शंकराचार्यांचे मठांतून होतात. आचार्य यांचे मठासन्निध तुंगा नदीस बांधीव घांट असोन तेथें पाणी फार स्वच्छ व अतिमधुर असतें. तेथें मत्स्यांस बिलकुल उपद्रव नसल्यामुळें नदींत अतिशय मत्स्य आहेत. तेथील तीर्थाचा व देवतेचा महिमा क्षेत्र महात्म्यांत अतिशय वर्णिला आहे. येथें पर्जन्याचें अवर्षण

कधींही होत नाहीं असा अनुभव असोन क्षेत्रमहात्म्यांतही असें-च लिहिलें आहे. त्याप्रमाणें येथें प्रतिवर्षी अतिशय पर्जन्य असतो.

मलयाचल प्रदेशीं केरल देशांत जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्य यांचा अवतार झाला तो वृत्तांत शंकरविजयांत वर्णिलाच आहे. पुढें अल्पवयांतच आचार्यांनीं बदरिकाश्रमीं जाऊन व्यासाश्रमाचे सन्निध थोडे दिवस वास केला. त्या अवकाशांतच ब्रह्मसूत्रादि ग्रंथांवर भाष्यें केलीं. नंतर काशीक्षेत्रीं येऊन तेथें पुष्कळ वादीवृंदाचा पराजय करून सर्वांस स्वमतानुयायी[1] केलें.

नर्मदा तीरीं माहिष्मती नामक नगरी आहे तीस सांप्रतकालीं महेश्वर असें ह्मणतात. तेथें कर्मकांडाभिमानी मंडनमिश्र नांवानें प्रसिद्ध असा मोठा विद्वान ब्राह्मण असोन तो आपल्यास पूर्वमीमांसाप्रवर्तक आचार्य असें ह्मणवीत असे. कर्मकांडाचे उद्धारार्थ साक्षात् ब्रह्मदेव कण्वशाखेंत या महा पुरुषाचे रूपानें भूमंडळीं जन्मले असोन साक्षात जैमिनी ऋषीच्या शिष्यशाखेंत हे मंडनमिश्र वरिष्ठाधिकारी असत. कांहीं कारणास्तव सरस्वतीस दुर्वास ऋषींचा शाप झाल्यामुळें ती प्रत्यक्ष भूलोकीं अवतरली होती. तीच देवी "उभयभारती" या नांवानें मंडनमिश्र यांची स्त्री होती झाली. त्या धुरंधर कर्मवादी पुरुषाचा शिष्यसमुदायासह पराजय करावा याच उद्देशें दिग्विजय करितां करितां शंकराचार्य स्वामीमहाराजांचें त्या क्षेत्रीं ( माहिष्मतीस ) आगमन झालें. नंतर त्यांशीं ( मंडनमिश्राशीं ) आचार्यांचा कांहीं दिवस मोठ्या निकरानें श्रुतिस्मृतिसंमत असा वादविवाद झाला. तो श्रवण करण्यास्तव कर्म, उपासना व सांख्य या व आणखीही भिन्न भिन्न मताचे प्रवर्तक असे सहस्त्रावधी तपोनिष्ठ व इतर ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यांचे थवेचे थवे एकत्र जमले होते. वाद समाप्तीस कर्मकांडोत्तेजक जो पूर्वमीमांसाग्रंथ तो तमोराशीसारिखा निष्प्रभ करून आचार्यांनीं अद्वैत ब्रह्मवस्तुप्रतिपादक जो उत्तरमीमांसाग्रंथ तो बहुतापघ्न[2] वासंतिक[3] चंद्रप्रभेसारिखा सोज्वल

---

१ आपल्या मतांस अनुसरणारे. २ शांती देणारा ३ वसंत ऋतूसंबधी.

केला. हेंच एक अपूर्व कृत्य झालें असें नाहीं, तर वादप्रसंगांत त्यांची ( मंडनमिश्रांची ) सकृत्पाठी, द्विपाठी, त्रिपाठी अशी अशी विद्वान शिष्यमंडळी व स्वतः ते ( मंडनमिश्र ) आणि त्यांची स्त्री [ उभयभारती ] या सर्वांस निरुत्तर असे कुंठित करून शेवटीं गृहस्थाश्रमी असे जे मंडनमिश्र यांस शंकराचार्यांनीं सन्यास देऊन सुरेश्वराचार्य या नामानें आपल्या शिष्यमंडळींत त्यांस ( मंडनमिश्रांस ) वरिष्ट अधिकारी केलें. त्या समयीं मंडनमिश्रांची स्त्री उभयभारती ही ब्रह्मलोकीं जाऊं लागली असतां आचार्यांनीं तिची स्तुती करून तुंगभद्रातीरीं शृंगेरी मठांत आचंद्रार्क[1] आपलें सन्निधान असावें अशा विषयीं प्रार्थना केली असतां तें ह्मणणें देवीनें मान्य केलें.

असें स्तुत्यत्यक्त करून शिष्यांसह आचार्य हे शृंगेरी मठांत लवकरच दाखल झाले. पुढें थोडक्याच अवकाशांत आचार्यांनीं रमणीय अशीं दोन मंदिरें बांधवून एकांत शारदांबा नामानें सरस्वतीची व एकांत विद्याशंकर या नांवानें शिवलिंगाची स्थापना केली. नंतर कांहीं कालानें आचार्यस्वामींचें अवतारकृत्य समाप्त झाल्यावर ते कैलासपर्वतावर जाऊं लागले तेव्हां त्यांनीं चार दिशेस चार मठ करून तेथें आपल्या शिष्यांची संस्थापना केली. त्यांत शृंगेरीमठामध्यें सुरेश्वराचार्य यांस व्याख्यानसिंहासनाधीश्वर अशी पदवी देऊन स्थापिलें. ही सविस्तर कथा विद्यारण्यकृत शंकरविजयांत आहे. या मठास सालीना उत्पन्न सुमारें दीड लक्ष रुपये आहे. शिवाय शिष्यमंडळीकडील पुष्कळ मदत पोंहचत असून ठिकठिकाणचे राजेरजवाडे यांजकडूनही वर्षासनें आहेत. हा मठ बहुत मोठा बांधलेला असोन आजपर्यंत त्या मठांत परंपरेनें जे स्वामी झाले त्या सर्वांच्या समाधी मठांतच आहेत. विद्यारण्यांचीही समाधी तेथेंच झाली आहे असें सांगतात. मठांत व त्यांचे इलाख्यांत जीं अपराधी मनुष्यें, त्यांस शिक्षा करण्यास्तव पारपत्यागार ( न्यायाधीश ) असोन मुख्य कारभारी, शास्त्री, आश्रित, वैदिक, चारी वेदांचे पाठ करणारे ब्रा-

१ सूर्य चंद्र आहेत तोंपर्यंत.

ह्मण, ज्योतिषी, कारकून, दास, दासी, हत्ती, घोडीं, गाई ह्मशी, बागबगीचे, चौघडा वगैरे सर्व सरंजाम राजधानीप्रमाणें आहे.

प्रत्यहीं मठांत स्वामीनींच पूजा केली पाहिजे असें एक देवस्थान आहे. त्यांत मुख्य चंद्रमौलेश्वर या नामाचें शिवलिंग आहे. हें लिंग स्फटिकाचें असून या लिंगाच्या मागून पाहिलें ह्मणजे लिंगमस्तकावर चंद्राकार रेषा आहे ती दृष्टीस पडते. दुसरी रत्नगर्भ हेरंभ या नामें गणपतीची मूर्ति एका जातीच्या रत्नपाषाणाची आहे. त्याचा भस्मी रंग असोन स्फटिका सारखें तेज दिसतें. या मूर्तीचे अधोभागानीं पाहिलें ह्मणजे गणपतीचे उदरांत हिरवीं, पिवळीं वगैरे रंगांचीं रत्नें दिसतात. शिवाय नरसिंह मूर्ति व शालिग्राम आणि श्रीयंत्र वगैरे देव आहेत.

मठांत प्रत्यहीं सात आठशें पात्रें भोजनास असत. गांवांतील लहान मुलेंबायका सुद्धां सर्व भोजनास जातात. प्रतिवर्षी शारदी नवरात्राचा उत्सव फार मोठा होतो. त्या समयीं रथोत्सव होऊन उत्सावाची समाप्ति होते. शिवाय प्रतिशुक्रवारीं शारदांबेचे मंदिरांत दीपोत्सव होऊन रथ निघतो त्या समयीं सर्व राजोपचार भगवतीस अर्पण करितात. अशा प्रकारें साधारण तेथील मठाची स्थिति लिहिली. आतां रघुनाथराव गेले त्या समयीं मठांत स्वामी होते त्यांबद्दल थोडें लिहून समाप्त करूं.

ते वेळेस मठांतील मुख्य अधिकारावर स्वामी होते त्यांचें वय पंचवीस वर्षांपासून अठ्ठावीस, तीस वर्षांचे आंत असावें असें दिसलें. त्यांचे शरीरीं तारुण्य, रूपशालिता, तेजस्विता असोन स्त्री संभोगावेगळ सर्व उपभोग मोठ्या राजाप्रमाणें त्यांस नित्य प्राप्त असतां ही वैराग्यामुळें हे निरीच्छ आहेत असें स्पष्ट भासत असे व यांच्या मानानें त्यांच्या विद्वत्तेचा विचार केला तर इतके थोडे वयांत अशी पूर्ण विद्या कशी प्राप्त झाली याचें मोठें आश्चर्य वाटतें. कारण सांप्रत एक वेद पूर्ण होऊन द्वितीय वेदाचा अभ्यास चालू आहे. न्याय शास्त्रांत पारंगत असून ते प्रत्यहीं विद्यार्थ्यांस न्यायाचे पाठ सांगत असतात. याच प्रमाणें पूर्वमीमांसा शास्त्रांत ते उत्तम विद्वान असोन उत्तरमीमांसा ( वेदांतशास्त्र )

यांत तर अप्रतीमच आहेत. संस्कृतवाणीनें चार चार घटिका-पर्यंत अति सुरस व्याख्यान देतात. अशी सुंदर विद्या केवळ गुरुकृपेच्या शक्तिपातानेंच प्राप्त होणार यांत संशय नाहीं. स्वत:चा आचार पाहिला तर मागील चार घटिका रात्रीं तुंगातीर्थाचें स्नान झाल्या वेळेपासून प्रथम रात्रीचे दहा घटिकापर्यंत त्यांचा काल केवळ देवपूजा व संन्यास धर्माला जीं उचित कृत्यें त्यांत जातो.

रघुनाथरावांनीं शृंगेरीस गेल्यावर प्रथम दिवशीं स्वामीचें दर्शन व दुसरे दिवशीं त्यांचें पादपूजन केलें. त्यावेळेस त्यांनीं मिठाई व फुलांचीं तार्टें भरलेलीं वगैरे पूजासामग्री पुढें ठेऊन नक्त दक्षिणा व रुप्याचा एक मोठा गडवा व पळी आणि पंचपात्र हे चंद्रमौलेश्वराचे अर्चनसमयीं उपयोगांत यावे म्हणून अर्पण करून साष्टांग नमस्कार केला, आणि अशी विज्ञापना केली कीं, अनंत जन्माच्या सुकृताचा फलोन्मुख काल आज आल्यामुळें गुरुचरणारविंद दृष्टिगोचर झालें. आतां चरणारविंदीं विनयपूर्वक हीच प्रार्थना आहे कीं, ब्रह्मसूत्राचा व भाष्यग्रंथाचा उपदेश करून शिष्यास पावन करावें. ती गोष्ट जगद्गुरूनीं कबूल केल्यावर पुनरपि बहुत नमस्कार घालून रघुनाथराव यांनीं यथाविधी शांतिपाठपूर्वक ब्रह्मसूत्राचा उपदेश ग्रहण केला. नंतर सूत्रार्थप्रतिपादक भाष्यग्रंथ श्रवणास आरंभ झाला. याप्रमाणें तीन दिवस गुरुमुखापासोन विधिपूर्वक भाष्यश्रवण झाल्यावर त्यांनीं पुढील यात्रेस जाण्याची विनंति केली. नंतर स्वामींनीं मठांतील देवतेच्या उपभोगाचें जवाहीर इतर नामांकित पदार्थ त्यांस दाखविण्याविषयीं कारभारी यांस आज्ञा केली त्या प्रमाणें त्यांनीं सर्व दाखविलें. पुढें विभांडकेश्वराचें दर्शन व पूजन, ब्राम्हण भोजन वगैरे क्षेत्र संबंधी जो कर्तव्य विधी तो झाल्यावर गुरुस्वामीच्या हेतु प्रमाणें मठांत सर्व मंडळीसह गुरुप्रसाद स्वीकारून तेच दिवशीं जगद्गुरु महाराज यांचे आज्ञेनें उडपी "क्षेत्रीं" जाण्याकरितां हे चालते झाले. तेव्हां आलेले मार्गानेंच परत जाऊन आठ कोशांवर आगंबा गांवीं ते मुक्काम करिते झाले. तेथून जवळच घांट लागतो; हा घांट फार मोठा असोन इंग्रज सरकारांनीं त्यांत

सडक फार प्रशस्त बांधविली आहे. मार्गांत अतिशय दाट झाडी असल्यामुळें ठिकठिकाणीं बंदोबस्ता करितां चौक्या ठेविल्या आहेत. घांटाचे तळीं सोमेश्वर नांमें करून एक शिवस्थान आहे त्यास "घांटसोमेश्वर" असें ह्मणतात. तेथून रघुनाथराव हे क्रमानें सौभरी ऋषीच्या आश्रमीं मुक्कामास आले. त्या स्थानास विद्यमान तिकडील लोक ( हेबरी ) असें म्हणतात. या विषयीं थोडी पुराणांतील कथा लिहितों.

परशुरामानीं आपणांस राहण्या करितां समुद्रापाशीं कांहीं भूभाग मागितला तो त्यानें दिल्यावर तेथें एक स्वतंत्र देश निर्माण केला ते समयीं त्या देशास पवित्रता यावी या उद्देशानें क्षेत्रोपक्षेत्रीं वास करणाऱ्या ऋषी मंडळीस त्या स्थलीं बोलावून आज्ञा केली कीं मी हा देश नूतन निर्माण केला यांत आपण सर्वांनीं आश्रम करून वास करावा. तेव्हां परशुरामाचे संतोषास्त व त्या प्रदेशीं जागोजागीं ऋषींनीं ज्यांची जी उपास्य देवता त्या देवतेची स्थापना करून तीचे संनिध स्वतः राहण्याकरितां आश्रम करिते झाले. त्यांपैकीं कांहीं आश्रम उपलब्ध आहेत. परंतु कालें करून आश्रमाच्या नांवाचे अपभ्रंश झाल्याकारणानें बरोबर ठिकाण लागत नाहीं. यांचें उदाहरण सौभरींचा आश्रम असोन त्यास हेबरी असें म्हणतात. असो, या ठिकाणीं सौभरी ऋषींनीं विष्णूची पद्मनाभ नामानें मूर्ति स्थापन केली. या देवतेचें मंदीर मोठें असोन देवपूजेस ब्राह्मण आहेत. त्या देवास प्राचीन नेमणूक बहुत होती परंतु टिपूसुलतानाचे अमलांत कमी होत होत विद्यमान फारच जुजबी आहे. या स्थलीं देवपूजा वगैरे करून रघुनाथराव हे मार्कंडेय ऋषीचे आश्रमीं जाण्याकारितां चालते झाले.

थोडे अंतरावर मार्गांत त्यांस एक ऋषीचा आश्रम लागला. तेथें मोठें मंदीर असोन मंदीरांत अनंतपद्मनाभ या नांमें करून विष्णु मूर्ति आहे. महाद्वारापुढें पद्मतीर्थ आहे. आसमंतात् धर्मशाळा वगैरे पुष्कळ असोन ती जागा फार रमणीय आहे. हा

---

१ आढळत.

आश्रम कोणते ऋषीचा याचा त्यांस ठिकाण लागला नाहीं. या स्थलीं त्यांनीं देवदर्शन वगैरे कृत्यें केलीं. तेथून पुढें मार्गांत त्यांस वाराही नदी लागली तेथें स्नानादि विधी करून ते मार्कंडेय ऋषींचे आश्रमीं मुक्कामास गेले. या गांवांस तिकडील लोक "हरी एडका" असें म्हणतात.

येथील आश्रमांत मार्कंडेय ऋषींनीं वीरभद्र देवतेची मूर्ति स्थापन केली. या देवतेची त्या प्रदेशीं फार प्रसिद्धी आहे. कारण येथें भूतबाधेनें ग्रस्त झालेले लोक येऊन देवतेची सेवा केल्यावर बाधे पासून मुक्त होतात. पिशाचांनीं ग्रस्त केलेले लोक प्रतिदिवशीं आर्तीचे समयीं आले ह्मणजे त्यांच्यावर पुजारी ब्राह्मण तीर्थोद-कांचें सिंचन करितो तेव्हां त्यांचे शरीरांत संचार होऊन पिशाचें मुक्ती घेतात. असा क्रम तेथें नित्य असतो.

या देवास नियमित नेमणूक बिलकूल नसोन देवस्थानाचा खर्च फार मोठा आहे. परंतु त्या देवाची साक्षा मोठी असल्यामुळें भूत बाधेनें पीडित झालेले असे जे शेकडों मनुष्य त्या बाधेपासून आ-पली मुक्तता करून घेण्यास्तव तेथें येऊन देवास प्रतिवर्षीं कांहीं तरी नियमित द्रव्य देण्याचें कबूल करितात ते मनुष्य आपली कार्यसिद्धी झाल्यावर प्रतिवर्षीं कांहीं तरी द्रव्य संस्थानचे वहि-वाटदाराकडे पावतें करितात. त्या शिवाय इतर लोकांकडून देवास पुष्कळ कानग्याही येतात; या दोन प्रकारच्या उत्पन्नापासून जें एकंदर द्रव्य जमा होतें त्याजवर वर लिहिलेला खर्च मोठा आहे तरी ही भागतो.

या देवाचे पूजक ब्राह्मण आहेत. परंतु संस्थानचा सर्व अधि-कार व देखरेख पहाणारा मुख्य जैनधर्मी आहे. त्यानें देवास स्पर्श न करितां सर्व व्यवस्था करावी असा नियम पूर्वापार चालत आला आहे. त्या स्थलीं कोणीही गेलें असतां त्यांचा सत्कार सं-स्थानांतून होतो; शिवाय गोसावी, बैरागी, या सर्वांस सदावर्त ह्मणून जो उत्तम शिधा मिळतो त्यामुळें त्या लोकांस अन्नाची अड-चण पडत नाहीं. तेथें मुख्य मार्कंडेय तीर्थ आहे तें गांवापासून बरेंच अंतरावर आहे. तेथें सेवेकरी स्नान करून प्रत्यहीं देवाची

सेवा करितात. या प्रदेशांत कित्येक देवस्थानांवर मुख्य अधिकारी जैनधर्मीच आहेत याचें कारण पुढें एक ठिकाणीं आम्हीं लिहिणार आहों. असो, या क्षेत्रीं जें कर्तव्य तें करून तेथून चार कोस उडपी क्षेत्र आहे तेथें रघुनाथराव दाखल झाले.

भार्गवरामांनीं समुद्रतीरीं नूतन प्रदेश निर्माणकरून त्यांत च्यार[1] वर्णांची प्रजा स्थापन केली. त्या नवीन भूप्रदेशांत मुक्तिप्रद अशीं सात क्षेत्रें वर्णिलीं आहेत. त्यांच्या प्रमाणाविषयीं:--

श्लोक

रौप्यपीठं कुमाराद्रिः कुंभकाशी ध्वजेश्वरः ॥
क्रोडगोकर्ण मूकांबा सप्तैते मोक्षदायकाः ॥ १ ॥

अर्थ

१ रजतपीठ २ कुमारपर्वत ३ कुंभकाशीक्षेत्र ४ ध्वजेश्वरमहादेव ५ क्रोडऋषींच्या आश्रमीं शंकर नारायण क्षेत्र ६ गोकर्णक्षेत्र ७ मूकांबादेवी हीं सात स्थानें मनुष्यमात्रास मोक्षप्रद अशीं आहेत. यासप्तसंख्येंतीलच हें एक उडपीक्षेत्र होय. त्याच्या क्षेत्रमहात्म्यांत अशी कथा आहे कीं परशुरामांनीं समुद्रापासोन जो भूभाग घेतला आणि त्यावर स्वतंत्रपणें उत्कृष्ठ देश स्थापन केला, त्या देशांतील प्रजेचें धर्मेंकरून पालन व्हावें या उद्देशानें रामभोज नामक कोणी एक क्षत्रीय त्यास तेथील राज्याभिषेक करून स्वधर्मानें प्रजेचें पालन करण्याकरितां आज्ञा केली. हा राजा मोठा धार्मिक असोन सदाचारसंपन्न होता. यानें बहुत यज्ञकरून शेवटीं अश्वमेध यज्ञ करण्यास निश्चय केला तेव्हां क्षेत्रोपक्षेत्रींचे ब्राह्मण व आश्रमांतील ऋषी आणि दिग्विजयांत पराजित केलेले सर्व राजे त्या यज्ञमहोत्सवा करितां आणिले होते. त्या समयीं स्वतः रामभोजराजानें महेंद्राचलावर जाऊन आपल्या आगमनानें अश्वमेध सुफल होईल यास्तव कृपा करून यज्ञमहोत्सवांत अत्यावश्य येणें व्हावें अशा प्रकारें परशुरामाची प्रार्थना केली. ती विनंति श्रीपरशुरामांनीं मान्य केल्यावर त्यांनीं स्थित[2] होण्यास योग्य अशा महत्वाचें एक सुंदर रजतपीठ ( रुप्याचें सिंहासन ) त्या राजानें निर्माण करवून

---

१ ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र. २ बसणें.

यज्ञमंडपांत योग्य स्थानीं स्थापिलें. नंतर उक्त कालीं राजानें स्त्रीसह दीक्षाग्रहण करून यज्ञकर्मास आरंभ केला. तेव्हांपासोन त्यानें प्रत्यहीं ब्राह्मणांस व इतर मनुष्यमात्रांस इच्छितान्न व बहुद्रव्यदानानें तृप्त केलें असा यज्ञमहोत्सव चालू असतां अकस्मात त्या स्थलीं देवर्षी नारद यांचें येणें होऊन त्यांनीं यज्ञवैभवाची गाथागद्यबद्धस्तुती गायन केली. याप्रमाणें यज्ञसमाप्तीपर्यंत क्रम चालला असतां नियमाप्रमाणें परशुराम त्यास्थलीं प्राप्त झाले तेव्हां राजानें रामचंद्रांचा अत्यंत सत्कार करून आसनार्थ निर्माण केलेलें रजतपीठ समर्पण केलें. नंतर मधुपर्कानें रामचंद्रांची महापूजा केल्यावर परशुराम प्रसन्न होऊन स्वमुखानें असें बोलले कीं:—

“ अरे हे रामभोज राजन्! तूं हें रजतपीठ मला समर्पण केलेंस यावर मी सार्वकाल अनंतेश्वर या नामेंकरून या स्थानींच वास करीन. यास्थलास आजपासून रजतपीठ अशी संज्ञा होईल. या रजतपीठस्थलीं जो मनुष्य येऊन लिंगरूपी अनंतेश्वर म्हणून माझें दर्शन करील त्यास पृथ्वींतील यावत् शिवलिंगांचें दर्शन व पूजन केल्यापासोन जें फल होणार तें एकवार या अनंतेश्वराचे दर्शनमात्रेंकरून प्राप्त होईल. पर्वदिवशीं समुद्रस्नान करून जीं मनुष्यें अनंतेश्वराचें दर्शन घेतील त्यांचे समस्त पितृगण ब्रह्मलोकीं चिरकाल वास करितील. ”

अशा प्रकारें परशुरामांनीं त्या राजास पुष्कळ वर देऊन लिंगरूपानें त्यास्थानीं शाश्वत वास केला.

नंतर अश्वमेधयज्ञ समाप्तीस राजानें ऋत्विजांसह मोठ्या समारंभानें अवभृत स्नान करून ऋत्विजादि ब्राह्मण समुदायास महादानें व तुलादानें वगैरे देण्यास आरंभ केला. तेव्हां सुवर्णादि सर्व धातू, मणिमौक्तिकें, घृत गुडादि रस, इत्यादिकांची लक्षावधी तुलादानें दिलीं. या कारणानेंच त्या देशास “ तौल ” देश असें नांव प्राप्त झालें व ज्या ब्राम्हणांनीं तीं दानें घेतलीं त्यांस ही “ तुलब्राम्हण ” अशी संज्ञा झाली.

मुख्य क्षेत्रनायक अनंतेश्वर वर्णित असोन त्या मंदिरांतच मध्वमतप्रवर्तक आचार्य आहेत त्यांस आनंदतीर्थ असें ह्मणतात. ते

यास्थलींच तपकरून जगन्मान्यतेस पावले. त्याच्या तपश्चर्येचें स्थान मंदिराचे सभामंडपांत आहे. मध्वमती वैष्णव त्यास्थलास अतिपवित्र मानून त्याची पूजा करितात. या देवाचें मंदीर मोठें असोन शिवलिंग तांबूसवर्ण स्वयंभू आहे. परंतु टिपूसुलतान यास्थलीं आला तेव्हां त्यानें या लिंगाचा उच्छेद[१] केल्यामुळें लिंगाचीं शकलें जालीं, तींच पूर्ववत जोडलेलीं आहेत.

मुख्य क्षेत्राधिपती अनंतेश्वर याचे समीप चंद्रमौलीश्वराचें मंदीर आहे. या देवाविषयीं अशी कथा आहे कीं, कांहीं कारणास्तव ब्रह्मलोकीं देवसभा भरली होती त्या सभेस चंद्र येणार असें ऐकून कांहीं देवगणांनीं चंद्राकारितां जें आसन योजिलें होतें तें आपल्या पंक्तींतून काढून किंचित् अंतरावर स्थापिलें. मागून तेथें चंद्र आला तेव्हां त्यानें आपलें आसन मर्यादा सोडून आहे असें पाहून त्यानें प्रश्न केला कीं "देवमंडळींत माझें आसन कां नाहीं ?" तेव्हां देवगण बोलले कीं, "तूं गुरुस्त्रीशीं गमन करणारा असून क्षयरोगी व लांछन[२]युक्त आहेस. या कारणांनीं देवमंडळींत बसण्यासारखी तुझी योग्यता नाहीं." हें त्यांचें भाषण चंद्रास अति दुःखप्रद होऊन तत्काल तो समुद्रतीरीं तप करण्याच्या उद्देशानें या रजतपीठक्षेत्रीं प्राप्त झाला. त्यास्थानीं चंद्रसरोवर नामें तीर्थ कल्पून त्याचे तीरीं चंद्रानें तपश्चर्येस आरंभ केला. बहुतकाळ तप झाल्यावर प्रत्यक्ष महादेव चंद्रास वर देण्याकारितां प्राप्त झाले. तेसमयीं चंद्रानें असा वर मागितला कीं ब्रह्मसृष्टीच्या उपक्रमापासून हा कालपर्यंत कोणासही बसण्याकारितां जें स्थल कधींच प्राप्त झालें नाहीं असें जगद्विलक्षण सर्वोत्कृष्ट स्थान निरंतर मला मिळावें. हें ऐकून शिव बोलले कीं, असें स्थान माझे मस्तकावांचून दुसरें नाहीं. यास्तव तेथेंच तूं निरंतर वास कर. असें बोलून तत्काल शिवांनीं आपल्या मस्तकावर चंद्रास शिरोरत्नाप्रमाणें स्थापिलें. तेव्हां पासून चंद्रमा सर्व देवगणांत पूज्य झाला.

नक्षत्रसमुहास उडुगण ह्मणतात. त्याचें रक्षण करणारा राजा चंद्र तो या क्षेत्रीं पुज्य झाला ह्मणोन उडपी असें क्षेत्राचें नांव

---

१ नाश  २ कलंक.

यज्ञमंडपांत योग्य स्थानीं स्थापिलें. नंतर उक्त कालीं राजानें स्त्रीसह दीक्षाग्रहण करून यज्ञकर्मास आरंभ केला. तेव्हांपासोन त्यानें प्रत्यहीं ब्राह्मणांस व इतर मनुष्यमात्रांस इच्छितान्न व बहुद्रव्यदानानें तृप्त केलें असा यज्ञमहोत्सव चालू असतां अकस्मात त्या स्थलीं देवर्षी नारद यांचें येणें होऊन त्यांनीं यज्ञवैभवाची गाथागद्यबद्धस्तुती गायन केली. याप्रमाणें यज्ञसमाप्तीपर्यंत क्रम चालला असतां नियमाप्रमाणें परशुराम त्यास्थलीं प्राप्त झाले तेव्हां राजानें रामचंद्रांचा अत्यंत सत्कार करून आसनार्थ निर्माण केलेलें रजतपीठ समर्पण केलें. नंतर मधुपर्कानें रामचंद्रांची महापूजा केल्यावर परशुराम प्रसन्न होऊन स्वमुखानें असें बोलले कीं:—

" अरे हे रामभोज राजन् ! तूं हें रजतपीठ मला समर्पण केलेंस यावर मी सार्वकाल अनंतेश्वर या नामेंकरून या स्थानींच वास करीन. यास्थलास आजपासून रजतपीठ अशी संज्ञा होईल. या रजतपीठस्थलीं जो मनुष्य येऊन लिंगरूपी अनंतेश्वर म्हणून माझें दर्शन करील त्यास पृथ्वींतील यावत् शिवलिंगांचें दर्शन व पूजन केल्यापासोन जें फल होणार तें एकवार या अनंतेश्वराचे दर्शनमात्रेंकरून प्राप्त होईल. पर्वदिवशीं समुद्रस्नान करून जीं मनुष्यें अनंतेश्वराचें दर्शन घेतील त्यांचे समस्त पितृगण ब्रह्मलोकीं चिरकाल वास करितील. "

अशा प्रकारें परशुरामांनीं त्या राजास पुष्कळ वर देऊन लिंगरूपानें त्यास्थानीं शाश्वत वास केला.

नंतर अश्वमेधयज्ञ समाप्तीस राजानें ऋत्विजांसह मोठ्या समारंभानें अवभृत स्नान करून ऋत्विजादि ब्राह्मण समुदायास महादानें व तुलादानें वगैरे देण्यास आरंभ केला. तेव्हां सुवर्णादि सर्व धातु, मणिमौक्तिकें, घृत गुडादि रस, इत्यादिकांची लक्षावधी तुलादानें दिलीं. या कारणानेंच त्या देशास " तौल " देश असें नांव प्राप्त झालें व ज्या ब्राम्हणांनीं तीं दानें घेतलीं त्यांस ही " तुलब्राम्हण " अशी संज्ञा झाली.

मुख्य क्षेत्रनायक अनंतेश्वर वर्णित असोन त्या मंदिरांतच मध्वमतप्रवर्तक आचार्य आहेत त्यांस आनंदतीर्थ असें ह्मणतात. ते

यास्थलींच तपकरून जगन्मान्यतेस पावले. त्याच्या तपश्चर्येचें स्थान मंदिराचे सभामंडपांत आहे. मध्वमती वैष्णव त्यास्थलास अतिपवित्र मानून त्याची पूजा करितात. या देवाचें मंदीर मोठें असोन शिवलिंग तांबूसवर्ण स्वयंभू आहे. परंतु टिपूसुलतान यास्थलीं आला तेव्हां त्यानें या लिंगाचा उच्छेद[1] केल्यामुळें लिंगाचीं शकलें जालीं, तींच पूर्ववत जोडलेलीं आहेत.

मुख्य क्षेत्राधिपती अनंतेश्वर याचे समीप चंद्रमौलीश्वराचें मंदीर आहे. या देवाविषयीं अशी कथा आहे कीं, कांहीं कारणास्तव ब्रह्मलोकीं देवसभा भरली होती त्या सभेस चंद्र येणार असें ऐकून कांहीं देवगणांनीं चंद्राकरितां जें आसन योजिलें होतें तें आपल्या पंक्तींतून काढून किंचित् अंतरावर स्थापिलें. मागून तेथें चंद्र आला तेव्हां त्यानें आपलें आसन मर्यादा सोडून आहे असें पाहून त्यानें प्रश्न केला कीं "देवमंडळींत माझें आसन कां नाहीं?" तेव्हां देवगण बोलले कीं, "तूं गुरुस्त्रीशीं गमन करणारा असून क्षयरोगी व लांछन[2]युक्त आहेस. या कारणांनीं देवमंडळींत बसण्यासारखी तुझी योग्यता नाहीं." हें त्यांचें भाषण चंद्रास अति दुःखप्रद होऊन तत्काल तो समुद्रतीरीं तप करण्याच्या उद्देशानें या रजतपीठक्षेत्रीं प्राप्त झाला. त्यास्थानीं चंद्रसरोवर नामें तीर्थ कल्पून त्याचे तीरीं चंद्रानें तपश्चर्येस आरंभ केला. बहुतकाळ तप झाल्यावर प्रत्यक्ष महादेव चंद्रास वर देण्याकरितां प्राप्त झाले. तेसमयीं चंद्रानें असा वर मागितला कीं ब्रह्मसृष्टीच्या उपक्रमापासून हा कालपर्यंत कोणासही बसण्याकरितां जें स्थल कधींच प्राप्त झालें नाहीं असें जगद्विलक्षण सर्वोत्कृष्ट स्थान निरंतर मला मिळावें. हें ऐकून शिव बोलले कीं, असें स्थान माझे मस्तकावांचून दुसरें नाहीं. यास्तव तेथेंच तूं निरंतर वास कर. असें बोलून तत्काल शिवांनीं आपल्या मस्तकावर चंद्रास शिरोरत्नाप्रमाणें स्थापिलें. तेव्हां पासून चंद्रमा सर्व देवगणांत पूज्य झाला.

नक्षत्रसमुहास उडुगण ह्मणतात. त्याचें रक्षण करणारा राजा चंद्र तो या क्षेत्रीं पुज्य झाला ह्मणोन उडपी असें क्षेत्राचें नांव

---

१ नाश २ कलंक.

झालें. चंद्रानें तपाच्या आरंभकालीं पूजनाकरितां जें शिवलिंग-स्थापिलें होतें त्यास चंद्रमौलीश्वर अशी संज्ञा झाली. या चंद्र-स्थापितलिंगाचे दर्शनाचें व पूजनाचें महात्म्य फार वर्णिलें आहे. चंद्रसरोवरतीर्थीं स्नानकरून जो लिंगाचें दर्शन करील तो तात्काल पंचमहापातकापासून मुक्त होईल.असें क्षेत्रमहात्म्यांत वर्णिलें आहे.

उडपीक्षेत्रापासोन तीन चार कोसावर गांव आहे, तेथें मध्वाचार्यांचा ब्राह्मणकुलीं जन्म झाला. नंतर उडपीक्षेत्रीं येऊन अनंतेश्वराचे मंदिरांत तप करीत असतां सर्वत्र त्यांची प्रसिद्धी झाली. एकेदिवशीं कोणीं एक मोठा धनाढ्य वैश्य द्वारकेहून रामेश्वर प्रदेशीं कांहीं मालाचा क्रयविक्रय करण्यास जात असतां उडपी-क्षेत्रासन्निध नौकी ( जहाज ) तुफानांत सांपडून बुडूं लागली ते समयीं त्या वैश्यानें ईश्वराची प्रार्थना केली कीं या संकटांतून मुक्त झालों तर या नौकेंत जीतकें द्रव्य आहे तें अनंतेश्वराचे मंदिरांत जे आचार्य तप करीत आहेत त्यांस मी अर्पण करीन. ईशकृपेनें ती नौका तीरास लागली.

याच संधीस मध्वाचार्य यांस असें स्वप्न पडलेंकीं उद्या कोणी एक वैश्य येथें येऊन तुला द्रव्य देईल तर तें न घेतां नौकेंत जितकें गोपिचंदन भरलें आहे तें सर्व मागून घ्यावें; त्यांत कृष्णाची व बलरामाची अशा दोन मूर्ती सांपडतील त्यांतील श्रीकृष्णमुर्तीची याक्षेत्रीं व बलराम मूर्तीची समुद्रतीरीं गुहतीर्थासंनिध सत्वर स्थापना कर. नंतर दुसरे दिवशीं स्वप्नसंकेताप्रमाणें सर्व द्रव्य घेऊन आचर्यास अर्पण करण्याकरितां त्या स्थानीं तो वैश्य आला तेव्हां त्यानीं ( आचार्यांनीं ) तें न घेतां नौकेंत असलेलें गोपिचंदन मात्र मागितलें. तें सर्व त्या वैश्यानें दिल्यावर त्यांतील एक मोठे गोपिचंदनाचे खड्यांतून सुंदर कृष्णपाषःणाची सुलक्षण अशी कृष्ण-मूर्ति निघाली. याप्रमाणेंच दुसरे खड्यांतून बलरामाची मूर्ति निघाली. नंतर आचार्यांनीं उत्तम मंदीर बांधवून त्यांत मोठ्या समारंभानें कृष्णमूर्तीची स्थापना केली. बलरामाची मूर्ति निघाली ती समुद्रतीरीं गुहतीर्थासंनिध स्थापन करून उभयमूर्तींचें अर्चन स्वतः मध्वाचार्य करूं लागले.

ही कृष्णमूर्ती बालस्वरूपी असोन फार सुंदर द्विभुज आहे. एके हातांत मंथा ( रवि ) दुसरें हातांत मंथन करण्याची रज्जू [ दोरी ] आहे. याविषयीं असा इतिहास ऐकण्यांत आला कीं, द्वारकेस श्रीकृष्ण असतां माता देवकी श्रीकृष्णास असें बोलली कीं, तुझ्या व बलरामाच्या बाललीलेचें सर्व सुख महत्पुण्यानें यशोदेस प्राप्त झालें. मी अत्यंत दैवहीन असल्यामुळें तें सुख मला प्राप्त झालें नाहीं असें म्हणून तिच्या नेत्रांस अश्रू आले. असें पाहून तत्काल कृष्णांनीं पाषाणाच्या दोन मुर्ती तिच्या हातांत देऊन प्रार्थना केली कीं, माते या मूर्तींचें तूं नित्य ध्यान केलेंस ह्मणजे ज्या सुखाची इच्छा करितेस तें सुख तुला प्राप्त होईल. ह्याप्रमाणें माता देवकी त्या मूर्तींचें ध्यान करून कृष्णाच्या व बलरामाच्या बालक्रीडासुखानुभवाप्रत घेऊं लागली. पुढें कालें करून कृष्ण व बलराम हे प्रभासक्षेत्रीं देहत्याग करून स्वकीयधामास[1] गेले. त्या समयीं कृष्णस्त्रियांनीं दुःखें करून त्या दोन्ही मूर्ती द्वारकेंत गोमतीतीर्थी स्थापन केल्या. त्याच मूर्ती गोपीचंदनाचे खड्यांत मिश्र होऊन मध्वाचार्यांस प्राप्त झाल्या. नंतर त्यांनीं वर लिहिल्याप्रमाणें उडपी क्षेत्रीं त्यांची स्थापना केली.

मुख्य प्राणरूप वायूनेंच मध्वमत स्थापन करण्यास्तव पृथ्वीतलीं मध्वाचार्य रूपानें अवतार धारण केला. तें अवतारकृत्य समाप्त झाल्यावर आपले शिष्यसमूहांत आठ नैष्ठिक ब्रह्मचारी होते त्यास संन्यासाश्रम देऊन आपण स्थापन केलेल्या कृष्ण मूर्तीची पूजा करण्यास सांगितलें. नंतर बदरिकाश्रमीं व्यासाश्रमासन्निध देह स्थापन करण्यास्तव आचार्य गेले.

मध्वाचार्य यांनीं स्थापित केलेल्या आठ स्वामींनीं चिरकाल कृष्णाची पूजा केली. पुढें त्या आठ स्वामींनीं ही आपले शिष्यांपैकीं ब्रह्मचाऱ्यांस संन्यास देऊन देवपूजेकरितां स्थापिलें, तेंव्हां पासून आजपर्यंत आठ शिष्यांस ब्रम्हचाऱ्याचे आश्रमांतच संन्यास देऊन त्यांजकडून पूजा करवावी असा क्रम परंपरागत

---

१ वैकुंठ.

चालला आहे. आठ शिष्यांतून दोन वर्षें एक पूजा करितो; नंतर पुढें दुसरा करितो; अशा क्रमानें सोळावे वर्षीं पूजेची पाळी येते. ही सर्व माहिती तेथील एक्या सूज्ञ मनुष्यानें सांगितली.

या स्वामींचे वेगळाले आठ मठ कृष्ण मंदिराचे आसमंतात् असोन नववा मठ कृष्णमंदिरास लागून आहे. या मठांत क्रमानें ज्या स्वामींची पूजा करण्याची पाळी येते ते राहून देवपूजा करितात. या आठ मठांस वेगळालीं जहागीरगांवें व वर्षासनें आहेत. पांच हजारांपासून बारा हजार रुपये पर्यंत प्रत्येक मठास उत्पन्न असोन त्या मानानें कारकून दास, दासी, वगैरे लवाजमा सर्वांचा स्वतंत्र आहे. ब्रम्हचारी आश्रमांतच संन्यास देण्याचा सांप्रदाय असल्यामुळें तेथें रघुनाथराव गेले तेव्हां एक दोन मठांतील स्वामी फारच अल्पवयी ह्मणजे दहा वर्षांच्या वयाचे असे त्यांचे दृष्टीस पडले.

प्रत्यहीं मुख्यदेवासन्निधचे मठांत हजार बाराशें पात्रांचा स्वयंपाक होतो. गांवांतील लहान मुलें, स्त्रियासुद्धां सर्व ब्राह्मण मठांतच भोजन करितात. या खर्चाशिवाय कृष्णमूर्तीचे पूजा नैवेद्याचा व राजोपचारसंबंधी रोजचा खर्च फार मोठा आहे. प्रतिवर्षीं मकरसंक्रांत लागण्याचे पूर्वीं दहादिवस उत्सवास आरंभ होतो. तेव्हां प्रतिदिवशीं तीन हजारांपासून चारहजारांपर्यंत ब्राह्मणभोजन होतें. उत्सवांत नित्यरात्रीं देवाची स्वारी लहान रथांत बसून मिरवते. नंतर नौकेंत बसून चंद्रसरोवरांत देवाची जलक्रीडा होते. तेसमयीं बहुतदीप लाऊन सुशोभित दारूपुष्कळ सुटते. संक्रांतीचे पूर्वदिवशीं रात्रीं देवास थोरले रथांत स्थापनकरून मोठा उत्सव होतो. हा उत्सव पहाण्यास त्या प्रांतांतील हजारों लोक येतात. मध्वमती वैष्णवांस हें स्थान अति पूज्य असल्यामुळें त्या लोकांचा फार भरणा असतो. एकंदर या उत्सवास दहाहजार रुपये खर्च होत असेल असें वाटतें.

उडपीक्षेत्रांतील मुख्यविधीः—चंद्रसरोवरतीर्थीं स्नान व अनंतेश्वर आणि चंद्रमौळीश्वर यांचें दर्शन, त्याचप्रमाणें समुद्रस्नान, तें पर्वदिवसावांचुन ही करण्यास हरकत नाहीं असें क्षेत्र माहात्म्यांत लिहिलें आहे.

ज्याचा स्मार्तकुलांत जन्म झाला असेल त्यानें एकवार तरी शृंगेरीक्षेत्रीं जाऊन तेथील मठाचें वैभव पहावें व शारदांबेसह गुरुदर्शन घ्यावें. याचप्रमाणें मध्वमतानुयायी यांचे कुलांत जन्म झालातर त्यानें उडपीक्षेत्रीं जाऊन मध्वसरोवरीं स्नान करावें व तेथील मठाचें वैभव पाहून मध्वाचार्यांनीं स्थापिल्या मूर्तीसह गुरुदर्शन घेतलें पाहिजे. वर लिहिलेल्या गोष्टी ज्या पासून झाल्या नसतील त्यांनीं इहलोकीं जें मुख्य कर्तव्य तें केलें नाहीं असें झटलें पाहिजे. असो.

रघुनाथराव संक्रांतीचे संधीस उत्सवदिवसांतच त्या क्षेत्रीं गेले. नंतर ह्यांनीं तेथील यात्रेसंबंधी मुख्य कर्तव्यविधी तो करून रथोत्सव वगैरे पाहिला. क्षेत्रापासोन तीन कोसावर समुद्र आहे. त्यांत त्यांनीं विधिपूर्वक मकरसंक्रांतीस स्नान करून आठ मठांतील स्वामींचीं दर्शनें केलीं; शिवाय तेथील रीतीस अनुसरून शक्तीप्रमाणें उत्सवास द्रव्यद्वारा मदत केली. नंतर ब्राह्मणभोजन करून सुब्रह्मण्यक्षेत्रीं जाण्याकारितां ते चालते झाले. आलेल्या रस्त्यांत च मार्कंडेयऋषींचे आश्रमीं वीरभद्राचें स्थान आहे तेथें त्यांनीं मुक्काम केला. तेथून पुढें त्रिगर्त देशाची मर्यादा लागते, व सुब्रह्मण्यास जाण्याचा मार्गही फुटतो. त्या विषयीं येथें थोडी प्राचीन माहिती लिहिणें जरूर आहे ती लिहितों.

पूर्व कालीं या देशांत जैनधर्मी राजाचा अम्मल असोन सर्वत्र जैनांची वस्ती होती. अद्यापिही त्यांत जैनधर्मी लोकांची वस्ती बरीच आहे. ठिकठिकाणा जैनराज्य असण्याचीं चिन्हें दृष्टीस पडतात. सुब्रह्मण्यास जाण्याच्या मार्गांत कारकल ह्मणोन एक फार मोठा गांव आहे, या गांवीं पूर्वीं जैनमताचे विद्वान बहुत होते. जगद्गुरु शंकराचार्य येथें आले तेव्हां जैनांबरोबर धर्मसंबंधी मोठा वाद झाला. त्या वादांत आचार्यांनीं जैनमताचें खंडन करून स्वमताचा उद्धार केला. ते समयीं त्या देशांतील जैनराजासह सर्व जैनधर्मी लोक शरण आले तेव्हां आचार्यांनीं त्या गांवापासोन किंचित् अंतरावर भव्य आणि रमणीय असें एक सुंदर देवमंदीर जैनधर्मी राजाकडोन बांधविलें. त्यांत शेषशायी दे-

---

१ चंद्रसरोवरासच मध्वसरोवर असें म्हणतात.

वाची मोठी भव्य मूर्ती स्थापिली; जैनधर्माभिमानी लोकांच्या पराजयाचें सूचक हें स्थान होय असा तेथें आचार्यांनीं शिलालेख स्थापिला तो विद्यमान आहे. त्या अनंतशयनाचे मंदिरांतच रघुनाथराव यांचा मुक्काम झाला तेव्हां वर लिहिलेला इतिहास एक्या शोधक ब्राह्मणानें त्यांस कळविला. असो. तेथील शेषशायी विष्णूची पूजा करून दुसरे दिवशीं ते पुढें चालते झाले. मार्गांत प्राचीन जैनधर्मी राजाचे मुख्य राजधानीचें गांव मुडबिदरी लागलें तेथें त्यांचा मुक्काम झाला.

मुडबिदरी गांव मोठा आहे. या गांवीं फार प्राचीन कालीं झालेलें असें एक जैनांचें मंदीर आहे. त्यास हजार स्तंभ असोन त्यांत ऋषभ देवाची बहुत मोठी नग्न मूर्ति आहे. या शिवाय आणखी जैनांचीं स्थानें ठिकठिकाणीं आहेत. सन्निध पर्वत आहे त्यावर सुद्धां जुन्या कालांत झालेल्या अशा जैन लोकांच्या अनेक इमारती दृष्टीस पडतात. गांवांत जैनांचा मोठा वाडा आहे. त्यांतील एके चौकांत रघुनाथराव यांनीं मुक्काम केला. तेव्हां तेथें राजवंशांतील राजे होते ते रघुनाथराव यांचे भेटीस येऊन त्यांनीं बहुत आतिथ्य केलें. हा राजपुत्र अल्पवयी असोन फार सुज्ञ आहे असें वाटल्यामुळें रघुनाथरावही त्याचे भेटीस गेले. दीड दिवसाचे मुक्कामांत परस्परें वारंवार भेटी होऊन उभयतांचा परिचय चांगला झाला.

वर लिहिलेले राजवंशाबद्दल तेथें तपास करितां अशी माहिती मिळाली कीं बहूत प्राचीनकालीं येथील राज्य अतिशय मोठें होते. पुढें कालगतीनें क्षीणतेस पावून कमी होत गेलें असतां टिपूसुलतानानें सर्व हरण करून केवल उपजीविकार्थ राजघराण्यास पांचशें रुपये पगार केला होता. कालें करून इंग्रेजी अम्मल झाल्यावर त्यांतही कमी होऊन विद्यामानचे राजास दीडशें रुपये पेनशन मिळतें. त्यांत गुजारा करून तो दिवस काढीत आहे.

तेथून रघुनाथराव निघाले तों मार्गांत नेत्रावती नदी लागली. तिचें स्नान करून दोनप्रहरीं ते धर्मस्थळ क्षेत्रीं मुक्कामास आले. या क्षेत्राविषयीं प्राचीन इतिहास असा आहे कीं, धर्मप्रवर्तक ऋषी आणि स्वायंभू मनू हे

सर्व एकत्र होऊन सत्यलोकीं गेले आणि सर्वांनीं ब्रह्मदेवाची स्तुति करून अशी विज्ञापना केली कीं धर्मसंबंधांत कांहीं संशय प्राप्त झाला असतां तेविषयीं विचार करण्यास भूतलीं कोणतें पवित्र स्थल आपण मानितां तें समजेल म्हणजे आह्मी त्या स्थलीं जाऊन धर्मतत्वाचा खरा निर्णय करीत जाऊं. या प्रश्नाचा विचार ब्रह्मदेवांनीं आपले अंतःकरणांत चिरकाल करून असें सांगितलें कीं, विष्णूंनीं वराहअवतार धारण केला तेव्हां त्यांचे नेत्रापासून नेत्रावती नामक नदी उत्पन्न झाली त्या नदीपासोन एक कोशाचे अंतरावर **मंजनाथ** नामें एक शिवस्थान आहे त्यास महीनाथ ही ह्मणतात. तेथें धर्मसंबंधी विचार करीत जावा. त्याचे स्थलमाहात्म्यानें तुमचें अंतःकरण धर्माचा त्याग करून दुसरीकडे कधीं ही जाणार नाहीं. हें ऐकून सर्व ऋषी व स्वायंभूमनु अत्यंत हर्षयुक्त होत्साते त्या स्थलीं आले. आणि मंजनाथमहादेवाचे सान्निध सभा निर्माण करून धर्मतत्वाचा विचार करणें झाल्यास तेथें करूं लागले; क्षेत्र माहात्म्यांत मंजनाथमहादेवाचें व त्या पवित्रस्थलाचें अतिशय महात्म्य वर्णन केलें आहे.

मंजनाथाचें मंदीर फार मोठें आहे. मंदीराचे मागील बाजूस धर्मबुद्धिप्रद नामें एक गणपतीचें स्थान आहे. देवाचे डावे बाजूस पार्वतीचें मंदीर आहे. देवाचे समोर थोडे अंतरावर **धर्मतीर्थ** आहे. येथील देवाचे खर्चास नियमित नेमणूक वगैरे नाहीं. तरी मंजनाथमहादेव हा या प्रांतांतील हिंदुधर्मी मनुष्यांचा कुलस्वामी असल्यामुळें त्यास फक्त कानगीचेंच ऐशीं हजार रुपये पर्यंत वर्षास उत्पन्न होतें. या शिवाय देवापुढें कोणी नक्त ठेवितील तें, एकूण एक लक्ष रुपये पर्यंत उत्पन्न आहे. त्या रुपयांची व्यवस्था करण्यास पूर्वीं शंकराचार्य यांनीं एक जैनधर्मी मनुष्याची स्थापना केली. त्यांचेच वंशज पुरुष अद्यापि ती व्यवस्था करितात. देवस्थानाच्या द्रव्याची व्यवस्था पहाणारास त्या प्रांतीं मणीगार असें ह्मणतात.

यास्थलीं खर्च फार होतो. प्रतिदिवशीं पांच घटिका दिवसास प्रातःकालचा नैवेद्य होतो; त्यांत गांवांतील मुलें व मुली प-

ह्मास साठ पर्यंत जेवितात, मध्यान्हकालचा नैवेद्य झाला ह्मणजे भोजनास सर्व गांवांतील ब्राह्मणांचें पाचशांहून जास्त पात्र होतें. या प्रमाणेंच सायंकालीं नैवेद्य झाल्यावर पात्रें होतात. या शिवाय देवपूजा करणारे, बिल्वसमर्पण करणारे, वेदस्तुतिकरणारे असे नियमित शंभर ब्राह्मण आहेत. या खेरीज दास,दासी वगैरे देवस्थानाचा मोठा खर्च आहे. ही सर्व व्यवस्था तो जैनधर्मी मनुष्य पहातो. शंकराचार्यांनीं परधर्मी मनुष्यावरच धर्म संबंधाची व्यवस्था कशी सोंपली ही शंका साधरणलोकांस सुद्धां येईल या करितां थोडा इतिहास यास्थलीं लिहिणें अवश्य आहे.

पूर्वीं शंकचराचार्य हे पाखंडमतवादी यांचा पराजय करण्याकरितां शृंगेरीक्षेत्राहून निघाले तेव्हां पद्मपादाचार्य, हस्तामलकाचार्य, त्रोटकाचार्य; आणि सुरेश्वराचार्य त्यासच *नार्तिककार म्हणतात; हे मुख्य चार शिष्य बरोबर असोन चित्तसुखाचार्य, आनंदगिरी वगैरे संन्यासी, शिवाय ब्रम्हचारी, गृहस्थ, असा तीन हजार संख्येचा शीष्यसमुदाय बरोबर होता. क्रमेंकरून ते धर्मस्थलक्षेत्रीं आले तेव्हां त्या क्षेत्रीं पाखंडमतवादी बहुत होते. त्यांचा पराजय करून सर्वांस स्वमतानुयायी केल्यावर त्यांतील एक जैनधर्मी मोठा विद्वान पुरुष आचार्यांस शरण येऊन मजपासोन कांहीं सेवा घ्यावी अशी त्यानें विज्ञापना केली तेव्हां आचार्यांनीं असें सांगीतले कीं,आह्माबरोबर शिष्यसमूह बहुत आहे यांच्या भोजनसंबंधी खर्चाची व्यवस्था तूं पहात जा. त्याप्रमाणें त्यानें (जैनानें) निष्ठापूर्वक ती सेवा केल्यावर त्यास धर्मस्थल येथील धर्मकृत्याची व्यवस्था पहाण्यास नेमलें. आणखी याचप्रमाणें जे जैनधर्मी विद्वान शरण आले त्यांस त्या प्रदेशांतील कांहीं देवस्थानची व्यवस्था पहाण्यास नेमिलें. परंतु त्यांनी देवास स्पर्श न करितां संस्थानची व्यवस्था पहावी असा निर्बंध केला त्या अन्वयें हल्लीं चालत आहे.

धर्मस्थलक्षेत्रसंबंधी कर्तव्य तें सर्व करून सुब्रह्मण्य क्षेत्रीं जाण्यास्तव रघुनाथराव चालते झाले.

---

* आचार्यांचे भाष्यावर नार्त्तिक म्हणून ग्रंथ ज्यांनीं केला ते.

या मार्गांत झाडी पुष्कळ लागत गेली; परंतू थोरली सड सोडून ते सुब्रह्मण्याकडे जाऊं लागले तेव्हां त्यांस अशी किरि झाडी लागली कीं रस्त्यांत सूर्यदर्शन सुद्धां क्वचित् होई. मार्गांत तर मुक्कामास सुद्धां गांव बिलकुल नसोन कोठें एक दोन झोंपडीं दृष्टीस पडत. या कारणानें अरण्यांतच बहुत ठिकाणीं मुक्काम करावे लागले. या वनांत अरण्यगज (हत्ती) बहुत असल्यामुळें नारळीचीं व सुपारीचीं शेतें रक्षण होण्या करितां व मार्गस्थास उपद्रव न होण्याकरितां पर्वतशिखरावरून सर्वकाल बंदुकीचे बार काढणारीं मनुष्यें सरकारांनीं नेमिलीं आहेत. त्या योगानें हत्ती सडकेवर येऊन बहुधा उपद्रव करीत नाहींत. अशा अरण्यांत सुब्रम्हण्यक्षेत्रानजिक एक स्थान आहे तेथें एक जुनाट मंदीर बांधलेलें असोन त्यांत पुरुषभर उंच असें वारूळ आहे. त्याची पूजा तेथून एक मैलावर खेडें आहे तेथील ब्राम्हण येऊन करितो. मंदिराचे समीप लहान नदी वहाते. त्यानदीचे आसमंतात् व मंदिरासमीप फार मोठाले सर्प आहेत म्हणोन तेथील लोकांनीं सांगितलें. याठिकाणीं रघुनाथराव यांचा मुक्काम झाला तेव्हां बरोबरीच्या मनुष्यांनीं फार मोठाले सर्प पाहिले. परंतु कोणास उपद्रव झाला नाहीं. दुसरे दिवशीं पहांटेस ते तेथून निघोन सुब्रम्हण्यक्षेत्रीं दोन प्रहरीं पोंहचले.

सुब्रम्हण्य हें गांव अगदीं लहान खेडें आहे. येथें तांदुळावांचून कोणताही पदार्थ मिळत नाहीं. बैलास गवत सुद्धां मिळण्याची पंचाईत पडूं लागते. एक दोन वाण्यांचीं दुकानें व तेथील देवस्थानाची कोठी असोन संस्थानसंबंधानेंच दहापंधरा ब्राम्हणांची घरें आहेत. शिवाय संस्थानांत चाकरी करणारीं माणसें, वाजंत्री, नृत्य करणाऱ्या वेश्या, यांचीं जीं घरें आहेत तीच काय ती तेथील वस्ती आहे.

या शिवाय त्या क्षेत्रीं देवालयाचे निकट वैष्णवांचा मठ आहे. हा मठ मध्वाचार्य यांचे पूर्वाश्रमीचे बंधूंनीं संन्यास ग्रहण केल्यावर स्थापिला. त्यांच्या शिष्यपरंपरेचे स्वामी तेथें राहून मठांतील मुख्य देवतांची व नृसिंव्ह मूर्तीची पूजा करितात. या मठाचे संबंधानें

तेथें वैष्णावांचीं पांच सहा घरें आहेत. मठांतील खर्च बराच आहे. त्यास जाहरगीर गांवें व वर्षासनें असोन दास, दासी वगैरै खटला पुष्कळ आहे. जे वैष्णव उडपीयात्रेस जातात ते या क्षेत्रीं अवश्य येऊन मठांतील देवाचें व स्वामींचें दर्शन करितात.

येथें सुब्राम्हण्याचें मंदीर आहे. त्याचे पूर्वेस जवळच मोठा गगन चुंबी एक पर्वत आहे. यासच कुमाराद्री म्हणतात. या पासून कुमारधारा नामक नदी निघाली ती देवालयाचे सन्मुख वाहते. या नदीचें माहत्म्य फार वर्णिलें आहे.

**श्लोक**

देशानामुत्तमो देश स्त्रिगर्तो भुवनत्रये ॥
धारातीर्थ परीतोहि कुमारक्षेत्र संज्ञितः ॥ १ ॥
विश्वनाथः कुमारोहिधारा गंगैव केवलं ॥
धाराजलौघघोषेहि वेदघोष इतिस्मृतः ॥ २ ॥
अहो धन्यतरा लोके धारातीर्थनिषेवकाः ॥
तत्रापि धन्या मनुजाः कुमारेश्वरपूजकाः ॥ ३ ॥
धारा धारेति धारेति यो ब्रूयात्सततं नरः ॥
तेन नित्यकृतं पापं क्षणार्धेन विनश्यति ॥ ४ ॥

**अर्थ**

धारातीर्थानें युक्त असें जें कुमारक्षेत्र तें त्रिभुवनांत पूज्य मानिलें आहे. या उभयतांचा एकत्र ठिकाणीं संयोग असल्यामुळेंच पुराण ग्रंथांमध्यें समस्त देशां पेक्षां अधिक असें त्रिगर्त देशाचें अत्युत्तम महत्व वर्णिलें गेलें. कारण कुमार (षडानन )हा साक्षात् विश्वेश्वर आणि धारा ( कुमारधारा नदी ) ही प्रत्यक्ष भागीरथी होय. तेव्हां तेथील तीर्थजलप्रवाहाचा जो शब्द तो वेदघोषच आहे असें समजावें—२ त्या धारातीर्थाचें स्नान आणि कुमारेश्वर देवाचें पूजन, या उभयकृत्यांचें आचरण करणारे जे पुरुष ते भुवनत्रयांत पुण्योत्कर्षानें वर्तणाऱ्या जनसमुदायापेक्षां आधिकच धन्य होत—३ जो मनुष्य निरंतर धारा, धारा, अशाप्रकारें शद्बोच्चार करितो तो तेवढ्याच पुण्याच्या योगानें दिवसरात्र मिळून होणारीं जीं नित्यपातकें त्यांचा अर्धक्षणांत नाश करितो. असें म-

हत्पुण्यसंपादक ज्याचें नामोच्चारण त्या पुण्यतीर्थाचें यथोक्त स्नान, पान, झालें तर कितपत पुण्यसंपादन होईल याचें अनुमानच करितां येत नाहीं.—४

या नदीचें उत्पत्तिस्थान समीप असल्यामुळें पाणी थोडें असतें. तेथून बरेच अंतरावर एक रुद्रपद आहे. त्यापदावर यात्रेकरू लोक पितृतर्पण करितात. मुख्य स्थानाशिवाय आदिसुब्रह्मण्य ह्मणोन एक स्थान आहे. तेथें मंदिरांत वारूळ असोन त्याचीच पूजा करितात. गांवापासोन दोन मैलांवर सुपर्णा नदीचा व कुमारधारानदीचा संगम झाला आहे. या संगमतीर्थीं स्नानदानाचें महात्म्य पुराणांत बहुत सांगितलें आहे. संगमापासोन कांहीं अंतरावर शिवालय आहे त्यास संगमेश्वर म्हणतात.

क्षेत्रापासोन कांहीं अंतरावर एक मोठी गुहा दोन मैल लांबीची आहे असें सांगतात. या गुहेविषयीं अशी कथा आहे कीं, पूर्व युगीं गरुडाचें आणि वासुकी सर्पाचें भयंकर युद्ध झालें. त्यांत गरुडाच्या चंचुप्रहारानें वासुकीसर्पाचा मर्मभेद झाल्यामुळें तो मरणोन्मुख होत्साता, या समयीं गरुडापासोन मला कोणीं तरी सोडवावें असे दीनशब्द बोलूं लागला. अकस्मात् तो ध्वनी नारदांनीं ऐकतांच त्यांनीं त्या स्थलीं येऊन गरुडाचा निषेध केला कीं, "अरे हा तुझा बंधु आहे. याचा वध कसा करितोस. असें निंद्य कर्मकरणें महतांस उचित नाहीं." हें नारद ऋषींचें वाक्य ऐकून गरुडानें वासुकीस सोडिलें.परंतु तेथून जातेवेळीं असें भाषण केलें कीं:—"या समयीं तुला सोडिलें परंतु केव्हां तरी तुझा वध करीन". असे कठोर शद्ब उच्चारून गरुड गेला.नंतर वासूकीसर्प अत्यंत भयभीत होत्साता नारदऋषींस नमस्कार करून आपण मला जीवदान दिलें अशाप्रकारें नारदाची स्तुति करूं लागला. शेवटीं त्यानें नारदांस असें विचारिलें कीं, आतां मी कोठें जावें? शत्रूपासोन माझें रक्षण कोण करील! तेव्हां नारदांनीं सागितलें कीं, पृथ्वीवरील समस्त प्रदेशांत त्रिगर्त देश उत्तम ,त्यांतून ही कुमारपर्वताचे संनिधचा प्रदेश फार पुण्यप्रद असोन तेथें तुला गुप्त रहाण्यास यो-

ग्य अशी एक गुहा आहे तेथें जाऊन रहा. हें स्थान गरुडास विदित नसल्यामुळें तेथें तो येणार नाहीं. शत्रूपासोन कधींच भय नसावें अशी इच्छा असेल तर शंकरास शरण जा. असें बोलून नारद गेले. मग वासूकीसर्प त्यागुहेंत गुप्त राहून शिवप्रीत्यर्थ तप करूं लागला. कालांतरानें श्रीमहादेव तेथें प्रगट होऊन वर माग असें बोलले. तेव्हां गरुडापासोन मला भय नसावें एवढा-च वर मिळावा असें सर्पानें मागितल्यार शंकर बोलले कीं, या गुहे समीप मोठा पर्वत आहे यावर स्वामी कुमार हे तारकासराचा वध करून विश्रांति करितील तेव्हां तूं त्यांस शरण जा, ते गरुडा पासोन तुझें रक्षण करितील. गरुडा पासोन रक्षण कर-ण्याचें सामर्थ्य इतरांस नाहीं. असें बोलून देव अंतर्धान पावले.

कालांतरानें तारकासुराचा वधकाल प्राप्त झाला तेव्हां त्रि-गर्त देशांतील या पर्वतावर इंद्रादिसर्व देवांनीं सुब्रह्मण्यदेवास देवसेनापति करून सेनापत्याचा अभिषेक केला. त्याकालीं अ-भिषेकोदकाची धारा पर्वतशिखरावरून पतन पावली ती नदी रूपानें वहाते असें सर्व देवांनीं पाहून त्या नदीस कुमारधारा हें नांव दिलें, आणि ज्या पर्वतावर सेनापत्याचा अभिषेक करून शिवकुमाराची पूजा केली, त्या पर्वतास कुमारपर्वत अशी संज्ञा दिली. नंतर स्वामींनीं तारकासुराबरोबर धुरंधर युद्धप्रसंग क-रून त्याचा वध केला. त्या युद्धांत स्वामींस बहुत श्रम झाले ह्मणोन विश्रांतीकरितां ते कुमारपर्वतावर आले तेव्हां ब्रह्मा वि-ष्णु शंकर व इंद्रादि देव त्या स्थलीं येऊन सुब्रह्मण्याची बहुत स्तुति करून असें बोललेकीं, आजपासोन हा पर्वत कुमारपर्वत या नामेंकरून जगद्विख्यात होईल. या पर्वता पासोन जी नदी उपन्न झाली तीस कुमारधारा असें ह्मणतील. जे मानव या कुमारपर्वताचे सन्निधानीं वास करितील त्यांस तपावांचून सिद्धि प्राप्त होईल. कुमार-धारातीर्थाचेठायीं जे पित्ररांस श्राद्धदानादिक करितील त्यांचे पितर ब्र-ह्मसदनीं चिरकाल वास करितील. असे अनेक वर पर्वतास व नदीस देऊन सर्व देव आपआपल्या स्थलीं गेले. नंतर एकांतस्थलीं सुब्रह्मण्या नीं विश्रांति केली. त्या समीस वासुकी सर्प तेथें येऊन स्वामींचें स्तवन

करूं लागला. ते त्याचे करूणापर शब्द एकून स्वामी बोलले कीं, तूं कोण आहेस. तेव्हां वासुकीनीं आपला मागील सर्व वृतांत निवेदन केला. आणि प्रबल शत्रूपासोन माझें रक्षण करा असें बोलून स्वामींचे चरण धारिले. तेव्हां कुमार स्वामी बोलले कीं, इतःपर तुजकरितां या पर्वतावर मी निरंतर वास करून सर्व काल तुझें रक्षण करीन. तूं सर्व काल माझे संनिधानीं रहावें. तुला गरुडा पासोन कधींच भय होणार नाहीं. असें बोलून उच्च स्वरानें असा शब्द केला कीं, आजपासोन या त्रिगर्त देशाचे सीमेंत गरुडानें प्रवेश करूं नये. यावर तो आग्रहानें तसें करील तर त्याचा प्राणनाश होईल. त्या दिवसापासोन तो देश (त्रिगर्त देश) गरुड भयावेगळा झाला. हें वृत ज्यांस कळलें असे देशोपदेशींचे कोटिशः सर्प त्या त्रिगर्त देशांत येऊन निर्भयपणें वास करूं लागले. अद्यापि ही त्या प्रदेशीं सर्प फारच आढळतात.

पुढें कुमारधारा नदी संनिध पवित्र अशा त्रिगर्त देशाचे ठायीं वासुकी सर्पासह सुब्रह्मण्य देवानीं वासकेला. अशी कथा वर्णित आहे.

या क्षेत्रीं प्रतिवर्षी हेमंतऋतूंत मार्गशीष मासाच्या शुद्ध पक्षांत स्कंदषष्ठीचा मोठा उत्सव होतो. मार्गशीष शुद्ध प्रतिपदे पासून उत्सवास आरंभ होऊन षष्ठीपर्यंत पांच हजारांपासोन सात हजार पर्यंत प्रतिदिवशीं ब्राह्मणभोजन होतें. हजारों लोक यात्रेस येतात. एकंदर पन्नास हजारांवर यात्रा जमते. मार्गांत व त्या क्षेत्रांत यात्रेकरू लोकांच्या रक्षणाचा बंदोबस्त इंग्रज सरकाराकडून उत्तम प्रकारें राहतो असें सांगतात. उत्सवाचे समाप्तीस रथोत्सव होऊन पूर्णता होते. येथील रथ फार मोठा व अपूर्व असून पाहण्या सारिखा आहे. त्या प्रदेशीं पुष्कळ देवस्थानांस रथ आहेत परंतु असा रथ कोठें आढळत नाहीं. हा रथ म्हैसूर येथील राजानें नवीन करून देवास अर्पण केला. या क्षेत्रीं एक विशेष रीती आहे ती अशी कीं उत्सवांत ब्राह्मणभोजन जाल्यावर सर्व जातीचे लोक मोठ्या सद्भावानें त्या उच्छिष्ट पात्रावर लोळून तें उष्टें अन्न आपले शरिरास चोळितात. या विषयीं तेथील महात्म्यांत कथा आहे तिचा सारांश लिहितों.

कृष्णाचा पुत्र सांब यांचे शरिरा वर कांहीं कारणानें श्वेत कुष्ट रोग जाला. तो जाण्या विषयीं अनेक उपाय केले असून गेला नाहीं. पुढें कालें करून धर्मराजानें अश्वमेध यज्ञ केला त्या कालीं अश्व रक्षणार्थ अर्जुना बरोबर तो सांब ही या सुब्रह्मण्य क्षेत्रीं आला. तेव्हां तेथील उत्सवांत उच्छिष्ट शरिरास लेपन करण्याचा प्रकार पाहून आश्चार्यित होत्साता सांबानें क्षेत्रस्थ ब्राह्मणांस ह्मा विषयीं प्रश्न केला. तेव्हां ब्राह्मणांनीं असें सांगितलें कीं या स्थळीं उच्छिष्ट पवित्र आहे. तूं आपले शरिरास उच्छिष्टाचा लेप केलास तर तुझा कुष्ट नाहींसा होईल. तसें सांबानें केल्या बरोबर तत्काल कुष्ट जाऊन सर्व शरीर शुद्ध झालें. तेव्हां त्यानें भाषण केलें तें खालीं लिहिलें आहे:—

॥ श्लोक ॥

सर्वत्र सर्वक्षेत्रेषु उच्छिष्टमपवित्रकं ॥
अहो क्षेत्र प्रभावोयमुच्छिष्टमतिशुद्धिकं ॥ १ ॥
उच्छिष्ट लेपिनो लोकानिंद्या:सर्वत्राहिस्मृता : ॥
तेनात्र शुद्धतां यांति तद्विनाह्यपवित्रका : ॥ २ ॥
अहोक्षित्रस्यमहाम्यमशक्यं वक्तुमंजसा ॥
महाव्याधौषधीभूतमिदमुच्छिष्टमुत्तमं ॥ ३

अर्थ

सर्व भूमंडलांत उच्छिष्टान्न अपवित्र आहे असें सर्व मानितात. परंतु या सुब्रह्मण्यक्षेत्राचें हें सामर्थ्य कीं, जें उच्छिष्टान्न तेंच शुद्धि करणारें होतें. केवढें आश्चर्य आहे—१ त्या उच्छिष्टान्नाचा शरीरास लेप करणारे लोक ते सर्वदां निंद्य होत हें ठीकच आहे. पण या क्षेत्री तसें करणारे ते अपवित्र मानिले जातात. यास्तव याक्षेत्रीं त्याउच्छिष्टान्नलेपानेंच तेशुद्धहोतात—२ केवढें त्याक्षेत्राचें हें महात्म्य कीं, तें स्पष्टपणें बोलण्यास कोणी शक्तिमान नाहीं अहो. येथीलचें जें उच्छिष्टान्न हेंचे भयंकर कुष्टरोगाचे व्याधीस घातक असें उत्तम औषध आहे असें मी मानितों—३.

---

१ उष्टें अन्न अंगास लावणें; २ उष्टें अन्न.

प्राचीन काळापासून त्या देवस्थानाचे खर्चास दहा हजार रुपयांची नेमणूक आहे. शिवाय कानगी, व देवापुढें जें कोणी कांहीं ठेवतील तें असें उत्पन्न असून त्यांत नित्यखर्च व उत्सवासंबंधीं खर्च होतो. प्रतिदिवशीं देवाची पंचोपचारपूजा आठ वेळा होते. एकवार मात्र अपरान्हकाळीं षोडशोपचार पूजा करितात. प्रति पूजेसमयीं नैवेद्य दोनशेर भाताचा असतो. हा नैवेद्य देवाचे वाजंत्री व नृत्य करणाऱ्या वेश्या यांस मिळतो. प्रत्यहीं महा नैवेद्य झाल्यावर गांवांतील सर्व ब्राह्मण आपल्या कुटुंबांतील मनुष्यां सुद्धां देवळांत भोजनास जातात. सुमारें नित्य पन्नास पात्र होतें.

देवाचें मंदीर फार मोठें आहे. त्यास दोन प्राकार ( कोट ) असून देवाचे डावे बाजूस शिवमंदीर आहे. प्राकारांत परिवार देवतांची स्थानें आहेत. मुख्य गाभाऱ्यांत सुब्रह्मण्य देवाचें दर्शन लोकांनीं घेण्याविषयीं एक मर्यादास्थान कल्पिलें आहे. तेथून पाहिलें ह्मणजे फक्त सोन्यानें मढविलेल्या देव्हाऱ्यांत एक सोन्याचा नाग व मयूरावर बसलेली सहा मुखांची अशी सुब्रम्हण्याची मूर्ति दिसते. या खेरीज कांहींच दिसत नाहीं. देव्हाऱ्या मागें व पुढें आणि बाजूस काय आहे तें विचारिलें असतां पुजारी कांहीं सांगत नाहींत. यांतील काय कारण असेल तें असो.

ऐकिवांत असें आलें कीं, पूर्वी मंदीरांत मुख्य देवता वारूळ असून पुढें सुब्रह्मण्याची मूर्ति स्वयंभू होती. जेव्हां टिपूसुलतानाचा त्या प्रदेशीं अंमल झाला तेव्हां मुसलमान लोकांनीं जबरी करून मूर्ति फोडली व वारूळ खणून टाकिलें. असें झाल्यावर विद्यमान आहेत ह्याच प्रतिमा भाविकजनांनीं स्थापून पूजा करूं लागले; हें खरें वृत्त जर इतरांस समजलें तर यात्रस्थांच्या आस्तिक्य बुद्धीस कमीपणा येईल या हेतूनें सांगत नसतील असें वाटतें.

पूर्वकाळीं कुमार भट ह्मणोन मोठे कर्मवादी उत्पन्न झाले. त्यांनीं सर्व बौद्धांचा व जैनांचा पराजय करून कर्मकांडाचा उद्धार केला. त्यांचें जन्मस्थान हें क्षेत्र होय.

---

१ दिवसा एक वाजतां.

सुब्रह्मण्यक्षेत्रसंबंधीं यात्राविधी व ब्राह्मणभोजन वगैरे करून कुमारधारा व नेत्रावतीचे संगमीं दक्षिण काशी या नामें क्षेत्र आहे तेथें जाण्या करितां रघुनाथराव हे चालते झाले.

या क्षेत्रीं कुमारधारा व नेत्रावती या उभय नद्यांचा संगम झाला आहे. ह्या नद्या कशा प्रकारें कोठून उत्पन्न झाल्या हें वृत्त पूर्वीं लिहिलेंच आहे. असो. येथील संगमाचें महात्म्य बहुत वर्णिलें आहे. संगमाचे संनिध सहस्त्रलिंगेश्वर या नामें महादेवाचें स्वयंभूस्थान असून, मंदीर मोठें आहे. येथील क्षेत्र महात्म्यांत असें लिहिलें आहे कीं, या भूमंडलांत मनुष्यांच्या जन्मापासून झालेल्या पापांचें दर्शनमात्रानें नाश करणारीं अशीं सहस्त्र लिंगे ईश्वरानीं स्थापिलीं आहेत. त्या सहस्त्र लिंगाचा अधिपती कोणी तरी एक असावा या उद्देशें कैलासाहून उमेसहवर्तमान शंकर या क्षेत्रीं आले आणि संगमासंनिध स्वहस्तें लिंग स्थापून त्याची पूजा केल्यावर त्यास सहस्त्रलिंगेश्वर असें नांव दिलें. या लिंगाचे केवळ दर्शनेंकरून त्रिजन्माचीं पातकें दूर होतील असा वर देऊन त्या लिंगांतच उमेसह शंकर लीन झाले. अद्यापि त्या प्रदेशांतील विद्वान ब्राम्हण पातकी मनुष्यांस या क्षेत्रीं येऊन सहस्त्रलिंगेश्वराचें दर्शन व पूजन करावें असें प्रायश्चित्त सांगतात. दक्षिणकाशी क्षेत्रांतील मुख्य तीर्थ उभय नद्यांचा संगम हेंच असल्यामुळें याचें स्नान, सहस्त्रलिंगेश्वराचें पूजन व ब्राह्मणभोजन इतकें कृत्य करून रघुनाथराव हे शंकरनारायण क्षेत्रीं जाण्यास्तव चालते झाले.

या क्षेत्रापासोन पांच सहा मजलांवर मंगळूर गांवासमीप कुमारधारा ही नदी समुद्रास संगत झाली आहे. तेंही पवित्रस्थान असल्याकारणानें त्यास्थलीं जाऊन त्या संगमाचें रघुनाथराव यांनीं स्नान केलें. नंतर क्रमानें मार्ग क्रमीत असतां झाडी बहुत लागली त्यांत कुचला व काजू आणि फणस इत्यादि वृक्षांची दाटी फार असोन ती अरण्यशोभा मनास आल्हाद देणारी असल्यानें मार्गसंबंधीं परिश्रम कमी वाटत असत. थोडे दिवसांतच ते शं-

१ गुप्त. २ मिळणें.

करनारायणक्षेत्रीं जाऊन पोंहचले. या क्षेत्राचे आसमंतात् पर्वत असल्यामुळें अनेक जातीचे वृक्षांनीं तो प्रदेश सुशोभित दिसतो. त्यांत सुपारी व नारळींचे वृक्ष बहुत असल्यानें तो देखावा चमत्कारिक भासतो. या गांवीं ब्राह्मणाची वस्ती बरीच असोन त्यांत कांहीं विद्वान आढळले.

देवाचें मंदीर मोठें विस्तृत असोन आसमंतात् प्राकार आहे. मुख्य मंदिराचे गर्भगृहांत खडक आहे त्यावर होमधेनूचें पद आहे त्यांतून दोन लिंगें निघालेलीं दृष्टीस पडतात. या लिंगांचें मूळ एक असोन वर दोन वेगळे भाग झाले आहेत. देवाचे पूजक ब्राह्मण त्रिकाल नैवेद्य व पूजा उत्तमप्रकारें करितात. वाजंत्री, वेश्या, शिप्ये, अचारी वगैरे खटला बराच आहे. या खर्चास उत्पन्न नियमित असोन कानगी वगैरेचें उत्पन्न शिवाय आहे. या खर्चाची व्यवस्था पहाणारा नियमित आहे. त्याचे हुकमानें सर्व काम चालतें.देवासमोर क्रोडया नामें तीर्थ वत्याचेनिकट क्रोड ऋषीचा आश्रम आहे.याशिवाय अन्यतीर्थें व ऋषीचे आश्रम वर्णित आहेत.

येथील देवाविषयीं क्षेत्रमहात्म्यांत इतिहास मोठा विस्तृत वर्णिला आहे. त्याचा सारांश लिहितों. इंद्रानीं शंबरासुरास मारिलें तेव्हां त्यास दोन पुत्र होते. खर नामानें जेष्ठ, व रट्ट नामानें कनिष्ठ. हे अल्पवयी असल्यामुळें त्यांचे मातुलानें त्यांस आपले घरीं नेऊन तो त्यांचें लालन पालन करूं लागला. कालेंकरून त्या दैत्यपुत्रांस तारुण्य दशा प्राप्त झाल्यावर ते विचार करूं लागले कीं, धनुर्विद्या संपादन करून आपला शत्रू[1] इंद्र याचा नाश करावा. तेव्हां दैत्यगुरु जे शुक्राचार्य यांस शरण जाऊन विद्याभ्यासार्थ गुरुकुली वास करिते झाले. तेथें उभयतांनीं अत्यंत उत्तम गुरुसेवा केल्यामुळें शुक्र संतुष्ट होऊन बोलले कीं, पूर्वीं केवळ तपोबलानेंच असुरांनीं त्रैलोक्याचें निष्कंटक राज्य संपादिलें. त्याप्रमाणें तुम्ही तप करून इंद्रादि देवांस अजिंक्य व्हा. हें त्या उभयतांनीं श्रवण केल्यावर लागलेच गुरुचरणास वंदन करून निर्जनें[2] वनांत गेले आणि तेथें घोर तपास आरंभ केला.

---

१ निर्वैर. २ मनुष्यरहित.

बहुतकाल गेल्यावर ब्रह्मदेवांनीं खर आणि रट्ट या उभय दैत्यांस प्रत्यक्ष दर्शन देऊन अनेक वरदानानें त्यांस संतुष्ट केलें. नंतर दैत्यांनीं स्वर्ग, मर्त्य, पाताल हे तिन्ही लोक स्वबाहुबलानें जिंकून आपले सत्तेंत आाणिलें. त्याकालीं इंद्रादि देव फार दुःख होऊन बृहस्पतीसहवर्तमान ब्रह्मदेवास शरण गेले. तेव्हां ब्रह्मदेवानीं असें सांगितलें कीं, खर आणि रट्ट हे दैत्य आपल्या तपोबलानें सर्व देवगणास अजिंक्य आहेत. तथापि शंकर आणि नारायण या उभय देवांच्या बलानेंच त्यांचा नाश होईल. अन्यथा होणार नाहीं. याकरितां पृथ्वीतलीं क्रोडऋषी तप करीत आहेत त्यांस तुह्मी शरण जा. ते तुमच्या दुःखाचें निवारण करितील. त्यांवांचून तुम्हास कोणी त्राता नाहीं. नंतर क्रोड तीर्थाचे निकट क्रोडऋषी तप करीत होते त्या स्थानीं बृहस्पतीसह इंद्रादि देवगण येऊन त्यांनीं ऋषीस सांष्टांगनमस्कार घातले आणि हात जोडून स्तुति करूं लागले तेव्हां क्रोड ऋषीनीं सर्वांचें उत्तम आतिथ्य करून आगमनाचा हेतु विचारिला असतां बृहस्पतीनीं सर्व वृत्तांत निवेदन केला. तेव्हां तुमचे इच्छेनुरूप हरिहर करितील असा मी यत्न करीन, असें बोलून क्रोड ऋषीनीं उभय देवांची उत्तम स्तुति केली. त्या समयीं ऋषीचे गोष्टांत ( गोठ्यांत ) होमधेनूचे पद उमटले होते त्यांतून अकस्मात् दोन लिंगें निघालीं. त्या समयीं अशी आकाशवाणी झाली कीं, या लिंगांची तूं आराधना कर. ही देववाणी श्रवण करून ते ऋषी चिरकाल उभय लिंगांचें अर्चन व एकाग्रचित्तानें ध्यान करूं लागले असतां एके दिवशीं हरिहर प्रत्यक्ष होऊन वर माग असें बोलले. तेव्हां ऋषीनीं अशी प्रार्थना केली कीं, हे परमेश्वरा त्रिभुवनास खर आणि रट्ट या उभय दैत्यांपासोन फार पीडा होत आहे. या करितां आपण त्यांचा संहार करून जगाचें रक्षण करावें. हें उभय देवांनीं मान्य केलें. आणि दोन्ही दैत्यांचा नाश करून त्या लिंगांतच अंतरधान पावले. तेव्हांपासोन शंकरनारायण नामें करून हें क्षेत्र प्रसिद्ध झालें. या स्थलीं क्रोड ऋषीचा आश्रम व त्याच नामाचें तीर्थ असल्यामुळें

क्रोड क्षेत्र असेंच पुराणांत वर्णिलें आहे. या क्षेत्राचा महिमा पुराणांत अतिशय कथन केला आहे. क्रोडतीर्थी स्नान करून जो मनुष्य शंकरनारायणाचें दर्शन करील त्यास चिरकाल वैकूंठ लाकीं वास होऊन अंतीं शिवाचे ऐक्यरूपास तो पावेल असें ब्रह्मदेवानीं नारदास सांगितलें.

या क्षेत्र संबंधीं कर्तव्य विधी तो करून रघुनाथराव हे कोटेश्वर क्षेत्रीं जाण्यास चालते झाले. मार्गांत दोन दिवस मुक्काम होऊन तिसरे दिवशीं दोनप्रहरीं कोटेश्वर क्षेत्रीं जाऊन पोंहचले.

कोटेश्वर क्षेत्रांत ब्राह्मणांची वस्ती पुष्कळ आहे. देवाचे पूजक ब्राह्मण असोन संस्थानचे खर्चास नेमणूक बरीच आहे. त्यांतूनच सर्व देवस्थानचा खर्च होतो. प्रत्यहीं त्रिकाल नैवेद्य, पूजा होऊन वाजंत्री वाजतात. शिवाय देवस्थानचा खर्च राजोपचारसंबंधीं ही पुष्कळ आहे. देवमंदिराचे गर्भगृहांत खडकावर एक मोठी खांच मणभर धान्य माईल अशी असोन आंत स्वयंभू लिंगें बहुत आहेत. तीं कांहीं सुपारी एवढीं व कांहीं नारळा सारिखीं आहेत. त्या खांचेंत किती ही पाणी घातलें तरी बाहेर येत नाहीं. क्षेत्रीं मुख्य कोटीतीर्थ असोन तें फार विस्तृत आहे. पूर्वीं इंद्रानें वृत्रासुराचा वध केला तेव्हां अनिवार्य ब्रह्महत्येचा दोष प्राप्त झाला त्याचे निवारणार्थ या क्षेत्रीं येऊन इंद्रानें कोटेश्वराची महा पूजा केली व त्या समयीं शंकरास उत्तम ध्वज अर्पिला. तेव्हां पासोन त्या क्षेत्रास व तेथील देवास ध्वजेश्वर नांव प्राप्त झालें. क्षेत्र माहत्म्यांत या क्षेत्राचा व कोटीतीर्थाचा अत्यद्भुत महिमा वर्णिला आहे. या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं तीन दिवस मुक्काम करून क्षेत्र संबंधी तीर्थ स्नान, ध्वजेश्वराची महापूजा, आणि ब्राह्मणभोजन करून पुढें एक कोसावर कुंभकाशी क्षेत्र आहे तेथें ते मुक्कामास गेले.

कुंभकाशी क्षेत्र केवळ अरण्यांत आहे. या स्थलीं ब्राह्मणांचीं घरें दोन तीन असतील. वरकड अन्यजातीचीं सुमारें दहा घरें आहेत. त्यांतच गुरवाचीं घरें दोन आहेत. देवाचें मंदीर लहान

असोन त्या लगत देवापुढें सूर्यपुष्करिणी नामक तीर्थ व त्याचे समीप चंद्रपुष्करिणी तीर्थ अशीं दोन तीर्थें परस्परांचे अगदीं लगत अशीं उत्तम दगडानें बांधलेलीं आहेत. यात्रस्थ प्रथम सूर्यपुष्करिणींत स्नान करून मग चंद्रपुष्करिणी तीर्थाचें स्नान करितात. नंतर मंदिराचे गर्भगृहांत रांजणा सारिखा दगडाचा जमिनींत असलेला असा जलपूरित कुंभ आहे त्याचें दर्शन करितात. हा कुंभ अजमासें दोन हात खोल असोन सार्वकाल उदकानें पूरित असतो. त्या कुंभांतून उदक वाहतें तें सूर्य व चंद्र पुष्करिणींत जातें. मुख्यत्वेंकरून त्या कुंभाचीच त्या स्थलीं पूजा आहे. पुजारी ब्राह्मण आहेत. ते यात्रकरू लोकांस दर्शनाकरितां कुंभावर हरिहरांची धातुमूर्ति ठेवितात. व त्याच मूर्तीची पूजा ही करितात. हें स्थल अति रमणीय दिसतें. देवाचे मंदिरासमीप एक नाग नामाचा पर्वत आहे. याकारणानें तो प्रदेश वृक्षमंडित असोन उभयतीर्थासंनिध देवाचें मंदीर असल्यामुळें फार सुशोभित दिसतो दुसरें, तें स्थल अगदीं निर्मनुष्य असल्यानें तपस्वीजनांस एकांत वास करून तप करण्यास योग्य आहे यांत संशय नाहीं. पंचभूतांचीं पांच लिंगें वर्णित आहेत त्यांतील हें जललिंग असें पुराणांत सांगितलें आहे. या क्षेत्रापासोन समुद्र अगदीं जवळ असल्यामुळें हे क्षेत्र समुद्रतीरींच आहे असें म्हटलें पाहिजे. देवाची पूजा नैवेद्य वगैरे खर्चास नियमित उत्पन्न सालाचें शंभर रुपयांपर्यंत असोन शिवाय देवाचा बाग नारळी व सुपारीचा उत्तम आहे. त्याचें उत्पन्न अजमासें दोनशें रुपये होत असेल. एकंदर तिनिशें रुपये पर्यंत देवास उत्पन्न असून त्यांत सर्व खर्च होतो.

पूर्वीं गौतम ऋषीनीं आपली स्त्री अहल्या ही शापानें शिलारूप केल्यावर गौतम अत्यंत उद्विग्नचित्त होऊन महेंद्र पर्वतीं परशुरामाचे दर्शनास गेले. तेव्हां रामानीं बहुत प्रकारें त्यांचें शांतवन करून समुद्रतीरीं जललिंगरूपानें शंकर वास करितात त्या क्षेत्रीं आश्रम करून राहण्यास आज्ञा केली. नंतर या क्षेत्रीं येऊन गौतमऋषींनीं राहण्यास आश्रम केला. आणि सार्वकाल

शिवपूजेंत ते क्रमूं लागले. तेव्हांपासोन या क्षेत्रास गौतमाश्रम अशी संज्ञा प्राप्त झाली. पुढें कालेंकरून नागपर्वतावर कुंभासुर दैत्य गुप्तवास करून गाई ब्राह्मणास पीडा करूं लागला. एकेसमयीं गौतमाचा शिष्य त्या पर्वतावर दर्भ, समिधा आणावयास गेला असतां त्या असुरानें त्याचा नाश करून हृदयकमल भक्षिलें. हें वृत्त गौतमास यथार्थ कळल्यावर त्यांनी शिवस्तुति करून दैत्यनाशाविषयीं प्रार्थना केली. नंतर त्या कुंभांतून नंदीवर आरूढ अशी शिवमूर्ती निघोन कुंभासुराचा नाश केला. या कारणानें ऋषींनीं क्षेत्रास कुंभकाशी असें नांव दिलें.

याक्षेत्रीं नागाचलावर स्वयंभू गणपतीचें स्थान आहे. याचें महात्म्य पुराणांत फार वर्णिलें आहे. तारकासुर दैत्याबरोबर संग्राम करण्यास स्वामी कार्तिक प्रवृत्त झाले त्याकाळीं अनेक प्रकारचीं विघ्नें येऊं लागलीं तेव्हां अत्यंत खिन्न होऊन त्यानीं शंकराची स्तुति केली त्यासमयीं महादेवानीं त्यास्थानीं प्रकट होऊन स्वामीस उपदेश केला कीं, सर्वकृत्यांच्या आरंभीं गजाननाचें पूजन केलें पाहिजे. त्याप्रमाणें तूं केलें नाहींस. आतां समुद्रतीरीं कुंभकाशी क्षेत्रांत षोडशकलेंकरून पूर्ण असे गणपती प्रत्यक्ष वास करीत आहेत. तेथें तूं शीघ्र जाऊन त्यांचा प्रसाद संपादन कर. मग कुमारपर्वताहून कुमार स्वामी कुंभकाशीक्षेत्रीं आले. आणि गणपतीचें अर्चन करून स्तुति केल्यावर गणपतींनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें आणि निर्विघ्नपणें तारकासुराचा नाश होईल असा वर दिला. या प्रमाणेंच पांडव हे द्यूतांत पराजित होऊन वनवास करीत असतां या क्षेत्रीं आले तेव्हां भिमसेनानें गणपतीची पूजा करून कांहीं दिवस तप केल्यावर गजाननाचा प्रसाद प्राप्त झाला कीं थोडे दिवसांत सर्व कौरवकुलाचा संहार होऊन पृथ्वीचें एकछत्रराज्य तुम्हांस प्राप्त होईल. त्याप्रमाणें कृष्णाचें साहाय्य होऊन पांडवांस राज्यप्राप्ति झाली. देवास अथवा ऋषीस संकट प्राप्त झालें असतां या क्षेत्रीं येऊन गणपतीस जे शरण गेले त्यांचे मनोरथ पूर्ण झाले व होतात. अशा कथा महात्म्यांत बहुत वर्णित

---

१ नांव. २ वर बसणें. ३ पर्वत. ४ युद्ध.

आहेत. प्रति संक्रांतीस सूर्य व चंद्र पुष्कारिणींचें स्नान करून येथील गणपतीचे दर्शनपूजनाचें महात्म्य फार वर्णिलें आहे. यास्थलीं देवास बहुत लोक नवस करून प्रतिसंक्रांतीस दर्शनास येतात- तेसमयीं तेथें मोठा बाजार भरतो. देवास भक्तजनांनीं रुप्याचें कवच व इतर अलंकार करून दिले आहेत. ते संक्रांतीचे दिवशीं देवावर घालितात. गणपतीचे पूजक ब्राह्मण आहेत. त्यांस प्रतिसंक्रांतीस पुष्कळ उत्पन्न होतें. पर्वतावर गणपतीचे दर्शनास जाण्याकरितां सूर्यपुष्करिणीपासोन पायऱ्या बांधिल्या आहेत. त्या चढून गेल्यावर मैदान लागतें. तेथें मंदीर असोन पर्वताचे कपारींत खडकास गणपतीचा स्पष्ट आकार आहे. त्यास शेंदूर वगैरे लावीत नाहींत.

कुंभकाशीक्षेत्रसंबधीं कर्तव्य यात्राविधी तो करून रघुनाथराव यांनीं ब्राह्मणभोजन घातलें.आणि त्या क्षेत्रासंबंधीं यात्रेची समाप्ति केली.

परशुराम सृष्टींत सात मुक्तिक्षेत्रें वर्णित आहेत पैकीं रजतपीठ ( उडपी ), कुमारपर्वत ( सुब्रह्मण्यक्षेत्र ), शंकरनारायणक्षेत्र, ध्वजेश्वरक्षेत्र, कुंभकाशी अशा पांच मुक्तिक्षेत्राच्या यात्रा झाल्यावर मूकांबाक्षेत्र हें सप्तमुक्तिक्षेत्रांतील असल्यामुळें तेथील यात्रा करण्याकरितां रघुनाथराव चालते झाले.

कुंभकाशी क्षेत्राहून तिसरे दिवशीं रघुनाथराव हे मूकांबा क्षेत्रा संनिध आले. तेथें पुराणप्रसिद्ध शिवस्थान असून त्या पुढें भागीरथी तीर्थ आहे. तेथें स्नान व देवदर्शन करून तेथून दीड मैलावर मूकांबा क्षेत्रीं दोन प्रहरीं जाऊन पोंहोचलें. हें स्थान अगदीं पर्वता संनिध असल्यामुळें अनेक वृक्षजातींनें व्याप्त आहे. येणें करून तें क्षेत्र अत्यंत रमणीय भासतें. देवीचें मंदीर फार मोठें असून वरील कळस व खालील कांहीं मंदिराचा भाग सोन्याचे पत्र्यानीं मढविलेला आहे. या संस्थानचा कारखाना सर्व प्रकारानें फार मोठा आहे- त्या मानानें खर्चास उत्पन्न म्हैसूरचे राजाकडून पावत आहे. शिवाय कानगी वगैरेचें उत्पन्न बहूत येतें. हें स्थान मलयापर्वत प्रदेशांतील सर्व लोकांचें मुख्यत्वेंकरून उपास्य असल्यामुळें त्या प्रदेशांतील मोठाले सावकार व यात्रस्थ जे येतात ते संस्थानचे खर्चास मदत करितात.

मुख्य मंदिराचें गर्भगृहांत गौरी व शंकराचें मिळून एकच स्वयंभूलिंग आहे. त्याचा आकार उंच नसोन वरवंटयासारिखा लांबट आहे, मध्यवर्ती उभय लिंगांचा भाग दाखविणारी अशी एक सुवर्ण रेषा स्पष्ट दिसते. त्यांतील वामभाग थोडा जास्त आहे. तो भगवतीचा व सव्य भाग शंकराचा आहे. असें हें शिवगौर्यात्मक एकच शिवलिंग सुवर्णरेषांकित असण्याविषयीं तेथील महात्म्यांत श्लोक आहे तो:—

**श्लोक**

स्वर्णरेखांकितं लिंगं नास्ति नास्ति जगत्रये ॥
वामभागाधिकं लिंगं नभूतं न भविष्यति ॥

**अर्थ.**

सुवर्ण रेषेनें चिन्हित असें शिवलिंग त्रिभुवनांत नाहीं हें सत्य आहे. त्यांत डावा भाग थोडा अधिक व उजवा भाग किंचित् कमी असून उभय भागांची भेद सूचक अशी सुवर्ण रेषा ज्यांचे मध्यभागीं आहे. अशा प्रकारचें शिवलिंग तर आजपर्यंत आढळलें नाहीं, व पुढें ही होणार नाहीं.

मंदिराचें मुख पूर्वेस आहे. त्या पुढें सुपर्णी नामक नदी वहाते. ह्या नदीचे पूर्वेस अगदीं लगत मोठा गगनचुंबी पर्वत आहे. त्यास गौरीपर्वत असें ह्मणतात. त्यास्थलीं एक देवींचें स्थान असून ठिकठिकाणीं पुष्कळ तीर्थें वर्णिलीं आहेत. या क्षेत्रीं ब्राह्मणाची वस्ती पुष्कळ आहे. व देवाचे पूजक ब्राह्मणच असोन देवस्थानच्या खर्चाची व्यवस्था पहाणारा मणिगार स्वतंत्र आहे.

मधुकटभ दैत्याचे वंशांत मूक नामक दैत्य उत्पन्न झाला, त्याणें ब्रह्मदेवाचे अयुष्याचा चतुर्थांश होईल इतके दिवसपर्यंत तप करून कोणतेही देवतेपासून वरदान ग्रहण न करितां केवळ आपले तपोबलानें त्रैलोक्य पादाक्रांत केलें. आणि इंद्रादि देवगणांस आपली सेवा करण्यास लाविलें. असा बहुत काळ गेल्यावर देवगणांस अत्यंत दुःख झालें. तेव्हां ते बृहस्पतीस शरण जाऊन

---

१ देवस्थानच्या खर्चाची व्यवस्था ठेवणारास त्या प्रदेशीं मणिगार असें ह्मणतात.

त्यासह कैलासपर्वतीं शंकरास शरण गेले. त्या कालीं देवगणांची ती स्थिती पाहून महादेवास अत्यंत करुणा आली; नंतर ते सर्व देवगणांसह पार्वतीची स्तुति करूं लागले. तेव्हां भगवती सुप्रसन्न होऊन बोलली कीं, दैत्याचा वधकाल प्राप्त झाला आहे. आतां थोडे दिवसांत त्याचा वध होईल. तुम्हीं स्वस्थ व्हा. नंतर भगवतीनें अत्यंत सुंदर रूप धारण करून क्षेत्राचे संनिध पर्वत आहे त्यावर संचार करूं लागली. दैवगतीनें त्यास्थलीं अकस्मात् मूक दैत्य विहार करण्यास प्राप्त झाला तेव्हां भगवतीचें तें अत्यंत मोहक रूप पाहून काम बाणानें पीडीत होत्साता देवीस स्पर्श करण्याविषयीं उद्युक्त झाला असतां भगवतीनें केवळ हुंकारें करून त्याचें निवारण केलें. तथापि मोहेंकरून पुनः तो दैत्य आलिंगन करण्यास धांवला त्या कालीं जगन्मातेचें व त्याचें युद्ध झालें. तें बारा संवत्सरपर्यंत अहोरात्र होऊन शेवटीं देवीनें त्याचा वध केला.

नंतर इंद्रादि देवगण, ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, आणि वसिष्ठादिऋषी त्या स्थळीं येऊन भगवतीची स्तुति करूं लागले. त्या समयीं विष्णूनीं सहस्त्रनामें करून स्तुति केली. त्यास अंबासहस्त्रनाम असें ह्मणतात. शंकरांनीं अष्टोत्तर शतनामानीं स्तुति केली. अशा प्रकारें सर्वांनीं स्तवन केल्यावर देवीस अत्यंत संतोष होऊन तिनें देवगणांशीं भाषण केलं कीं ज्यास जो इच्छित वर असेल तो त्यानें मागावा. तेव्हां सर्व देव आणि ऋषी यांनीं असा वर मागितला कीं शंकरासह आपण या क्षेत्रीं एकरूपानें वास करून दुष्टांचा नाश आणि साधूंचें रक्षण करावें. हें भगवतीनें मान्य करून शंकरासह एक रूपानें त्या क्षेत्रीं वास केला. मूक दैत्याचा नाश केल्यामुळें मूकांबा या नामानें ऋषी तिची पूजा करूं लागले. व त्याच नामेंकरून हें क्षेत्र त्रैलोक्यांत प्रसिद्ध झालें. अशी कथा क्षेत्रमहात्मीं वर्णित आहे.

नास्तिक मताचें खंडण करून वेद प्रतिपाद्य धर्माचें स्थापन व्हावें याच उद्देशानें शंकराचार्य महाराज दिग्विजयार्थ निघाले ते

१ क्रीडा.

मूकांबा क्षेत्रीं येणार ही वार्ता सर्वत्र प्रसिद्ध झाल्यावर त्या प्रदेशां तील व इतर क्षेत्रोपक्षेत्रींचे मोठे मोठे विद्वान ब्राह्मण व बौद्धादि नास्तिकमतवादी, हे सर्व मात्सर्यानें ग्रस्त होत्साते आचार्यांची हेलना व मानखंडना करून वेदप्रतिपाद्य अद्वैत मताचा पराजय करण्यास्तव या क्षेत्रीं एकत्व जमले. आणि देव मंदिराच्या बाह्य प्राकाराचीं द्वारें बंद करून जें पश्चिम दिशेचें द्वार त्याचे संनिध सर्व मंडळी स्थित होऊन आचार्य येण्याची मार्गप्रतीक्षा करूं लागले. इतक्यांत वसिष्ठवामदेवा सारिखे जगद्वंद्य असे पद्मपादाचार्यादि मुख्य चार शिष्य शिवाय तीन सहस्र शिष्य बरोबर असोन त्यां-सह आचार्यांची स्वारी पश्चिमद्वाराचे निकट प्राप्त झाली. हें पाहून एकत्र जमलेल्या ब्राह्मणांनीं मोठ्या संभ्रमानें व हर्षानें पुढें सरसाऊन शिष्य समुदायासह आचार्यांचा मार्ग शोधून असें भाषण केलें कीं, महाराज ज्या ज्या शास्त्रसिद्धांताचे आह्मी आप-णास प्रश्न करूं त्यांचीं यथायोग्य उत्तरें आपण द्यावीत. नंतर या स्थळीं प्राप्त झालेले हे बौद्धादि मतवादि या सर्वांचा वादांत सर्व विद्वान मंडळीस संमत होईल असा पराजय करावा असें होणें अशक्य असेल तर सर्वत्र चक्रवर्ती, व्याख्यानसिंहासनाधी-श्वर, सर्वतंत्रस्वतंत्र, इत्यादि महत्वांची जी बिरुदावली मिरवितां तिचा सर्वांशानें या सर्वांचे समक्ष त्याग करून मग सर्व शिष्यमंडळीसह निःशंक या मंदिरांत प्रवेश करावा. अशा प्र-कारें त्या लोकांची वाक्यपरंपरा श्रवण केल्यावर किंचित् हा-स्य करून आचार्य बोलले कीं सर्व शास्त्राचे सिद्धांत श्रवण करण्याची तुह्मांस इच्छा असेल तर ज्या शास्त्रांत जो विद्वान असेल त्यानें येऊन प्रश्न करावा त्याचें उत्तर सांगण्यास मी बद्ध-परिकर[1] आहें. नंतर पूर्वमीमांसक पुढें होऊन त्यांनीं त्या शा-स्त्राचे सिद्धांत विचारिले असतां आचार्यांनीं त्यांचीं यथार्थ उत्तरें दिलीं. अशा क्रमानें व्याकरण, न्याय, पतंजली, सांख्य इत्या-दि सर्व शास्त्रांचे सिद्धांत स्पष्ट सांगून सर्वांस निरुत्तर असे केले. मग जे नास्तिकमतवादी वादार्थ प्राप्त झाले होते त्यांशीं

१ कंबर बांधून तयार.

वाद करून त्यांचाही पराजय केला. तेव्हां जगद्गुरु शंकराचार्य हे समस्त भूमंडलास अजिंक्य आहेत अशा निश्चयानें निरभिमानी होत्साात्या त्या विद्वज्जनसमुदायानें तत्काल बंद केलेलें द्वार खुलें केलें. नंतर मोठ्या समारंभानें शिष्यसमुहांसह आचार्यांस मुकांबेचे दर्शनाकरितां त्याच द्वारानें मंदिरांत घेऊन गेले. हें कृत्य होतांच पश्चिमद्वाराचे संनिधानीं सुशोभित असें एक भव्य सिंहासन स्थापून त्यावर सर्वांनीं आचार्यांची पूजा केली. नंतर त्या प्रसंगीं प्राप्त झालेले मोठमोठे विद्वान,व नास्तिकमतवादी या सर्वांनीं ताडपत्रावर जयपत्र देऊन ते आचार्यांचे शिष्य झाले. तीं जयपत्रें शृंगेरी मठांत अद्यापि आहेत. अशी कथा रघुनाथराव यांनीं तेथील ब्राह्मणांचे मुखानीं ऐकिली.

ज्यास्थलीं त्या विद्वज्जन समुहानें आचार्यांचें पूजन केलें तेथें पाषाणाचा ओटा असोन त्यावर लांकडी सिंहासन अद्यापि आहे. त्या जागेस व पश्चिमद्वारास सर्वदां कुलुप असोन त्यावर येथील मुख्य अधिकारी यांची मोहोर असते. असें करण्याचें कारण मलयाचल प्रदेशांतील व केरल देशांतील लोक आचार्यांस अति पूज्य मानून ज्या मार्गानें आचार्य मंदिरांत गेले त्या मार्गानें जाण्यांत त्यांस मोठी प्रतिष्टा वाटते या करितां त्या मार्गानें ( पश्चिमद्वारानें )[1] जाणारांवर त्यांनीं पांच रुपये कर बसविला आहे. व सिंहासनाचें दर्शन ज्यास कर्तव्य असेल त्यानें ही पांच रुपये देऊन दर्शन करावें असा नियम चालू आहे. ज्या समयीं मलवार देशांतील अथवा केरल देशांतील यात्रा देवदर्शनार्थ येते तेव्हां कर दिल्यावर ते लोक कपाटें उघडून त्यांस दर्शन करवितात. प्रतिवर्षीं त्या देशांतील मोठाले सावकार लोक यात्रे करितां येतात ते दर्शनाचा कर देऊन शिवाय संतोषानें सिंहासना पुढें बहुत द्रव्य ठेवितात. या क्षेत्रीं मलवार देशांतील यात्रा हमेष येते. त्या पासोन कराचे उत्पन्न त्या संस्थानास पुष्कळ आहे.

टिपूसुलतानानें मूकांबा क्षेत्राची अतिशय कीर्ति ऐकून तेथील देवतेचा उच्छेद करण्यास्तव तो फौजे सुद्धां क्षेत्रीं आला. तेच

---

१ पश्चिमद्वारानेंच.

दिवशीं रात्रीं त्याचे प्रकृतीची कांहीं विलक्षण स्थिति झाल्यामुळें तो तत्काल त्या क्षेत्राचा त्याग करून चालता झाला. अशा प्रकार तेथील देवतेचे नानाविधचमत्कार क्षेत्रस्थ लोक सांगतात.

सात मुक्तिक्षेत्रें आहेत त्यांतील एक हें मूकांबा क्षेत्र होय. येथील देवतांचीं दर्शनें व तीर्थस्नानें करून रघुनाथराव यांनीं ब्राह्मणांस भोजन दिलें आणि यात्रा विधीची समाप्ती केली.

मूकांबा क्षेत्रा पासोन गोकर्ण मंडलास आरंभ होतो. या मंडलांत सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, आणि ईशान, अशीं पांच क्षेत्रें मुख्य आहेत असें ऐकिल्यावर या पांच क्षेत्रांची यात्रा करण्याविषयीं रघुनाथराव यांचें अंतःकरण अत्यंत उत्सुक होऊन प्रथम सद्योजात क्षेत्रीं मृडेश्वर नामक शिवस्थान आहे त्यांचे दर्शनास्तव ते चालते झाले.

येथं थोडी प्राचीन माहिती लिहिली तर अप्रासंगिक होणार नाहीं करितां लिहितों. शालिवाहन राजाचे वंशांत मयूर वर्मानामक राजा सिंहासनारूढ झाला. त्यानें धर्मस्थला पासोन गोकर्ण मंडला पर्यंत दोडिशें संख्येचीं देवतामंदीरें बांधोन त्यांतील कांहीं मंदिरांत शिवलिंगें व कांहीं मंदिरांत विष्णु मूर्ति स्थापिल्या. तीं स्थानें अद्यापि आहेत. स्थापिलेल्या देवांचे पूजोपचाराकरितां वर्षासनें करून दिलीं तीं अद्यापि चालतात. या गोष्टीस सुमारें सहाशें वर्षें झालीं असतील. पूर्वकालीं या भरतखंडांत असे धार्मिक राजे उत्पन्न होऊन ते लयास गेले परंतु त्यांनीं केलेलीं धर्मकृत्यें त्यांचें स्मरण देण्यास अद्यापि पुष्कळ आढळतात.

मूकांबा क्षेत्रापासोन सद्योजात क्षेत्रीं जाण्यास रघुनाथराव यांस तीन दिवस लागले. मार्गांत बिंदु ऋषीचा आश्रम लागला. विद्यमान त्यास बैदुर असें म्हणतात. येथें बहुत प्राचीन कालचें शिवालय अति उत्तम आहे. त्यांत शिवलिंग स्वयंभू असोन इतर देवतांच्याही पाषाणमय अशा विश्वकर्म्यानें केलेल्या उत्कृष्ट मूर्ति पुष्कळ आहेत. ते विषयीं अशी कथा सांगतात कीं पूर्वीं सीता देवीचे विरहानें श्रीरामचंद्रास बहुतकाल

निद्रा येत नसे. पण बिंदु ऋषीच्या आश्रमीं लक्ष्मणासह आले त्या रात्रीं त्यांस सुखानें निद्रा लागली. तेव्हां फार संतोषी होऊन श्रीरामानीं विश्वकर्म्याचे हस्तानें एक मंदीर करविलें आणि तेथें शिवलिंग स्थापिलें त्यास रामेश्वर असें ह्मणतात. या स्थलीं एक रात्र राहून प्रदोष कालीं रघुनाथराव यांनीं रामेश्वरांचें अर्चन केलें. तेथून क्रमानें मार्गांत खाडी लागली ती उतरून त्यांनीं सद्योजात क्षेत्रीं मृडेश्वर।संनिध मुक्काम केला.

या क्षेत्रांतील मुख्य देवता मृडेश्वरच होय. देवाचें मंदीर समुद्रांत लहान टेंकडीवर आहे. ती टेंकडी तीन बाजूनें समुद्रवेष्ठित असून एक बाजुनें तीस वर जाण्यास पायऱ्या बांधिल्या आहेत. त्या मार्गानें देवदर्शनार्थ जाणारे लोक जातात. परंतु अमावास्या व पौर्णिमेस समुद्राला मोठी भरती आली ह्मणजे तो रस्ता बंद होतो.देवाचें मंदीर मध्यम असून त्याचे सभोंवती प्राकार आहे. देवाचे डावे बाजूस गणपतीचें मंदीर आहे. त्यांत बहुत सुलक्षण गणपतीची चतुर्भुज मूर्ती आहे. प्रथम गणपतीचें पूजन करून नंतर मृडेश्वराचें पूजन करावें असा विधी तेथील ब्राह्मण सांगतात. हें स्वयंभू शिवलिंग दहा घागरी पाणी मावेल ऐवढ्या खाचेंत एक हस्त प्रमाणानें उंच असून त्यास पीठ असल्या सारिखें स्पष्ट दिसतें. याचें कारण खालीं लिहितों.

शिवप्रसादानें रावणास विलक्षण संपत्ति प्राप्त झाली. हें पाहून कुंभकर्णासही शिवप्रसाद संपादन करण्याची इच्छा प्राप्त झाली. तेव्हां त्यानें या क्षेत्रीं येऊन मृडेश्वरासंनिध घोर तपास आरंभ केला, यामुळें इंद्रास अत्यंत भीती वाटोन तो वृद्ध ब्राह्मण रूपानें त्या स्थलीं प्राप्त झाला. त्यास पाहून कुंभकर्णानें प्रश्न केला कीं, मी तपास आरंभ करून बहूत काल झाला अद्याप मला शिवप्रसाद कां प्राप्त होत नाहीं. हें ऐकून ब्राह्मणानें सांगितलें कीं, तूं व्यर्थ तप करितोस कारण, ज्यांचे प्रसादासाठीं तूं तप करितोस त्यांची स्थिति कशी आहे हें तूं जाणत नाहींस असें मला वाटतें. आतां मजपासून श्रवण कर. सर्व काल स्मशानांत वास करून अंमगल; चिताभस्माचीं शरिरास लेप

करणारा आणि नरकपालांत भिक्षा मागून त्यांतच भक्षण करणारा स्त्रीजित असून भूतप्रेतांनीं सर्व काल वेष्टित आहे; शिवाय बीभत्स आणि लोकनिंद्य त्यांचीं कर्में अनेक आहेत; त्यांपासून तुला काय प्रसाद प्राप्त होईल हें मी जाणत नाहीं. असें ऐकतांच कुंभकर्णास अत्यंत क्रोध आला व त्या आवेशांत त्यानें तें लिंग उपटण्याचा यत्न केला तो सफल न झाल्यामुळें त्यानीं क्रोधानें लिंगास पीळ घातला. त्यामुळें तशी आकृति लिंगाची झाली.

असें अमर्याद कुंभकर्णाचें कृत्य पाहून नंदिकेश्वरानें क्रोधयुक्त असें भाषण केलें कीं, तूं रावणाचा बंधू आहेस या कारणानें यासमयीं क्षमा केली. नाहीं तर आतांच तुझा वध केला असता, तुला आपले बलाचा फार गर्व आहे. तर स्वल्प कालांत मनुष्यापासून तुझा वध होईल अशी कथा वर्णित आहे.

देवापासून अर्धे मैलावर गांव आहे त्यांत ब्राम्हणांचीं तीन चार घरें असून देवाचे पूजक तेच आहेत. देवाचे खर्चास नेमणूक पांचशें रुपये आहेत असें ऐकिलें. क्षेत्रीं मुख्य तीर्थ समुद्र आहेच परंत गांवांत कोटितीर्थ आहे. या क्षेत्रीं देवाची महापूजा व तीर्थस्नान आणि ब्राम्हणभोजन करून वामदेव क्षेत्रीं गुणवंतेश्वराचे दर्शनास्तव रघुनाथराव हे गेले.

हें क्षेत्र सडकेपासून थोडे अंतरावर असोन साळीचीं शेतें व नारळी सुपारीचे बाग क्षेत्राचे आसमंतात् असल्यामुळें गाडी वगैरे वाहन जाण्यास मार्ग नाहीं सबब रघुनाथराव यांनीं सर्व खटला सडकेवर ठेऊन कारणापुरता बोजा हमालाकडून गुणवंतेश्वराचे मंदिरापर्यंत नेला. देवमंदिरास प्राकार असोन आंत धर्मशाळा आहे. त्यांत रघुनाथराव यांनीं मुक्काम केला. देवाचें मांदिर मोठें आहे. गर्भगृहांत शिवलिंग असून देवाचे पूजक ब्राह्मण आहेत. देवस्थानचे खर्चास पांचशें रुपये नेमणूक प्राचीनकालापासून चालत आहे आसमंतात् तेरा खंडीं आहेत. त्यांतील प्रत्येक शेतावर सारा म्हटला तर शेरभर धान्य नियमित आहे. त्याचे एकंदर तांदुळ तीन खंडी होतात. या उत्पन्नावर पूजा नैवेद्य वगैरे देवाचा खर्च चालतो. त्या क्षेत्रीं मुख्य कोटितीर्थ वर्णित आहे. यात्रा-

स्थ लोक प्रथम तीर्थस्नान करितात. नंतर शिवमंदिराचे डावे-बाजूस गणपतीचें स्थान जें पुराणप्रसिद्ध आहे त्याची पूजा करून मग गुणवंतेश्वराची पूजा करितात असा क्रम आहे. गांवांत ब्राह्मणांचीं घरें पुजाऱ्या खेरीज दहा बारा आहेत. येथील यात्राविधी मुख्य तीर्थस्नान व गणपती आणि शंकर यांचें पूजन, हे आहेत. ते करून रघुनाथराव यांनीं ब्राह्मण भोजन घातलें. नंतर तेथून अघोर क्षेत्रीं धारेश्वराचे दर्शनार्थ ते चालते झाले. मार्गांत मोठी खाडी लागली ती उतरून होनावर ह्मणोन मोठा ठाण्याचा गांव आहे तेथें त्यांचा मुक्काम झाला. तेथून पुढें धारेश्वर क्षेत्रीं गाड्या वगैरे खटला जाण्यास मार्ग नसल्यामुळें सडकेनें कुमटें ह्मणोन मोठ्या वस्तीचें गांव आहे तेथें खटला रवाना करून सडे गुजवी मंडळीसह मचव्यांत अस्तमानीं बसोन आठ कोस खाडींतून बारा वाजतां रात्रीं अघोर क्षेत्रीं धारेश्वराचे मंदिरांत जाऊन रघुनाथराव यांनीं मुक्काम केला.

या अघोर क्षेत्रांत मुख्य देवता धारेश्वर महादेव वर्णित आहे. याचप्रमाणें कोटितीर्थ मुख्यत्वें असोन या स्थलीं समुद्रस्नानाचें महात्म्य फार सांगितलें आहे. सर्वत्र समुद्रस्नान मनुष्यास सुलभ आहे. परंतु रामेश्वरक्षेत्रीं, गंगासागरसंगमीं, अघोर क्षेत्रीं, आणि गोकर्णास, समुद्रस्नान दुर्लभ मानिलें आहे. मोठ्या भाग्योदयानें या क्षेत्रीं सूर्याचें अथवा चंद्राचें ग्रहण मनुष्यास प्राप्त होतें. तसा योग आला असतां मोठ्या यत्नानें प्रथम कोटितीर्थाचें व नंतर समुद्राचें स्नान करून धारेश्वराचें दर्शन करावें. असें ज्यास घडतें त्याचे पुण्याचा अंत नाहीं असें शंकरांनीं पार्वतीस सांगितलें आहे. ग्रहणपर्वाचा लाभ न झाला तर समुद्रस्नानास उक्त दिवस आहेत. त्यांतून जो दिवस प्राप्त होईल ते दिवशीं प्रथम कोटितीर्थाचें व नंतर समुद्राचें स्नान झाल्यावर देवतादर्शन घ्यावें हाही पुण्ययोग सामान्य नाहीं.

या क्षेत्रीं प्रदोषकालीं अघोरमंत्रानें परमेश्वरपूजेचें महात्म्य बहुत वर्णिलें आहे. या शिवाय सोमवती, अमावास्या, माघकृष्ण चतुर्दशी ( महाशिवरात्र ) दक्षिणायनपर्व, उदगयनपर्व, व्यतिपात,

वैधृती इत्यादि पर्वदिवशीं देवदर्शनाचें अतिशय फळ आहे. शनित्रयोदशीस प्रदोषकालीं पूजा करून सहस्र श्वेतकमलें समर्पण झाल्यावर परमान्नाचा नैवेद्य जो समर्पण करितो तो मनुष्य केवळ शिवरूपच आहे यांत संशय नाहीं. अशा प्रकारें क्षेत्र संबंधी महात्म्य बहुत वर्णिलें आहे. असो.

धारेश्वराचें मंदिर मोठें आहे. मंदिरास प्राकार असोन आंत धर्मशाळा उत्तम आहेत. प्राकाराचे आंतच देवमंदिरासमीप कोटितीर्थ चांगल्या दगडोंनें बांधलेलें आहे. देवस्थानचे खर्चास पांचशें रुपये नेमणूक असोन प्रतिवर्षीं रथोत्सव होतो त्याबद्दल स्वतंत्र नेमणूक पावते. या क्षेत्रासंबंधी उक्त कर्तव्यविधी तो करून ब्राह्मणभोजन घातल्यावर कुमठ्यास सडकचे रस्त्यानें गाड्या वगैरे खटला पूर्वींच गेला होते तेथें रघुनाथराव मुक्कामास गेले. पूर्वीं परशुरामसृष्टींत सात मुक्तिक्षेत्रें आहेत ह्मणोन लिहिलें त्यांतीलच एक गोकर्णक्षेत्र असोन शिवाय गोकर्ण मंडलांत सद्योजातादि पांच क्षेत्रें आहेत असेंही लिहिलें आहे.त्या पांच क्षेत्रांतील मुख्य जें ईशान्यक्षेत्र तेंच गोकर्ण क्षेत्र असें वर्णित आहे. गोकर्णक्षेत्रापलीकडे दहा कोस लांबीवर कारवार नांवाचें एक मोठें बंदर अलीकडे इंग्रजांनीं केलें. त्यास सदाशिवगड असें ह्मणतात. त्याचे समीप तत्पुरुष क्षेत्र असोन मार्ग क्रमानें तर पूर्वींच गोकर्ण क्षेत्र निकट प्राप्त झालें. या कारणानें रघुनाथराव हे कारवार बंदराचे संनिध तत्पुरुष क्षेत्रीं न जातां कुमठे गांवांहून परभारें गोकर्णक्षेत्रीं जाण्यास निघाले. मार्गांत एक मुक्काम करून दुसरे दिवशीं गोकर्णास दहा वाजतां दाखल झाले. तेव्हां त्यांनीं प्रथमतः गणपतीचें दर्शन करून नंतर गोकर्णेश्वराचें व ताम्रगौरीच धुलिंदर्शन घेतलें.

या गोकर्ण क्षेत्रांत तीर्थें, ऋषींचे आश्रम, देवता, शिवस्थानें बहूत असल्यामुळें त्यांचें समग्र वर्णन लिहिणें जरी अतिशय ग्रंथ वृद्धीस कारण आहे तथापि वाचकांचे माहिती करितां थोड्यांत मुख्य देवता आणि तीर्थें आहेत तीं लिहितों.

---

१ खीर. २ मजलेचे कपडे अंगावरून न उतरतां जें दर्शन करितात तें.

मुख्य देव महाबलेश्वर व ताम्रगौरी आणि गणपती असे तीन आहेत. कोटी तीर्थ, रामतीर्थ, समुद्र, हीं तीन तीर्थें मुख्य आहेत. महाबलेश्वरनामक लिंगाचे उत्पत्तीविषयीं महात्म्यांत कथा आहे ती अशीः—

जगाचे उत्पत्ती विषयीं ब्रह्मदेवाची विचारणा चालू असतां अकस्मात त्याचे ललाटापासून महादेव हे रुद्ररूपानें उत्पन्न झाले. तेव्हां ब्रह्मदेवानीं त्यांस सृष्टि निर्माण करण्यास सांगितलें. त्या समयीं रुद्रांनीं पातालांत जाऊन तपास आरंभ केला. या अवसरांत इकडे ब्रह्मदेवानीं प्रथमतः जगास आधारभूत अशी पृथ्वी उत्पन्न करून पुढें सर्व जग उत्पन्न केलें. हें वृत्त पातालतलीं प्रकृतीचे ( रुद्राणीचे ) मुखानें शंकरांनीं श्रवण केल्यावर त्यांस क्रोध आला आणि ब्रम्हदेवकृत पृथ्वीचा भेद करण्यास्तव पातालांतून वर येण्याचा त्यांनीं निश्चय केला. तेव्हां पृथ्वीस फार भय वाटल्यामुळें ती आपलें रक्षण होण्याकरितां गोरूप धारणकरून पातालांत गेली आणि तेथें जाऊन ईश्वराची अशी प्रार्थना केली कीं, आपण जर पातालांतून वर आलां तर हा माझा देह छिन्नभिन्न होऊन अगदीं नाशास पावेल. याकारितां मी सर्व प्रकारें आपल्यास शरण आलें आहें. माझें रक्षण करा. हें ऐकून गोरूप पृथ्वीची प्रभूस अतिशय करुणा आली. तेव्हां रुद्रानीं असें भाषण केलें कीं, तूं भिऊं नको मी फार लहान असें अंगुष्ठ मात्र रूप धारण करून तुझे कर्ण छिद्रानें बाहेर निघेन. अशा प्रकारें पृथ्वीचें सांतवन करून लहान रूपानें पृथ्वीचे कर्णछिद्रांतून रुद्रदेव बाहेर आले. नंतर त्यांनीं पृथ्वीशीं असें भाषण केलें कीं, तू गोरूप आहेस तुझे कर्णद्वारा मी यांस्थलीं प्राप्त झालों अतएव या स्थलास गोकर्ण असें नांव प्राप्त होईल. तुझे ठायीं अनेक पवित्र स्थलें आहेत. त्या सर्वांत हें स्थल अति पवित्र होऊन सर्वत्र जगांत गोकर्णक्षेत्र या नांवानें प्रसिद्धीस पावेल. असा वर रुद्रानीं पृथ्वीस दिला.

नंतर ब्रह्मदेवानीं सृष्टी निर्माण केली असें पाहून देवास अति-

---

१ पृथ्वीवरती. २ प्रदेश.

शय क्रोध आला यामुळें त्या सृष्टीचे नाशाविषयीं देव प्रवृत्त झाले असतां प्रत्यक्ष विष्णू त्यास्थलीं प्राप्त झाले. नंतर त्यांनीं ( विष्णूनीं ) बहुत नम्रतेनें सृष्टीचे रक्षणाविषयीं ईश्वराची प्रार्थना केली. ती श्रवण करून रुद्रानीं तसें करणें [ नाश करणें ] सोडून दिलें. परंतु ब्रह्मदेवांनीं उत्पन्न केलेले सृष्टींतील सर्व सत्वांश ( बल ) मात्र हरण केलें. याचप्रमाणें ब्रम्हदेव व विष्णू यांचा आणि सर्व देवांचा सत्वांश हरण करून त्या पूर्ण सत्वांशाचा उत्तम आणि मोठा असा एक मृग उत्पन्न केला. ब्रम्हा, विष्णू, रुद्र, यांचे सत्वांश काढून त्या मृगास तीन शृंगें निर्माण केलीं. असें केल्यावर त्या मृगास घेऊन देव कैलास पर्वतीं गेले.

इकडे सर्व देवांचा सत्वांश नाहींसा झाल्यामुळें ते निःसत्व होऊन ब्रम्हदेवास शरण गेले. तेव्हां देव मंडळींसह ब्रम्हदेवानीं वैकुंठास विष्णूला शरण जाऊन सर्व वृत्त निवेदन केलें. नंतर उभयतां देव [ ब्रम्हा व विष्णू ] हे कैलासपर्वतीं जाऊन त्यांनीं शिव परमेश्वराची अत्यंत स्तुति केली. आणि नमस्कारपूर्वक अशी प्रार्थना केली कीं, आपण जो सर्वांचा सत्वांश हरण केला आहे तो ज्याचा त्यास कृपा करून द्यावा. ही त्यांची प्रार्थना शंकरांनीं मान्य करून ज्याचा त्यास सत्वांश समर्पण केला. त्या प्रमाणें ब्रम्हदेव व विष्णू यांच्या सत्वांशापासून त्या मृगास जीं दोन शृंगें केलीं होतीं तीं उभयतांना अर्पण केलीं. नंतर ब्रम्हदेवानीं आपले सत्वांशाचें तें शृंग पुष्करक्षेत्रीं आणि विष्णूनीं आपले सत्वांशाचें शृंग शालग्रामक्षेत्रीं स्थापन केलें. अशी त्या दोन शृंगांची व्यवस्था झाली.

शंकराच्या सत्वांशाचें शृंग कैलास पर्वतीं होतें तें प्राप्त होण्यास्तव रावणानें बहुत तप करून शिवप्रसाद प्राप्त झाल्या वेळीं तें शृंग मागितलें. तेव्हां देवानीं संतुष्ट होऊन अदेय असें तें आपले सत्वांशाचें शृंग असून भक्तपरवशतेनें त्यास समर्पण केलें. आणि असें सांगितलें कीं, या शृंगाचा आणि पृथ्वीचा संयोग झाला तर मात्र हें शृंग तेथून निघणार नाहीं असें पक्कें समज.

अशा प्रकारें शंकरांनीं आपलें सर्व बळ रावणास समर्पण

केलें. हें वृत्त नारदऋषीपासोन सर्व देवगणास श्रुत झाल्यावर ते अत्यंत भयाभीत झाले आणि पुढें याविषयीं काय उपाय करावा ह्मणून विष्णुसह विचार करूं लागले. तेव्हां सर्वानुमतें निश्चय करून विष्णूंनीं गणपतीस सांगितलेंकीं, तूं बटुरूप धारण करून समुद्रतीरावर असावें. रावण हा लंकेस याच मार्गानें जाणार आहे तेव्हां तुझे स्वाधीन शृंग करील तें तूं आपले हातांत घेऊन तो संध्यावंदनास प्रवृत्त झाला असतां " अरे रावणा माझे हातावर ठेवलेलें हें शृंग फार जड आहे मला तोलत नाहीं " अशा प्रकारें तीन वेळा उंच स्वरानें रावणास सूचना देऊन शेवटीं तें शृंग पृथ्वीवर स्थापन करावें. अशी तजवीज सर्वदेवगणांनीं केली.

इकडे रावणही परम हर्षानें तें शिवसत्वांशाचें शृंग हस्ताचे ठायीं धारण करून लंकेस जाण्याच्या इच्छेनें समुद्रतीरास प्राप्त झाला. त्या संधीस विष्णूनीं सुदर्शनचक्रानें सूर्याचें अर्धमंडल आच्छादित केलें यामुळें हा संध्यासमय आहे असें वाटून त्यानें ( रावणानें ) अर्धबिंबी सूर्यास अर्घ्यदान करण्यास्तव तें शृंग त्या स्थलीं बटुरूपी गजानन होते त्यांचे स्वाधीन करून माझें संध्यावंदन होईपर्यंत तूं या शृंगास भूमीस्पर्श न होऊं देतां हस्ताचे ठायींच धारण करावें असें त्या बटूस सांगून रावण संध्योपासनेकरितां निकट समुद्रतीरीं गेला. तेव्हां गणपतीनें रावण प्राणायाम करितो असा उत्तम संधी लक्षून विष्णूच्या आज्ञेप्रमाणें उच्चस्वरानें " रावणा हें शृंग फार जड आहे यास्तव तुझें तूं घे नाहीं तर मीं येथें ठेवीन " असें तीन वेळ ओरडून सांगितलें. तथापि संध्यावंदन सोडून रावण येईना तेव्हां गणपतीनें तेथें ( समुद्र तीरीं ) तें शृंग भूमीवर स्थापन केलें.

त्या संधींतच विष्णूनें सुदर्शनचक्र सूर्यापासोन पृथक् केलें तेव्हां स्पष्ट सूर्याच्या प्रकाशानें सर्व प्रदेश सोज्वल दिसूं लागला. यामुळें सत्वर संध्योपासना अटोपून बटुरूपी गणपतीचे संनिध रावण प्राप्त झाला. तेव्हां आपण दिलेलें शृंग या बटून भूमीवर ठेविलें असें पाहून त्यास अत्यंत क्रोध आला. त्या आवेशांत रावणानें बटूचे मस्तकावर एक मुष्टिप्रहार केला. नंतर आपलें शृंग आपणास

मिळावें एवढ्या उद्देशानें तें शृंग भूमीपासोन पृथक् करण्याविषयीं मोठा यत्न केला तेव्हां त्याचें सर्वबल व्यर्थ जाऊन शेवटीं जो श्रम झाला तेणेंकरून त्यास मूर्च्छा आली. पुढें दोन घटकेनें सावध झाल्यावर रावणानें आपले मनांत निश्चय केला कीं, आपल्याला देवगणांनीं फसविलें. यामुळें खिन्न होऊन मोठ्या लज्जेनें तो लंकेस चालता झाला.

अशा प्रकारें रावणाचा मनोरथ विफल करून देवगणांच्या हेतूप्रमाणें गजाननदेवानीं देवतारूप तें शृंग त्या स्थलीं स्थापिलें. त्या प्रसंगीं ब्रह्मदेव, विष्णु, इंद्रादि अष्ट लोकपाल प्रमुख त्रयस्त्रिंशत्कोटि देवता, ब्रह्मर्षी, राजर्षी, या सर्वांचे समाज त्या स्थलीं प्राप्त होऊन परमेश्वराचा स्तव करूं लागले. गंधर्व, यक्ष, सुर, पन्नग, सिद्ध, साध्य, विद्याधर, अप्सरा इत्यादिकांनीं नृत्य, गायन, स्तोत्रपाठादि महोत्सवास आरंभ करून कल्पवृक्षाच्या पुष्पांची वृष्टी केली. स्वर्गलोकीं देववाद्यांचे गजर होऊं लागले. अशा प्रकारें त्या स्थलीं मोहत्सव प्रवृत्त झाला. हें वर्तमान वायूनें कैलासपर्वतीं शंकरास श्रुत केलें. नंतर कैलासाहून परमेश्वर त्या स्थलीं आले. तेव्हां शंकरांनीं सर्व देवगणांचा समाज एकत्र करून मेघगंभीर वाणीनें असें सुरस भाषण केलें कीं, " हे देवगण हो, त्रैलोक्यविजयी रावणासारिख्या महाबलवान् पुरुषास या शिवलिंगानें निर्बल व निराश करून लंकेस घालविलें यास्तव चतुर्दशभुवनांत रत्नभूत हें शिवलिंग महाबल या नामें करून प्रसिद्ध होईल.

महाबळेश्वर लिंगाची गोकर्ण क्षेत्रीं कधीं स्थापना झाली याविषयीं गोकर्णमाहात्म्यांत शतानीक राजास सूतानीं सांगितलें. ते श्लोक खालीं लिहिले आहेत.

### श्लोक

वैवस्वतेंतरे राजन् त्रयोविंशतिमे शुभे ॥
त्रेतायुगे त्वीश्वराद्वे शरत्काले शुभोदये ॥
ऊर्जशुक्लप्रतिपदि व्यतीपाते रवौर्दिने ॥
तुलामासे मीनलग्ने विशाखायां प्रतिष्टितं ॥

अर्थ

तेविसाव्या युगपर्यायांतलि त्रेतायुग, वैवस्वतमन्वंतर, ईश्वरनामक संवत्सर, शरदृतू, तुला संक्रांति, कार्तिक शुद्ध प्रतिपदा, रविवार, विशाखा नक्षत्र, व्यतीपात, मीन लग्न, अशा सुमुहूर्त कालीं मागील दोन किंवा तीन घटिका दिवस राहतां श्रीमहाबलेश्वर नामक शिवलिंग गजानन देवांनीं स्थापिलें.

हें गणपतीचें लोकविलक्षण चातुर्य पाहून महादेवांनीं संतोषानें त्यास (गणपतीस)असा वर दिला कीं,या लिंगाचे संनिध आग्नेयी दिशेस तूं निरंतर वास करावा प्रथमतःतुझें पूजन करून नंतर महाबलेश्वराचें जे पूजन करितील त्यांसच यथोक्त पूजेचें फल प्राप्त होईल. अन्यथा होणार नाहीं. जगन्माता पार्वती ही त्याच स्थलीं महाबलेश्वराचे निकट पूर्वदिशेस ताम्रगौरी या नामें करून वास करिती झाली. ताम्रगौरी हें नांव पार्वतीस प्राप्त होण्याचें कारण क्षेत्रमहात्म्यांत सविस्तर लिहिलें आहे. परंतु येथें ग्रंथविस्तरभयास्तव लिहीत नाहीं.

गोकर्णक्षेत्रीं शिवरात्रीचें मोठें माहात्म्य वर्णिलें आहे. या क्षेत्रीं शिवरात्रीचा योग मोठ्या भाग्योदयानें मनुष्यांस प्राप्त होतो. या दिवशीं मध्यरात्रीं महाबलेश्वराचें बिल्वदलानें पूजन अत्यंत दुर्लभ असें महादेवांनीं सर्व देवगणांस सांगितलें आहे.

श्लोक.

माघमास्यासिते पक्षे या भवेच्च चतुर्दशी ॥
तस्यां निशीथसमये लिंगरत्नं महाबलं ॥
एकेन बिल्वपत्रेण अणुमात्रजलेनवा ॥
द्रोणपुष्पेण गंधेन यःपूजयति सादरं ॥
तस्य पुण्यफलं वक्तुं ब्रह्मणापि न शक्यते ॥
गोकर्णं बिल्वपत्रंच लिंगरत्नं महाबलं ॥
शिवरात्रिस्तथा देवा दुर्लभं हि चतुष्टयं ॥
तस्मिन् काले तु यद्दत्तमेकं कोटिर्भविष्यति ॥

अर्थ.

माघमासाच्या कृष्णपक्षांतील जी चतुर्दशी तिच्या मध्यरात्रीं

---

१ चारयुगांचा फेरा

समयीं एका बिल्वपत्रानें व उदककणानें तसेंच द्रोणपुष्पें आणि चंदन इत्यादिकें करून जो रत्नभूत अशा महाबळेश्वर शिवलिंगाचें पूजन करितो त्याच्या पुण्यफलाचें वर्णन ब्रह्मदेवानें ही करणें अशक्य आहे. गोकर्ण बिल्वदल, परमश्रेष्ठ असें महाबल लिंग, आणि माघ वद्य चतुर्दशी( महा शिवरात्री ); ह्या चार गोष्टींचा एक समयीं योग प्राप्त होणें फार दुर्लभ आहे. तात्पर्य, गोकर्णक्षेत्रांत शिवरात्रीचे मध्यरात्रीस बिल्वपत्रानें महाबलेश्वराचे पूजनाचा योग मनुष्यास प्राचीन पुण्योत्कर्षावेगळा कधींही प्राप्त होणार नाहीं. अशा पुण्यप्रद महाशिवरात्रीपर्वांत महाबलदेवास लक्षून दिलेली एकपट कोणतीही वस्तु कोटिपट पुण्यफल देण्यास योग्य होते.

शिवरात्रीचे संधीस देशोपदेशींचे बहुत लोक गोकर्णक्षेत्रीं येतात. किमानपक्ष एक लक्ष यात्रा जमत असेल असें अनुमान आहे. त्या प्रदेशांतील व्यापारी लोकांचीं दुकानें येऊन यात्रेंत त्यांचा भारी मोठा व्यापार चालतो. माघ वद्य पंचमीस आगमोक्त विधीनें ध्वज स्थापन होऊन आगमोक्त उत्सवास आरंभ होतो तेव्हां प्रतिदिवशीं आगमपद्धतीनें स्थापन केलेले अग्नीवर होम होऊन बलिदानाचा समारंभ होतो. नंतर महाबलेश्वराची भोगमूर्ती वाहनावर आरूढ होऊन स्वारी निघते, तेव्हां वेश्यांचीं नृत्यगायनें देवाचे मागें व वेदघोष पुढें अनेक वाद्यांचे ध्वनी होतात. देवाचा नियमितस्थलीं संचार झाल्यावर पुनरपि मंदिरांत स्वारी येते. त्यासमयीं दीपोत्सव होऊन देवास ( भोगमूर्तीस ) राजोपचार समर्पण करितात. देव शय्यागृहांत गेले ह्मणजे मंदिराचीं कपाटें बंद होतात.

मुख्य शिवरात्रीचे दिवशीं मागील प्रहररात्रीपासोन देवदर्शनाची गर्दी सुरू असते. ते दिवशीं मंदिरांत प्रवेश मोठ्या कष्टानें होतो. चीफ् कानस्टेबल, म्युनिसिपाल कमेटीचे मेंबर, देवस्थानावरील मुख्य अधिकारी, मणीगार हे सुव्यवस्थित दर्शनें यात्रस्थ लोकांस कराविण्याकारितां हजीर असतात. ते दिवशीं दर माणशीं एक आणा कर देवदर्शनाचा द्यावा लागतो. ही ज-

---

१ दुथ ाणीचें फूल.

मा देवस्थानचे कागदीं दाखल होते. प्रथम प्रहररात्रीपर्यंत यात्रस्थांचीं दर्शनें होतात. पुढें बंदी होऊन देवाचें गर्भगृह धुऊन स्वच्छ झाल्यावर अहिल्याबाईसाहेब होळकर यांनीं करून ठेवलेल्या नियमाप्रमाणें भागीरथीची कावड मोठ्या समारंभानें येते. त्या गंगाजलाचें स्नान देवास झाल्यावर संस्थानाकडील महापूजा होऊन नंतर लक्ष बिल्व समर्पण होतो. यासमयीं बिल्वदलांच्या पाट्या देवावर ओतण्याचा संप्रदाय आहे. पुढें देवद्वार खुलें होऊन मंदिरांत दीपोत्सव बहुत होतो. नंतर मागील प्रहर रात्रीचे सुमारास देवाची भोगमूर्ति पालखींत बसून कोटितीर्थी जाते. तेव्हां कोटितीर्थावर दीपोत्सव होतो. नंतर देवास नांवेंत बसवून जलविहार करितात. त्यासमयीं गोकर्णसंस्थानांतून शोभेची दारु सुटते व यात्रस्थ लोक ही तीर्थाचे आसमंतात् दारू पुष्कळ सोडितात. हें सर्व कृत्य झाल्यावर अरुणोदयीं देवाची स्वारी मंदिरांत येते.

अमावास्येस दिवसा दोन प्रहरीं भोगमूर्तीची स्वारी रथारूढ होण्याकरितां मंदिरांतून मोठ्या थाटानें निघून रथारूढ होते. तेव्हां यात्रस्थांपैकीं कितीएक धनिक लोक रथोत्सवखर्चीस शक्त्यनुरूप द्रव्य देवापुढें ठेवितात.नंतर आर्तिक्य झाल्यावर "जयशंभो" असा ध्वनी एककालीं हजारों यात्रस्थ करीत असतां रथ चालण्यास आरंभ होतो. बारावर चार वाजण्याचे सुमारास बाजारांत व्यंकटेशाचें मंदीर आहे तेथें रथ पोंहचल्यावर मंगलार्ती होऊन देवाची स्वारी परत जाण्यास निघते. अस्तमानाचे सुमारास मंदिराचे महाद्वारीं रथ दाखल झाल्यावर बहुत वेश्या एकत्र गाणी म्हणोन देवाची मंगलार्ती करितात. मग मंदिरांत देव स्वस्थानीं जातात.

येथील रथोत्सव फार मोठा होतो. त्यावेळची काय स्थिति वर्णावी! यात्रेची गर्दी, रथाचा घोष, वारांगनांचीं नृत्यें, गायनें, यात्रस्थ जनाचे मुखांतून उच्च स्वरानें भगवन्नामाचा गजर अनेक वाद्यांचे ध्वनी, पोलिस लोकांची क्रूर शब्दानें अर्डाओरड, चिफ्कानस्टेबल यांची गरीब लोकांवर अधिकार चालविण्याची धाम-

धूम, बाजारांतील माड्यांवर नटून थटून बसलेल्या वेश्याजनांनीं तरुण पुरुषांचीं मनें आकर्षण करण्याची खटपट, मेवामिठाई-च्या छबड्या डोक्यावर घेऊन विकत फिरणारांच्या ललकाऱ्या, गरीब भीक मागणारांवर पोलिस लोकांचा जुलूम, पोलिस इनस्पेक्टर घोड्यावर बसून यात्रेंत बंदोबस्त राहण्या करितां चहूंकडे फिरण्याची गलबल हे सारे प्रकार एकच समयीं सुरू असल्या-मुळें चोंहोंकडे गजबजल्या सारिखें भासतें. अशा प्रकारचा देखावा पाहून त्या वेळेस मनाची कांहीं विलक्षण स्थिति होते. परंतु रथारूढ शंकरास पाहिलें ह्मणजे मनास अत्यंत कृतकृत्यता वाटून जन्मास आल्याचें सार्थक वाटतें.त्या समयीं भक्तिमान् लोक लाह्या, बत्तासे,केळीं,व गुलाल रथावर उडवून रथाचे चाकांवर शेंकडों नारळ फोडितात.अशा प्रकारें मोठ्या थाटमाटानें रथाचा संचार गोकर्ण क्षेत्रीं होतो. चार घटिका रात्रीस स्वारी परत येते.त्या समयीं दीपोत्सव होऊन प्रातिपदेस देवांचें अवभृतस्नान कोटितीर्थावर मोठ्या समा-रंभानें होऊन शोभेची दारू बहुत सोडिली जाते. देवाचें अवभृ-तस्नान झाल्यावर यात्रस्थ लोक तीर्थाचीं स्नानें करितात. तेव्हां तीर्थावर मनुष्यांची मोठी गर्दी होते. ते वेळेस पोलिसांनीं उत्तम बंदोबस्त न ठेविला तर कांहीं मनुष्यें मरण्याचा संभव आहे. द्वितीयेस भोगमूर्ति मंडपांत स्थापन करून मिळालेल्या यात्रस्थ जनांवर रंग उडवितात. अशा प्रकारें गोकर्णक्षेत्रीं शिवरात्री-संबंधीं उत्सव होतो.

रथोत्सवास आरंभ झाल्या दिवसापासोन समाप्तीपर्यंत जे दिवस आहेत त्या प्रत्येक दिवसाचा खर्च नियमित बांधिलेला आहे. तो खर्च यात्रस्थांपैकीं कोणी धनिकानीं दिल्यास त्या दिवशीं सूर्योदया पासोन देव शय्यागृहांत जाईपर्यंत उत्सव संबं-धीं जें कृत्य होतें तें त्यांजकडून संकल्प करवून त्यांचें समक्ष क-रितात अशी रीत आहे. शिवरात्रीचे दिवसाचा सर्व खर्च दीडशें रुपये नियमित आहे.तो रघुनाथराव यांनीं दिला या कारणानें त्या दिवशीं शिवरात्रीसंबंधीं जें कृत्य झालें तें त्यांजकडून संकल्प करवून त्यांचें समोर झालें. या कारणानें त्या दिवशीं देवदर्शनास

व मध्यरात्रीची पूजा स्वस्थपणानें करण्यास त्यांस ( रघुनाथराव यांस ) व बरोबरील मंडळीस बिलकुल आयास पडले नाहींत.

महाबळेश्वराचें मंदीर मोठें आहे. सभोंवती प्राकार असोन त्यांत चंडीश्वर वगैरे परिवार देवता पुष्कळ आहेत. मुख्य महाबळेश्वराचें लिंग शाळुंकेवर दोन बोटे उंच दिसतें. तेथील लोकांचे सांगण्यांत दहा वीस वर्षांनीं उद्वर्चन करण्याचा प्रसंग येतो तेव्हां एकावर एक अशा पांच चार शाळुंका आहेत त्या काढिल्यावर लिंगाचा तर अंत नाहींच परंतु खालीं लिंग फार मोठें जाडें असोन वर बारीक होत गेल्यामुळें हरणाच्या शिंगासारिखा लिंगाचा आकार स्पष्ट दिसतो.

देवमंदिराचे मागील बाजूस आग्नेय दिशेस गणपतीचें मंदीर पश्चिमाभिमुख आहे. गणपतीची मूर्ती उभी द्विभुज असून दहा वर्षाचे मुला एवढी मोठी आहे. हें ध्यान बालरूपी असोन मस्तकावर खांच आहे. ती रावणाचे मुष्टिप्रहरापासोन झाली. या गणपतीचे उपासक त्याप्रदेशीं फार आहेत. प्रतिचतुर्थीस मंदिरांत मोदकाचे व नारळाचे होम बहुत लोक करितात.

मुख्य देवमंदिराचे पूर्व बाजूस ताम्रगौरीचें मंदिर पूर्वाभिमुख आहे. त्या देवीचीमूर्ती फार सुलक्षण असोन देवीस अलंकार वगैरे बरेच आहेत.

महाबलेश्वर, गणपती, ताम्रगौरी, या तीन्हीं देवतेचे पूजक ब्राह्मण आहेत. यात्रस्थलोक देवापुढें ठेवितात तें पूजारी यांस घेण्याचा अधिकार नसोन देवापुढें ठेवणाराचा जो क्षेत्रोपाध्याय असेल तो घेतो अशी रीत आहे.

महाबलेश्वराची पूजा, महानैवेद्य, बलिदान वगैरे सर्व आगमोक्त विधीनें त्रिकाल होतें. प्रत्यहीं देवाचे मुख्य कारभारी व इतर नौकर लोक एकत्र जमून सायंकाली देवास वंदनें करितात. त्यासमयीं प्रतिहार सर्वांचीं नांवें घेऊन भगवच्चरणीं सर्वांचीं वंदनें निवेदन करितो. प्रदोषकालचें अर्चन झाल्यावर बलिदान होतें. त्यासमयीं वाजंत्री व इतर वाद्यें वाजतात. त्या वाद्यांत भेरी व डमरु हीं वाद्यें मुख्य आहेत. नंतर देवास राजोपचार समर्पण

---

१ रावणानें मुष्टिप्रहार करण्याचें कारण पूर्वी लिहिलें आहे.

होतात. ते समयीं चामरें ( चौऱ्या ) वेश्या वारितात. व मंगलार्तिक्य ही त्यांचेच हातानें होतें. राजोपचारसमयीं चार वेदाचे पाठ, इतिहास, पुराणें इत्यादिकेंकरून भगवत्स्तुती होते. हा सर्व विधी झाल्यावर प्रहर रात्रीचे सुमारास देव शय्यागृहांत जातात. तेव्हां पूजारी लोक मंगलार्तिक्य करून कपाटें बंद करितात. असा रोजचा क्रम आहे.

वर लिहिलेले खर्चास सहा हजार रुपये नेमणूक असोन शिवाय यात्रेंतील कराचें व कानगीचें वगैरे उत्पन्न ही बरेंच जमा होतें. ही सर्व व्यवस्था करणारा योग्य मनुष्य सरकारांतून जो नेमला जातो त्यास मुक्तेसर अथवा मणिगार असेंही ह्मणतात.

क्षेत्रमहात्म्यांत कोटितीर्थाचें फार वर्णन केलें आहे. या स्थलीं पृथ्वींतील सर्व तीर्थें शंकराचे आज्ञेनें एकत्र झालीं ह्मणोन ऋषींनीं कोटितीर्थ असें त्याचें नांव ठेविलें. या तीर्थाविषयीं माहात्म्यांत असें लिहिलें आहे.

श्लोक

स्नानं कुर्वंति ये तत्र गोकर्णे तीर्थसत्तमे ॥
तेषां त्रिजन्माचारितं पापं नशत्यसंशयं ॥

अर्थ.

गोकर्णक्षेत्रांतील परमश्रेष्ठ अशा कोटितीर्थाचे ठायीं जे स्नान करितात त्यांचीं पूर्वींचीं दोन व सांप्रतचें एक अशीं जीं तीन जन्में यांत झालेलें पातक नष्ट होतें याविषयीं संशय नाहीं.

यात्रस्थलोक तीर्थविधी व श्राद्ध वगैरे याच तीर्थीं करितात. हें तीर्थ चौफेर दगडानें चांगलें बांधिलेलें असोन मोठें विस्तृत आहे. तीर्थाचे आसमंतात् अगदीं लागून गांवची वस्ती आहे. तीर्थाचे चौफेर बहुत देवस्थानें असोन त्याचा विस्तर क्षेत्रमाहत्म्यांत पुष्कळ लिहिला आहे.

येथीलच्या रामतीर्थाचें ही माहात्म्य पुराणांत फार वर्णिलें आहे. या तीर्था विषयीं अशी कथा आहे कीं पूर्वीं दाशरथी रामांनीं रावणादिराक्षसकुलाचा संहार करून अयोध्येस आल्यावर रावण आणि कुंभकर्ण यांची उत्पत्ती कशा प्रकारें व कोणा पासोन

झाली, ही कथा अगस्ति ऋषीच्या मुखानें श्रवण केल्यावर रामास अत्यंत दुःख वाटलें कीं रावण हा पुलस्त्य ऋषी पासोन ब्राह्मणकुलांत उत्पन्न झाला. तेव्हां त्याचे वधानें आपल्यास ब्रह्महत्येचा दोष घडला याचे निवारणास काय प्रायश्चित करावें? असा अगस्ति ऋषीस श्रीरामचंद्रानीं प्रश्न केल्यावर त्यांनीं सांगितलें कीं गोकर्णक्षेत्रीं जाऊन पापशुध्यर्थ तप करावें. नंतर सीता आणि लक्ष्मण यांसह रामचंद्र गोकर्णक्षेत्रीं आले आणि समुद्रतीरीं पर्वतावर तीर्थ निर्माण करून त्यांनीं तपास आरंभ केला. तेव्हां स्वल्प कालांतच शिवदर्शन झालें. त्या समयीं रामांनीं ब्रह्महत्यादोषाची निवृत्ति होण्याविषयीं प्रार्थना केली. ती मान्य करून शंकर बोलले कीं रामां तूं सर्वदां निर्दोषच आहेस. अथापि लोकव्यवहारास्तव तूं जें ह्मणतोस तसें घडेल. - आणखी इच्छित असेल तो वर माग, तेव्हां रामानीं जगाचे कल्याणार्थ असा वर मागितला कीं मी केलेलें हें तीर्थ माझे नामानें प्रसिद्ध राहून या तीर्थाचे स्नानानें ब्रह्महत्यादोषाची निवृत्ती व्हावी त्या प्रमाणें ईश्वरांनीं वर दिला. नंतर रामचंद्र त्या तीर्थाचे निकट निरंतर वास करिते झाले हें स्थल अगदीं समुद्रतीरीं लहान टेकडीवर असोन तेथें उंच पर्वता वरून उदकाची धारा येते ती त्या रामकुंडांतूनही पुढें वाहत जाऊन समुद्रास मिळते.

त्या कुंडाचे संनिध लहानमंदिरांत राम, लक्ष्मण, सीता, अशा तीन मूर्ती आहेत. समुद्र समीप असोन नारळाची झाडी त्या टेकडीस लागून असल्यामुळें ही जागा फारच रमणीय दिसते. गोकर्णक्षेत्रीं समुद्रस्नानाचेंही फार माहात्म्य वर्णिलें आहे. महाबलेश्वराचे मंदिरा पासोन दोनशें पावलें समुद्र दूर आहे. सार्वकाल समुद्राचा घोष गोकर्णक्षेत्रीं श्रवण होतो. या क्षेत्रीं पर्व दिवसांवाचोनही समुद्रस्नान करावें असा विधी आहे.

गोकर्ण गांव मोठा आहे. येथें बहुतेक पदार्थ मिळतात. परंतु कारवार व कुंमठ्या पेक्षां महागाई हमेष असते. येथें इतर ज्ञाती पेक्षां ब्राह्मणांची वस्ती मोठी असोन बहुत एक सुखी आहेत त्यांत अग्निहोत्री दोन आहेत. वेद ह्मणणारे ब्राह्मण त्या प्रदे-

शांत गोकर्णक्षेत्रींच आढळले. गांवची वस्ती कोंकणी तऱ्हेची नसोन मिश्र आहे. या क्षेत्रीं शंकराचार्यांचा मठ आहे. त्यांचा अधिकार चालविण्यास सांप्रत गोपाळशास्त्री या नांवाचे योग्य मनुष्यास आचार्यांनीं नेमिलें आहे. ते त्या मठांत राहून त्या प्रदेशांतील सर्व ज्ञातीचा धर्मसंबंधीं आचारव्यवहार पाहतात. त्या प्रांतीं मठाचा अंमल ( धर्मसंबंधी ) कडक चालतो. मठांत शारदांबेचें संस्थान असोन देवाची पूजा वगैरे शास्त्री बोवाकडेसच आहे. शृंगेरी मठांतून गोपाळशास्त्री यांस स्वामीचें आज्ञापत्र आलें त्यांत रघुनाथराव विंचूरकर हे गोकर्णक्षेत्रीं येणार आहेत तरी त्यांस भेटून तेथें सर्वप्रकारें त्यांची व्यवस्था चांगली ठेवावी असें लिहिलें होतें. त्यावरून गोपाळशास्त्री बोवा हे रघुनाथराव यांस दोन मजला सामोरे आले व त्यांनीं तेथें त्यांची उत्तम तजवीज ठेविली. तेथील मठांतील माहितगार शिपाई हमेषा शास्त्रीबोवांनीं त्यांचे तैनातीस ठेविला होता; याचप्रमाणें पुण्याहून एजंट साहेबांनीं लिहिल्यावरोन कारवार जिल्ह्याचे कलेक्टर साहेब यांजकडून ही पोलिसचीं माणसें चपराशी, वगैरे त्यांचे तैनातीस होते. त्यामुळें यात्रेचे मोठे गर्दींत पाहिजे तेव्हां देवदर्शनास वगैरे त्यांस अडचण पडली नाहीं.

गोकर्णक्षेत्रीं होळकर साहेबांचें छत्र आहे. त्यांत शिवस्थापना केली असून अहिल्याबाई साहेबांची ही पाषाणमय मूर्ती करून बसविली आहे. छत्रांतील नियमित धर्मसंबंधाची व गोसावीबैरागी यांस सदावर्त देण्याची व्यवस्था करण्यास हमेषा कारकून असतो. तेथील धर्मकृत्यास सालीनां तीन हजार पर्यंत नेमणूक हल्लीं चालत आहे. रघुनाथराव क्षेत्रीं गेले तेव्हां तेथें रावजी गोरे माजी हुजूरचिटनवीस यांचे बंधू होते त्यांनीं त्यांची उत्तम प्रकारें तजवीज ठेविली.

गोकर्णक्षेत्रांतील देवस्थानाची व तेथील तीर्थांची वगैरे माहिती संक्षेपानें वाचकांकरितां लिहिली. आतां रघुनाथराव यांनां तेथील यात्रा वगैरे केल्याचा मजकूर थोडक्यांत लिहून हा विषय पुरा करूं.

गोकर्णक्षेत्रीं रघुनाथराव हे माघ शुद्ध १४ स पोंहोचले. त्या क्षेत्रीं एकंदर मुकाम अठरा झाले. या अवकाशांत कोटितीर्थ-प्रयुक्त क्षौरविधी, तीर्थश्राद्ध, महाबलेश्वरास महारुद्राभिषेक, मुख्य देवतेच्या महापूजा, भद्रकाली आदिकरून देवतांस रुद्राभिषेक, मंत्रजागर, नित्ययात्रा, इतर तीर्थांचीं स्नानें, देवतादर्शन इत्यादि करून शेवटीं ब्राह्मणभोजन झाल्यावर गोकर्णयात्रेची रघुनाथराव यांनीं समाप्ती केली.

रघुनाथराव यांचे तीर्थरूप विठ्ठलराव तात्यासाहेब यांचा शिवरात्रिपर्वानिमित्त गोकर्णक्षेत्रीं जाण्याचा हेतू बहुतदिवस होता. शेवटीं सन १८३६ इसवी सालीं त्यांनीं यात्रेस निघण्याची तयारी करून पौष शुद्ध पंचमीस खरोखर निघण्याचा निश्चय केला. परंतु दैवयोगानें पौष शुद्ध प्रतिपदेस त्यांची प्रकृति ज्वरानें बिघडली. ती वाढत जाऊन त्याच महिन्याचे शुद्धत्रयोदशीस शुक्रवारीं त्यांचें देहावसान झालें. या कारणानें त्यांचा यात्रेस जाण्याचा हेतू पूर्ण झाला नाहीं. तो वडिलांचा हेतू आपले हातून शेवटास गेला या योगें रघुनाथराव यांस फार संतोष वाटून त्यांचे मनांस कृतकृत्यता वाटली. असो, रघुनाथराव यांनीं फाल्गुन शुद्ध तृतीया रोजीं प्रदोषकालीं महाबलेश्वराची पूजा केली. नंतर देवाचा निरोप घेऊन रघुनाथराव हे शिरशी घाटाचे मोठ्या रस्त्यानें चालते झाले.

# भाग दुसरा.

या मार्गात सडक सोडुन सुमारें तीन कोसांवर पहाडांत मंजूळाचें एक नगर आहे. तेथें फार प्राचीन असें व्यंकटेशाचें स्थान पुराणप्रसिद्ध आहे. या क्षेत्राचें माहात्म्य स्कंदपुराणांत पांच अध्याय वर्णिलें आहे. या देवाचें मंदीर फार मोठें असोन गर्भगृहांत सुलक्षण अशी व्यंकटेशाची मूर्ति द्विभुज आहे. एके हातांत बाण व दुसरे हातांत धनुष्य धारण केलेली आहे. याविषयीं तेथील माहात्म्यांत अशी कथा आहे कीं, शेषाचलाहून मृगयेच्या उद्देशानें अश्वारूढ असे व्यंकटेश या स्थलीं आले तेव्हां तेथील भूमीची पवित्रता व अरण्याची विलक्षण शोभा पाहून परमेश्वरांचें अंतःकरण सुप्रसन्न झालें; नंतर कांहीं दिवसपर्यंत त्यांनीं त्या स्थलींच वास केला. तों मागाहून महालक्ष्मीही देवांचा शोध करीत तेथें आली. या अवकाशांत गोकर्णमंडलांतील ऋषि या स्थलीं प्राप्त झाले. त्यांनीं ( रामांनीं ) मधुपर्कादि उपचारें करून न महालक्ष्मीसह देवाची पूजा केली. मग व्यंकटेशाची स्तुती करून प्रार्थना केली कीं, समुद्रप्रदेशींहून देश मी निर्माण केला, या देशांत दैत्य आणि राक्षस वारंवार येऊन ऋषिजनांस पीडा करितात यास्तव या सह्य पर्वताचे शिखरावर आपण लक्ष्मीदेवीसह निरंतर वास करून या देशाचें रक्षण करावें. हें परशुरामाचें ह्मणणें परमेश्वरांनीं मान्य केलें आणि ते मोठ्या संतोषानें महालक्ष्मीसह तेथें राहिले.

देवाचे मंदिरासमीप डावे बाजूस लक्ष्मीचें मंदिर असोन यात्रस्थजनांकरितां धर्मशाला फार उत्तम बांधिल्या आहेत. व्यंकटेश देवाचे पूजक ब्राह्मण आहेत. येथील देवस्थानचे खर्चास व रथोत्सवास उत्तम नेमणूक पूर्वीं पासोन चालत आहे. या क्षेत्रीं मंदिराचे आसमंतात् दोन तीन तीर्थें आहेत. त्यांत मुख्य तीर्थ **स्वामिपुष्करिणी** ह्मणोन वर्णिलें आहे. देवाचे पूजक मध्वमतानुयायी

असल्यामुळें त्या शिवाय इतरांचा स्पर्श देवास होत नाहीं. यात्रस्थलोक पुजाऱ्याकडून पंचामृत देवावर घालवून महापूजा करितात. त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं देवाची महापूजा व दुग्धाभिषेक करवून ब्राह्मणभोजन घातलें. नंतर ते तेथून पुढें चालते झाले आणि क्रमानें श्रीक्षेत्रास पोंहोचले. या क्षेत्रास प्राकृतजन अपभ्रंशानें शिरसी असें ह्मणतात. हा गांव मोठा व्यापाराचा आहे. येथें सर्व प्रकारचा व्यापार चालतो. देशांतून सर्व पदार्थ येथें येऊन घाटाखालीं कोकणांत जातात. व त्या प्रदेशांत चिकण सुपारी, वेलदोडे, व चंदनवृक्षाच्या पांच चार जाती आहेत. त्या जातीचा चंदन, चंदनकोष्ट, नारळ, मिरे, चंदनकाष्टाचे पदार्थ,(चवऱ्या,विंजणवारे,बाहुल्या,चंदनी अत्तर इत्यादि)अनेक प्रकारचे जिन्नस शिरसीस येऊन मग देशोदेशीं जातात. ही पेठ मोठी व्यापाराची असल्यामुळें येथें दलाल व हमाल यांचा ताजा रोजगार आहे.

या ठिकाणीं मुख्य देवता चामुंडा नामक देवी आहे. प्रतिवर्षी फालगुन शुद्ध ८ स देवीची यात्रा फार मोठी भरते त्या समयीं एक लक्षावर मनुष्य जमत असेल यांत संशय नाहीं. या शिरशीच्या यात्रेंत पशूंचा वध असंख्य होतो असें ह्मटलें पाहिजे. या स्थलीं पशूवधाचें स्थल स्वतंत्र केलें आहे. तेथें पशूंच्या मस्तकांचे ढीग पडलेले दृष्टीस पडतात, आणि रक्ताचा पाट वाहत असतो. हें पाहून मनुष्यमात्राचे अंगावर रोमांच उत्पन्न होतात. यात्रेचे दिवसांतच रघुनाथराव हे तेथें गेले होते. त्या स्थलीं देवीचें दर्शन करून तेथून पुढें बनोशीस गेले. या स्थलास संस्कृतशब्दानें दोन नांवें आहेत. एक जयंती क्षेत्र व दुसरें वनवासी क्षेत्र. वनवासी याचा अपभ्रंश होऊन हल्लीं प्राकृत जन बनोशी असें ह्मणतात.

वनवासी क्षेत्रीं मधुकेश्वर नामक महादेव आहे. याचें मंदिर शालिवहान राजाचें वंशांतील कोणी राजानें बांधिलें असोन मंदिराची रचना फार अपूर्व केली आहे. मंदिरास प्राकार आहे. त्याच्या आंत अष्ट लोकपालांच्या मूर्ति फारच सुरेख करून बस

विल्या आहेत. या शिवाय गणपती आणि नृसिंह यांचीं मंदिरें प्राकारांत स्वतंत्र असोन इतर परिवारदेवता बहुत स्थापिल्या आहेत. मुख्य देवतेपुढें नंदी आहे तो पुरुषप्रमाण उंच असोन उत्तम कारागिरानें आपल्या कौशल्याची सीमा [कारागिरीची कमाल]या नंदिकेश्वराचे मूर्तीवर दाखविली आहे यांत संशय नाहीं.

विष्णूच्या कर्णमलापासोन मधु, कैटभ असे दोन दैत्य उत्पन्न झाले. त्यांतील मधु दैत्य हा सव्य कर्णाच्या मला पासोन झाला हा ज्येष्ट. वामकर्णाच्या मलापासोन कैटभ झाला तो कनिष्ट. त्यांतील मधु दैत्यानें शिवलिंगस्थापन करून शिवार्चन केलें, त्या लिंगाचें नांव मधुकेश्वर. व कैटभ दैत्यानें जें लिंग स्थापिलें त्यास कैटभेश्वर असें ह्मणतात. तें स्थल या क्षेत्रापासोन तीन कोसावर आहे. वनवासीक्षेत्रीं मधुकेश्वराचें माहात्म्य स्कंदपुराणांत अतिशय वर्णिलें असोन ब्रह्महत्यादि पंचमहापातकांस व इतर सर्वपातकांस दिनमासभेदानें मधुकेश्वराची पूजाच प्रायश्चितस्थानीं सांगितली आहे. ब्रह्महत्येस[1] माघ वद्य १४ स ( महाशिवरात्रीस ) मध्य रात्रीं बिल्वदलानें पूजा, सुरापानास[2] फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस उत्तरा नक्षत्रावर माध्यान्हीं पलाशपुष्पानें पूजा, गुरुदारागमनास[3] कार्तिक शुद्ध पौर्णिमेस अरुणोदयीं कमलपुष्पानीं पूजा, स्वर्णस्तेयास[4] चैत्र शुद्धपौर्णिमेस दमनकानें ( दवण्यानें ) प्रदोषकालीं पूजा, या चार पातक्यांत संसर्ग करणारा जो त्यास श्रावण वद्य अमावास्येस अपराण्हकालीं[5] कुशपुष्पांनीं[6] पूजा. गोवधास कार्तीक कृष्ण एकादशीस कृष्ण तुलशीच्या दलानीं पूजा. इतर सर्व क्षुद्र पातकांस शनित्रयोदशीस प्रदोषकालीं दूर्वादलानें पूजा. अशा महापातकांची व इतर पातकांची नाशकरणारी केवळ मधुकेश्वराची पूजाच प्रायश्चितस्थानीं वर्णिली आहे. या स्थलीं मुख्य तीर्थ वरदानदी असोन येथें स्नानदान व पितरांचे उद्देशें पिंडदान, यांचें माहात्म्य फार सांगितलें आहे.

---

१ ब्राम्हण वध २ मद्यपान ३ गुरुस्त्रीशीं गमन४ सान्याची चोरी. ५दिवसा एक वाजतां. ६ दर्भपुष्पांनीं.

या क्षेत्रापासोन सुमारें दहा कोसावर हिक्केरी सागर ह्मणून-प्राचीन काळच्या राजधानीचा मोठा गांव आहे. त्याचे समीप वरदानदीचें उत्पत्तिस्थान आहे. त्यास्थलीं शालिवाहन राजाचे वंशांतील राजे बहुतकालापूर्वी राज्य करित होते. त्या राजवंशाचें मुख्य उपास्य दैवत मधुकेश्वर असल्यामुळें त्याकालीं देवाचे उत्सव प्रतिवर्षी दहा होत असत. त्यांत ऋतुसंबंधानें[1] सहा, दक्षिणायन व उत्तरायन संबंधीं दोन, शिवरात्री आणि श्रावणमास संबंधी दोन, अशा दहा उत्सवांस व नित्यपूजा, नैवेद्य आणि राजोपचार इत्यादि खर्चास एक लक्ष रुपयांची जहागीर देवास होती. ती कालगतीनें कमी होत होत हल्लीं एक हजार रुपये नक्त इंग्रज सरकारांतून पावतात. त्यांत देवाचा सर्व खर्च होतो.

वर लिहिलेले शालिवाहन याचे वंशांतील रघुराज नांवाचे राजानें वसंतोत्सवाकरितां काळ्या पाषाणाचा मंच ( पलंग ) करून देवास अर्पण केला. त्या मंचकाचें काम अप्रतिम केलेलें आहे. तो पाहिला ह्मणजे पूर्वकालीं हिंदुस्थानांत शिल्पशास्त्रवेत्ते लोक कसे होते याविषयीं संशय राहत नाहीं. त्या मंचकावर संस्कृत श्लोक खोदिला आहे तोः—

## श्लोक.

श्रीवर्षे विभवे ऋतौच शिशिरे माघाख्यमासेऽ
सिते पक्षे सच्छिवरात्रिसौम्यदिवसे मोदाद्रघु-
क्ष्माभृता ॥ पर्यंकोऽश्ममयो वसंतकुतुकायास्था-
निके मंडपे दत्तः श्रीमधुकेश्वराय रुचिरः श्रीमज्ज-
यंतीपुरे ॥

## अर्थ.

जयंतीपुराचे ठायीं देवानीं सभामंडपांत बसून वसंतऋतुसंबंधी उत्सवाचें निरीक्षण करावें या उद्देशें विभव नामक संवत्सराचे अत्युत्तम वर्षी शिशिर ऋतूंत माघ वद्य १४ बुधवारीं ( शिवरात्रीचे दिवशीं ) रघुराज नामक( पृथ्वीपती ) राजानें सानंदपणें उत्तम पाषाणाचा सुलक्षण असा मंच (पलंग)श्रीमधुकेश्वर देवास अर्पण केला.

---

१ वसंतादि षट्ऋतु.

सांप्रत काली या घराण्याचा अगदीं लय झाल्या सारिखें झालें; पण अद्यापि त्या वंशाचें नांव मात्र कर्नाटकप्रांतीं प्रसिद्ध आहे.

टिपू सुलतानानें मधुकेश्वराचे प्राचीन लिंगाचा उच्छेद केल्यावर त्या स्थलीं नवीन लिंग स्थापिलें. त्या लिंगाचें सिंहासन फार उत्तम काळ्या दगडाचें केलें असोन त्यावर मधुकेश्वराचें लिंग मोठें भव्य स्थापिलें आहे. देवा पुढील नांदिकेश्वर प्राचीन कालचेच आहेत. मधुकेश्वराचे मंदिरावर कळस होता त्यास बहुतकाल झाल्यामुळें वरील मुलामा जाऊन अगदीं काळा दिसत असे. हें पाहून रघुनाथराव यांनीं मंदिरावरील कळस काढवून आपले बरोबर आणला. आणि त्या मासल्याचा नवीन कळस तयार करवून त्यावर सोन्याचे वर्ख चढाविले. तें काम पूर्णतेस गेल्यावर तो कळस मुद्दाम कृष्णाचार्य गंजिहाळकर याजबरोबर बनोशीस पाठवून शके १८०५ चे माघांत विधिपूर्वक मधुकेश्वराचे मंदिरावर स्थापन कराविला.

या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं वरदातीर्थसंबंधी विधी करून मधुकेश्वराची महापूजा, आणि ब्राह्मण भोजन करविलें. नंतर हानगल येथें पुराणप्रसिद्ध तारकेश्वर महादेव आहेत त्यांचे दर्शनार्थ हे चालते झाले.

हानगल हा गांव मोठा असून तालुक्याचा आहे. येथें तारकेश्वर नामक प्रसिद्ध शिवस्थान असल्यामुळें तारकक्षेत्र अशी संज्ञा या गांवास झाली. पूर्वी येथलि शिवलिंगाचे दर्शनमात्रें करून पुष्कळ पातकीजनांचा समुदाय तरला. या कारणानें कश्यपादिक ऋषी या शिवलिंगास तारकेश्वर ह्मणूं लागले. या देवाचें मंदीर फार मोठें असोन बहूतकालचें असल्यामुळें अगदीं जीर्णदशेस आलें आहे. मंदिरावर नकशीचें कोरीव काम फारच उत्कृष्ट केलें आहे. तें पाहून मनास अत्यंत आश्चर्य वाटतें. येथील देवस्थानचे खर्चास, पूर्वकालीं शालिवाहन राजाच्या वंशाचें राज्य त्याप्रांतीं होतें तेव्हां, पुष्कळ गांवें देवास जहागीर होती. हल्लीं सालीना तीनशें रुपये पावतात. त्यांत सर्व देवासंबंधी खर्च होतो.

या स्थलीं धर्म संज्ञक एक नदी गांवापासोन अर्ध मैला वर आहे. तेथें घाट बांधिलेले असोन नदीतीरीं इतर देवांचीं मंदीरें आहेत. या धर्मनदी तीर्थी स्नान करून तारकेश्वराच्या दर्शनाचें मोठें फल सांगितलें आहे.

टिपूसुलतानाचे अमलांत मुसलमान लोकांनीं मुख्य देवमंदिरांतील तारकेश्वर नामक लिंगाचा उच्छेद केल्यामुळें तेथें नवीन लिंग स्थापिलें. यात्रस्थजन त्याचें दर्शन करितात.

या क्षेत्रीं धर्मनदीचें स्नान, व तारकेश्वराची पंचामृतपूजा आणि ब्राह्मणभोजन इत्यादि कृत्य करून रघुनाथ राव हे लक्ष्मीश्वर क्षेत्रीं जाण्यास्तव चालते झाले.

मार्गांत नबाबाच्या राजधानीचा मुख्य गांव सावनूर हा लागला. तो पाहाण्याच्या हेतूनें जुजबी माणसें बरोबर घेऊन रघुनाथराव गेले. नंतर तेथील किल्ला व राजवाडा वगैरे सर्व त्यांनीं पाहिलें. त्या समयीं तेथील मालिक नबाब गांवीं नसोन धारवाडास गेले होते. जर ते सावनुरास असते तर तेथें त्यांस ( रघुनाथराव यांस ) मुक्काम करून त्यांची ज्याफत करावी लागती. कारण संस्थानावर जे कायम नबाब होते त्यांचा व त्यांचे वडिलांचा रघुनाथराव यांजबरोबर बहुत परिचय होता. असो, रघुनाथराव हे क्रमानें लक्ष्मीश्वरक्षेत्रीं गेले.

हा गांव मिरजकर जहागिरदार यांस जहागीर असोन त्यांचे तर्फेनें तेथें मामलेदार व फौजदार असतात. या गांवची वस्ती मध्यम असोन मोडकळीस आलेली आहे. तेथील लक्ष्मीश्वर महादेवाचें मंदीर अति प्राचीनकालचें आहे. त्याचें रक्षण करण्याची तजवीज नसल्यानें बहुत खराबा होऊन कित्येक मंडप मोडून पडले आहेत. त्याचे दगड गांवकऱ्यांनीं आपल्या घरांस लाविलेले दृष्टीस पडतात. त्या गांवांत असें एक घर निघणार नाहीं कीं त्या घरास मंदिराचें दगड लागले नाहींत. असो.

मंदिरांत शिवलिंग नसोन नंदिकेश्वरावर आरूढ अशी ईश्वरांची व तिचें मागें ( पाठीशीं ) पार्वतीची अशी मूर्ती आहे. हा नंदिकेश्वर व हा शिवपार्वतीच्या मूर्तीं फारच सुस्वरूप असोन

या ध्यानाचें चिंतन करूं लागले असतां मनास एक्या प्रकारचा विलक्षण आनंद भासतो. ही मूर्ती नंदी सुद्धां मनुष्याचे मांडी बरोबर उंच आहे. या शिवाय मंदिरांत इतर देवता गणपती वगैरे असोन गांवांत एक मंदीर आहे. तेथें लक्ष्मेश्वर या नामें करूनच शिवस्थान आहे.

येथील देव गौरीशंकर हे त्या प्रांतांतील बहुत लोकांचे कुलस्वामी असल्यामुळें त्या प्रांतांतील फार लोक देवदर्शनास येऊन यात्रा करितात. या क्षेत्राचें माहात्म्य पद्मपुराणांत आहे परंतु ते रघुनाथराव यांस त्या समयीं वाचण्यास मिळालें नाहीं.

त्या गांवांत एक मशीद आहे. त्या मशिदीचें काम फारच सर्वोत्कृष्ट पहाण्या सारिखें आहे अशी कीर्ति ऐकिल्यावरून रघुनाथराव हे ती पहाण्यास गेले तेव्हां त्या मशिदी संबंधीं माहिती ऐकिली. ती पूर्वीं औरंगजेब बादशाहाचे कारकीर्दींत तेथील राहणारा कोणी मुसलमान बादशाहाचे बहुत कृपेंत होता त्यानें त्या समयीं अतिशय द्रव्य संपादन केलें व त्या सर्व द्रव्याचा व्यय त्यानें ती मशीद बांधण्याचे कामांत केला.

लक्ष्मेश्वरक्षेत्र संबंधीं मुख्य देवाचें पूजन व ब्राह्मणभोजन घालून रघुनाथराव हे अन्नगिरी क्षेत्रास जाण्यास्तव चालते झाले.

मार्गांत मुळगुंद गांव लागला. तेथें सिद्धेश्वर नामक प्राचीन शिवस्थान आहे. त्या देवाचें वर्णन अन्नगिरी क्षेत्र माहात्म्यांत आलें आहे. त्या स्थळीं पूर्वीं कोणी एक दुष्ट दैत्य समीप भागाचे पर्वतावर रहात होता. त्याचा नाश नंदिकेश्वरांनीं शिवाचे आज्ञेवरून केला. तेथें पर्वतावर नंदिकेश्वराचे मंदीर आहे.

या गांवीं एके टेकडीवर दावलमलिक नामें करून पिराचें प्रसिद्ध स्थान आहे. इतर ठिकाणीं दावलमलिकांचीं स्थानें आहेत, परंतु मुख्य स्थान याच ठिकाणीं आहे असें तेथें ऐकिलें. या पीरास कित्येक हिंदू लोक मान देतात. स्थान पाहण्याकरितां रघुनाथराव गेल होते.

येथील सिद्धेश्वराचें व नंदिकेश्वराचें दर्शन दुसरे शिवशीं करून ते पुढें अन्नगिरी क्षेत्रास दाखल झाले.

अन्नगिरी क्षेत्रास त्या प्रदेशांतील प्राकृत लोक अण्णेगिरी असें ह्मणतात. या क्षेत्रीं अमृतेश्वर नामे महादेव आहे. या देवमंदिराचे दगडावर नक्षीचें खोदीव काम फार केलें असोन सांप्रत तें जीर्ण झालें आहे. या क्षेत्राचें महात्म्य स्कंदपुराणांत तीन अध्यायांत वर्णिलें आहे.

पूर्वीं द्वापार युगाचे शेवटास कौरवांचा आणि पांडवांचा द्यूत प्रसंग झाला त्यांत धर्म राजा पराजित झाल्यामुळें प्रतिज्ञा रक्षणार्थ द्वादश वर्षें पर्यंत द्रौपदी आणि चौघे बंधू यांसह अरण्यवास करण्यास प्रवृत्त झाला असतां, तीर्थयात्रा करीत या क्षेत्रीं आला. तेव्हां येथील भूमीची अत्यंत पवित्रता पाहून धर्मराजानें सर्वतोमुखनामक यज्ञ केला. त्या यज्ञमहोत्सवास त्या प्रदेशांतील व इतर प्रदेशांतील असे लक्षशः ब्राह्मण धर्मराजाची सत्कीर्ति श्रवण करून प्राप्त झाले होते. पूर्वींच धर्मराजास सूर्यापासोन ऋषींचे पोषण करण्यास्तव इच्छित अन्न देणारी अशी एक [1]स्थाली प्राप्त झाली होती. त्या प्रसंगीं द्रौपदीनें अन्नसमृद्धीकरितां प्रार्थना केल्यावर त्या स्थालीपासोन अनेक प्रकारचीं अशीं इतकीं अन्नें उत्पन्न झालीं कीं, त्या अन्नांचा एक पर्वतच उत्पन्न झाला. त्या अन्नेंकरून धर्मराजानें ब्राह्मणांस तृप्त केलें. तेव्हां अन्नाचे पर्वतांतूनच एक शिवलिंग उत्पन्न झालें. असें पाहून तत्काल धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी, या सर्वांनीं भक्तिपूर्वक त्याची पूजा केली. तेव्हां शिव प्रसन्न झाले. त्यासमयीं भक्तजनांचें रक्षण करण्याकरितां अमृतेश्वर या नांवानें यास्थलीं आपण निरंतर वास करावा अशी पांडवांनीं देवाची प्रार्थना केली. ती परमेश्वरानी मान्य करून त्याक्षेत्रीं वास केला. आणि पांडवांस अनेक वर देऊन त्या लिंगांतच ते अंतर्धान पावले. अशी कथा महात्म्यांत असोन अमृतेश्वर लिंगाच्या दर्शनाचें व पूजेचें फार पुण्य वर्णिलें आहे. या महात्म्यांतच मुळगुंद येथील सिद्धेश्वराचें व नंदिकेश्वरांनीं दैत्याचा वध करून तेथें पर्वतावर राहिल्याचें वर्णन आहे तें पूर्वींच लिहिलें गेलें आहे. असो.

---

१ थाळी.

•अन्नगिरीक्षेत्रसंबंधी मुख्य विधि अमृतेश्वराची पूजा. ती करून रघुनाथराव हे त्रिकूटाचलक्षेत्रीं जाण्यास निघाले.

त्रिकूटाचलक्षेत्रास आतां गदग ह्मणतात. हा गांव फार मोठा असोन व्यापाराचा आहे. येथें सर्वप्रकारचा व्यापार चालतो. एक त्रिकूटेश्वर महादेव व दुसरी वीरनारायण या उभय देवतेचें अंतर दीड मैलाहून कमी नसेल. त्रिकूटेश्वराचें मंदीर फार कालाचें जुनें असोन दगडावर वेलबुट्टी बहुत उत्तम खोदलेली आहे व नानाप्रकारच्या मूर्ती फारच सुभग करून जागजागीं बसविल्या आहेत. हें देवालय अगदीं जर्णिदशेस आलें आहे. विद्यमानकालीं त्याचा जीर्णोद्धार होण्याचा संभव वाटत नाहीं. असो.

मंदिराचे गर्भगृहांत शाळुंकेवर अनुक्रमें हस्तप्रमाण उंचीचीं तीन स्वयंभू लिंगें आहेत. तीं ब्रह्मदेव, विष्णू, आणि शंकर, या नामेंकरून प्रसिद्ध आहेत. तेथून त्रिकूटपर्वत समीप आहे. वीरनारायणाचे मंदीर मोठें असोन आंत नारायणाची मूर्ती काळे पाषाणाची चतुर्भुज उभी आहे. या मूर्तीचें सौंदर्ययुक्त ध्यान पाहून अंतःकरणास फार समाधान वाटतें. या क्षेत्राचें माहात्म्य पहाण्याची रघुनाथराव यांस फार इच्छा होती परंतु उपलब्ध झालें नाहीं.

येथील त्रिकूटेश्वर व वीरनारायण या उभय देवांची पृथक् पृथक् पूजा करून तिसरे दिवशीं ब्राह्मणभोजन झाल्यावर रघुनाथराव हे रेणुकाचलावर देवीचे दर्शनास्तव चालते झाले. या प्रदेशांतील प्राकृतजन तेथील देवीस यल्लंमा ह्मणतात.

मार्गांत क्रमानें नवलगुंदगांवीं त्यांचा मुक्काम झाला. तेथें हेबळीकर जहागीरदार चीदंबरराव विठ्ठल हे त्यांचे भेटीस आले होते. नवलगुंदगांवापासोन तीन कोसांवर यमनूर नांवाचा एक लहान गांव आहे तेथें पीराचें स्थान आहे त्याची प्रसिद्धी त्याप्रदेशीं पुष्कळ असोन फाल्गुन वद्य पक्षीं पीराचा उरूस होतो, तेव्हां फार मोठी यात्रा जमते. किमानपक्षी दीड लक्षावर मनुष्यें त्या ठिकाणीं जमत असतील. तेथें त्या प्रदेशांतील बहुतेक गांवचे व्यापारी लोक दुकानें घेऊन येतात. त्यांत

---

१ प्राप्त.

देवघेव लक्षावधी रुपयांची होऊन ती यात्रा पंधरा दिवस त्या ठिकाणीं असते. पशूंचे वध फार होतात, यात्रेचे दिवसांतच नवलगुंदास जाणे झालें होतें सबब तेथील मेळा पाहण्याकरितां मुद्दाम रघुनाथराव हे जुजबी मंडळीसह गेले होते. दुसरे दिवशीं नवलगुंदाहून निघाले आणि रेणुकापर्वतावर जाऊन पोहोंचले.

रेणुकापर्वत हा फार मोठा नाहीं. मध्यम असोन वर जाण्यास उत्तम सडक बांधिली असल्यामुळें देवीचें मंदिरापर्यंत गाड्या जाण्यास हरकत नाहीं. शारदी व वासंतिक नवरात्रांत येथें फार यात्रा भरते तेव्हां यात्रेवर कर ठेविला आहे त्याचें उत्पन्न बहुत होतें. त्या उत्पन्नांतून यात्रस्थांस रहाण्याकरितां उत्तम धर्मशाळा, रस्ते, पूल, वगैरे फार उत्तम केले असून म्युनसिपाल कमेटीनें सर्व प्रकारची सुधारणा केल्यामुळें त्या ठिकाणांस अत्यंत शोभा आली आहे.

या स्थलास रेणुकापर्वत असें नांव असोन रामशृंगपर्वत असें ही नांव आहे. हें स्थान मध्य भागीं असल्यामुळें तेथील शोभा एक प्रकारची विलक्षण दिसते. यास्थलीं पूर्वी थोरले माधवराव साहेब पेशवे कर्नाटक प्रांताचा बंदोबस्त करण्याकरितां आले तेव्हां त्यांनीं रेणुका देवीचें दर्शन करून मंदीर बांधविलें. मंदिराचे प्राकारा बाहेर थोडें अंतरावर दोन स्वतंत्र मंदिरें आहेत. एकांत क्षेत्रपाल भैरवाची मूर्ती व दुसऱ्यांत जमदग्नीश्वर नामे शिवलिंग असें असोन, समीपच परशूरामाची मूर्ती उभ्या आकृतीची आहे. या क्षेत्रीं मुख्य तीर्थ हरिद्राकुंड वर्णिलें आहे. ते तीर्थ दीड हातलांब व तितकेंच रुंद असून याच मानानें दीड हात खोल आहे. कुंडावरून सर्वकाळ पाणी वाहत असतें. क्षेत्रस्थ लोक स्नानास व पीण्यास याच तीर्थाचें उदक वापरतात. रेणुका महात्म्यांत हरिद्रा तीर्थाचें पुष्कळ वर्णन केलें असून मलापहा नदीचें महात्म्य फार वर्णिलें आहे. हीं नदी क्षेत्रापासून तीन मैलाचे अंतरावर आहे. रेणुका महात्म्यांत मलापहा नदी ही भागीरथीचाच एक भाग आहे म्हणून लिहून पर्वविशेषीं स्नानाचें फार माहात्म्य वर्णिलें आहे. ती पर्वे भानुवासर, पौर्णि-

मा, रेवती, प्रीतियोग, भद्रा, व्यतीपात, आमावास्या. हीं पर्वें मलापहा स्नानास प्रशस्त सांगितलीं आहेत.

रेणुका देवींचे पूजक शुद्र जातींचे लिंगाईत आहेत. ते देवीस इतरांचा स्पर्श होऊं देत नाहींत. नीचजन तुझी पूजा करितील असा रेणुकेस ब्राम्हणांचा शाप असल्यामुळें अंत्यवर्ण ( शुद्र ) रेणुका देवीचे पूजक आहेत. या संबंधीं माहात्म्यांत मोठी विस्तृत कथा वर्णिली आहे.

देवीचे मंदिरासमीप मोठें रमणीय व जागृत असें एक श्रीदत्ता-त्रेय याचें स्थान आहे. रेणुका क्षेत्रीं दत्ताचे सांनिध्य सर्वकाल असतें असे क्षेत्रमाहात्मीं वर्णित असोन त्याप्रमाणें बहुतलोक त्या-क्षेत्रीं दत्ताची सेवा करितात.तेथील राहणारा असोन मोठा व वयो-वृद्ध अशा एका ब्राह्मणानें रघुनाथराव यांस दत्तात्रेय संबंधी प्राचीनकालचा चमत्कारिक एक वृत्तांत सांगितला. तो वाच-कांकरितां थोडक्यांत लिहितों.

पूर्वी जगदुद्धारार्थ साक्षात महेश्वरानी केरल देशांतील आपस्तं-बशाखीय ब्राह्मणाचे कुलांत जगद्गुरू इत्यादि बिरुदावलीने सुभा-षित असे प्रसिद्ध शंकराचार्यानामाने अवतार धारणकरून नानाविध अद्भुत चरित्रें केलीं. त्यापूर्वीं ( शंकरचार्याचे पूर्वीं ) मच्छेंद्रनाथ नामानें साक्षात् विष्णूचा अवतार जगतीतलीं झाला होता. त्याचे ( मछेंद्राचे ) मुख्यशिष्य गोरक्षनाथ नामाने विख्यात असोन हे उभयतां ही महद्योग साधनानें लोकोत्तर सिद्धतेस पावले होते.

सच्छिष्य गोरक्षनाथ यानी प्रत्यही उत्तम प्रकारें गुरूसेवा क-रून गुरू मछेंद्रनाथ यांकारितां भिक्षामागून अणावी व ती भिक्षे-ची झोळी मछेंद्र हे समाधिस्त असतील तेथें ठेऊन आपण नित्यकृत्य करण्यास गमन करावें.पुढें समाधीचे व्युत्थान[1] झाल्यावर मच्छेंद्रानी झोळींतील अन्न भक्षून गोरक्ष शिष्याकरितां कांही शेष ठेवावें असा नित्यक्रम चालत असे.

पुढें कांही कालांत गुरूकृपेनें गोरक्षनाथ हे योगाभ्यासांत नि-ष्णांत होऊन नित्य योगाभ्यास करीत यामुळें भिक्षा मागण्यास त्यां-

---

१ समाधीतून उठणे.

स ( गोरक्षांस ) अवकाश होईनासा झाला. तेव्हां त्यांनी योगबलाने फक्त झोळीच आकाशमार्गें पाठवावी व योग्य ग्राम प्राप्त झालाह्मणजे गोरक्षाचे तपःसामर्थ्याने तेथेंच अवचित एक पुरुष उत्पन्न व्हावा व त्याने ग्रामांत संचार करून भिक्षा मागावी आणि ती भिक्षान्नाची झोळी परत आकाशमार्गाने गोरक्षांचे संनीध यावी. नंतर त्यांनी नित्यक्रमाप्रमाणें मछेंद्राचे समीप ती झोळी ठेऊन मग आपण स्वतः योगसाधनास प्रवृत्त व्हावें. आसा क्रम किती एक दिवस चालू असे.

एके दिवशीं आकाशपंथाने या रेणुका पर्वतावरून ती झोळी जात आहे असें श्रीदत्तात्रयानी पाहून त्यांस आश्चर्य वाटलें आणि हें कृत्य योगसिद्ध पुरुषाचें असावें असा त्यांचे मनाचा निश्चय झाला. तेव्हां अशा महत्सिद्धीचा पुरुष कोण असावा हे यथार्थ वृत्त कळावें अशा बुद्धीने त्या झोळींतील सर्व अन्न घेऊन रिकामी पाठविली ती गोरक्षानें नित्यक्रमाप्रमाणें मच्छेंद्र गुरूंचे संनीध स्थापन करून आपण स्वकार्य सिद्धीस प्रवृत्त झाला.

इकडे मच्छेंद्र गुरू हे समाधिधर्मापासोन देह स्थितीस अनुसरल्यावर झोळींत पाहिलें तों अन्न नाहीं. तेव्हां कदाचित् क्षुधेमुळें गोरक्षानेंच अन्नभक्षण केलें असेल अशी कल्पना करून पुनः समाधि ग्रहण केली. गोरक्षाने नित्याप्रमाणें झोळी पाहिली तों त्यांत अन्न नाहीं. तेव्हां गुरूनीच सर्व अन्न भक्षिलें असेल अशी गोरक्षास कल्पना होऊन तोही पुनः योगसमाधीस प्रवृत्त झाला. अशा प्रकारें समग्र एक मास अतिक्रांत झाल्यावर एकेदिवशीं मछेंद्रानी गोरक्षास विचारिलें कीं सांप्रतकालीं झोळींत अन्न कां नसतें? तूंच भक्षण करितोस कीं काय? त्यावर त्यानें अशी प्रार्थना केली कीं एक महिनाभर झोळींत अन्न नसतें हें खरें. तें सर्व अन्न आपणच भक्षण करीत असाल यामुळें मी स्तब्ध आहें! तें ऐकून गुरू आणि शिष्य हे दोघे ही परम आश्चर्यास पावून विचार करू लागले, तेव्हां त्यांस असें वाटलें कीं झोळींतील अन्न मध्येंच जो कोणी ग्रहण करणारा आहे तो योगसिद्ध पुरुष असावा यांत संशय नाहीं. त्याचा शोध

लावावा. असें मच्छेंद्रास वाटून त्यानी शिष्यास असें सांगितलें कीं तूं याचा पूर्ण विचारानें शोध कर.

दुसरे दिवशीं गोरक्षानें नित्याप्रमाणें झोळी आकाश मार्गानें पाठवून आपण गुप्तरूपें सिद्ध मार्गानें झोळीचे मागें चालला तों नित्यक्रमाप्रमाणें ग्राम प्राप्त झाला असतां तेथें अयाचित पुरुष प्रगट होऊन त्यानें त्या ग्रामांत भिक्षा मागितली. आणि अन्नपूरीत ती झोळीं परत आकाशमार्गानें पाठविली. ती रेणुकापर्वतावरून जात असतां मध्येंच दत्तात्रेयानी धरून त्यांतील सर्व अन्न घेतलें. हें पाहून गोरक्षानी त्यांस ( दत्तात्रेयांस ) असा प्रश्न केला कीं, आपण कोण अहांत व हे झोळींतलि अन्न कां घेतां? त्याचें उत्तर त्यांनीं असें सांगितलें कीं, मी कोण हे तूं विचारू नको. पण तूं कोण व कोणाचा शिष्य आहेस हे प्रथम सांग, मग मी आपले वृत्त सांगेन. तेव्हां गोरक्षांनी आपला सर्व वृत्तांत त्यास कळविला. नंतर परस्परांत हटयोग संबंधीं बोलाचाल पुष्कळ व फार चांगली झाली. त्यांत गोरक्षांस योगाचा थोडा अभिमान असल्यामुळें दत्तात्रेयांनीं असें भाषण केलें कीं,तुला योगासिद्धी निश्चित प्राप्त झाली यांत संशय नाहीं. परंतु एकवार तुझ्या योगसिद्धीविषयीं मला परीक्षा पाहणें आहे. या करितां तूं योगबलानें कोठें तरी गुप्त स्थलीं जा, मी तेथें येऊन तुला भेटेन नंतर मी गुप्त होईन. ती गोष्ट गोरक्षानी कबूल केली.

पुढें गोरक्ष हा योग मार्गानें लोकालोक पर्वताचे गुहेंत जाऊन गुप्त बसला. इतक्यांत दत्तात्रेय त्या स्थलीं प्राप्त झाले हें पाहून गोरक्षास अत्यंत अश्चर्य वाटलें. नंतर दत्तात्रेय गुप्त होऊन ब्रह्मस्वरूपानें सर्वत्र ब्रह्मांडकटाहांत व्याप्त झालें. इकडे गोरक्ष त्यांचा शोध करूं लागले तों त्यांनीं सर्व सृष्टींतील प्रदेश शोधिले. परंतु कोठें ही त्यांचा ठिकाण लागला नाहीं. नंतर सर्व पाताल लोक पाहिला. त्या प्रमाणें स्वर्ग लोक ही शोधिला. परंतु कोठेंच त्यांचा थांग लागेना. तेव्हां फार श्रमानें खिन्न झालेला व निराश असा तो गोरक्ष रेणुकापर्वतावर दुःखित होऊन बसला-अशी स्थिति गोरक्षाची झाल्यावर दशदिशेंतून, वृक्ष, पाषाण, उ-

दक, आकाश, आग्नि, या सर्वांपासोन "अरे गोरक्षा मी या स्थलीं आहे" असा ध्वनी निघूं लागला. तो विस्मयावह चमत्कार पाहून त्यांनें स्वगर्वाचा त्याग केला. आणि साष्टांग नमस्कार घालून मगला साक्षात् दर्शन द्या असें बोलला.

तेंव्हा दत्तात्रेय हे प्रत्यक्ष होऊन गोरक्षास बोलले कीं, "तूं मला पहाण्याकरितां इतका परिश्रम कां केलास ? मी तर सर्वत्र असोन तुझ्या शरीरांत सुद्धां व्यापक आहें. असें असतां व्यर्थ कां श्रमलास" हें ऐकून गोरक्ष अत्यंत लज्जित होत्साता पुनः बहुत प्रकारें स्तुति करून दत्तात्रेयांस त्यांनें विनयपूर्वक साष्टांग नमस्कार केला. नंतर त्यांनीं सांगितलें कीं, आतां तूं आपले गुरूचे संनिध जा आणि त्यांस यास्थलीं घेऊन ये; हें भाषण ऐकिल्यावर गोरक्षा मच्छेंद्र गुरूचे संनिध जाऊन झालेलें सर्व वृत्तें निवेदन केलें. तेंव्हां त्यांनीं सांगितलें कीं तूं ज्याचें वृत्त सांगतोस ते साक्षात् दत्तात्रेय आहेत. असो, आतां आपण उभयतां ही त्यांचे दर्शनास जाऊं असें बोलून योग मार्गानें उभयतां गुरु शिष्य रेणकापर्वतीं आले. आणि दत्तात्रेय यांचें दर्शन करून उभयतांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घातले.

नंतर मच्छेंद्रानी हात जोडून अशी विज्ञापना केली कीं, महाराज मी आजपर्यंत केवळ हटयोगांतच दिवस घालवून सिद्धत्वाचे अभिमानांतच बुडालों होतों. विद्यमान आपल्या कृपा कटाक्षाचे शक्तिपातानें माझें अंतःकरण द्रवून सात्विक रसांत निमग्न झालें आहे. आतां कृपेनें मला महावाक्याचा उपदेश करून कृतार्थ करावें. हें दत्तात्रे यांनीं ऐकून ब्रम्ह विद्या अल्पायासानें प्राप्त होणार नाहीं हे लोकांत दाखविण्यास्तव मच्छेंद्राथास सांगितलें कीं, या पवित्र रेणुका क्षेत्रीं कांहीं दिवस वास करून प्रथम शिवभक्तिसुधारसानें अंतः करण निर्मल कर नंतर कांहीं काल आदिनाथ शंकर याचे चिद्रत्न लिंगाची उपासना कर झणजे साक्षात् शंकर तुला ज्ञानोपदेश करून कृतार्थ करितील. असें बोलून दत्तात्रेय अंतर्धान पावले. पुढें मच्छेंद्रनाथांनीं जमदग्नीश्वराचे संनीध वास करून नवविधभक्तीनें युक्त चिद्रत्न लिंगाची

अहंग्रहोपासना केल्यावर आदिनाथ शंकर यांनीं दक्षिणामूर्ति रूपानें प्रत्यक्ष होऊन मच्छेंद्रास ज्ञानोपदेश केला. आणि सांगितलें कीं, तुझा शिष्य गोरक्ष हाही आतां उपदेशास पात्र आहे. तर त्यास तूं उपदेश करून कृतार्थ कर. पुढें गोरक्ष आपले शिष्यास ज्ञानोपदेश करील. अशा परंपरेनें हा नाथसंप्रदाय भूलोकीं चालेल. परंतु कलियुग महात्म्यानें या नाथपंथांत पाखंडमतें उत्पन्न होऊन हा मार्ग लुप्त होईल. अशा संधीस मी जगदुद्धारार्थ शंकराचार्य रूपानें अवतार धारण करून ब्रह्मविद्या संप्रदाय शिष्यद्वारा प्रवृत्त करीन. अशी कथा ब्राह्मणानें सांगितलेली ऐकून रघुनाथराव यांस बहुत संतोष वाटला.

रेणुका क्षेत्रीं तीर्थस्नान व रेणुका देवीची व इतर देवतेची पूजा तेथलि विधिप्रमाणें करून दुसरे दिवशीं मुरगुड गांवीं चिदंबरेश्वराचे दर्शनास रघुनाथराव हे चालते झाले. मार्गांत पर्वताखालीं संवदत्ती या नांवाचा मोठा तालुक्याचा गांव लागला. तेथून पुढें क्रमानें ते मुरगुडास जाऊन पोंहोचले.

प्राचीनकाळीं ह्मणजे सुमारें ७२ वर्षांवर चिदंबरदीक्षित या नांवाचें कण्वशाखेंत मोठे सिद्ध पुरुष उत्पन्न झाले होते. त्यांस अग्निहोत्र असोन त्यांनीं बहुत यज्ञ केले असें सांगतात. शेवटीं मलापहानदीचे तीरीं अग्निचित् नामें करून यज्ञ केला. त्या यज्ञमहोत्सवांत कांहीं दिवसपर्यंत तीस हजारावर ब्राह्मणभोजन प्रत्यहीं होत असे. दीक्षितांच्या सिद्धत्वाविषयीं बहुत गोष्टी ऐकण्यांत आल्या. कर्नाटक प्रदेशीं तर सर्वत्र त्यांची प्रसिद्धि आहेच. परंतु या महाराष्ट्र देशांत सुद्धां त्यांचें नांव आणि कीर्ती माहीत नाहीं असा मनुष्य क्वचित् असेल. त्यांचें देहावसान मुरडगांवीं झालें. तेव्हां त्रेताग्नीनें त्यांचें दहन केलें. त्या स्थळीं शिवालिंग स्थापन केलें आहे. त्यास चिंदबरेश्वर असें ह्मणतात. दीक्षित हे साक्षात् शिवाचा अवतार आहेत असें मानून त्यांची उपासना करणारे शेंकडों लोक त्या प्रांतीं आहेत. प्रति शिवरात्रीस हजारों लोक चिंदबरेश्वराचे दर्शनाकरितां व नवस फेडण्याकरितां येतात. प्रति माघ वद्यपक्षांत शिवागमपद्धतीनें उत्सवास आरंभ

होऊन शेवटीं रथोत्सव होतो. या उत्सवाचे खर्चास नरगुंदकर जहागीरदार यांजकडून फार मदत होत असे. हल्लीं तें संस्थान इंग्रज सरकारचे कबजांत गेल्यामुळें पूर्वीं प्रमाणें आतां उत्सव होत नाहीं.

चिदंबर दीक्षिताचे वंशस्थ मुरगुडास व गुर्लंव्हसुरास आहेत. विद्यमान त्यांचे वंशस्थाकडेस दोन गांवें इनाम चालतात. चिदंबरेश्वराची पूजा व नैवेद्य आणि नंदादीप वगैरे खर्च गांवचे उत्पन्नांतून होतो. या देवाचे मंदिराच्या आसमंतात् प्राकार आहे. त्याचे आंत मुख्य चिदंबरेश्वराचें मंदीर असोन शेजारीं स्वतः दीक्षितांनीं मंदीर बांधवून शिवलिंग स्थापन केलें. त्यास मल्लारेश्वर ह्मणतात.

मुरगुड गांवीं प्रत्यक्ष दीक्षिताचे नातू विद्यमान आहेत त्यांस तीन पुत्र असोन सर्वांत कनिष्ट पुत्र आहे त्याचें वय सात वर्षांचे आंत असावें. रघुनाथराव मुरगुडास गेले त्या समयीं त्या मुलाचें मौंजीबंधन झालें नव्हतें. इतकें लहान वय असोन त्याची कृती मोठी आश्चर्यकारक दिसली. प्रौढ मनुष्या इतकें त्या मुलास ज्ञान असोन त्याचे अंगीं साधारण प्रभुशक्ति आहे असें स्पष्ट दिसतें. या कारणानें कोणी दत्ताचा हा अवतार आहे, कोणी अक्कलकोट येथील स्वामी समाधिस्थ होऊन जगदुद्धारार्थ येथें जन्मास आले, कोणी पूर्वींचे चिदंबर दीक्षित यांनीं अवतार घेतला, अशा प्रकारच्या नानाविध कल्पना लोक करितात. कसेंही असो; इतर मुलांपेक्षां कांहीं विशेष गुण त्या मुलाचे ठायीं आहेत यांत संशय नाहीं. काय सांगावें! कितीएक लोक नवस करून तो सफल झाला ह्मणजे फेडण्याकारितां त्या ठिकाणीं आलेले पुष्कळ पहाण्यांत आले! त्या मुलास नवससंबंधानें प्रत्यहीं एक दोन पंचामृताचीं स्नानें करावीं लागतात!! या शिवाय त्या मुलाचेच उद्देशानें त्या स्थलीं कितीएक लोक मुद्दाम येऊन ब्राह्मणभोजनें करितात. नवसाच्या संबंधानें पंचामृताचें स्नान घालितात तेव्हां मुलास परातींत बसवून दूध, दहीं वगैरे पांच पदार्थ समंत्रक अंगावर घालितात, नंतर शुद्धोदकानें स्नान मोठ्या समारंभानें करवून पुरुषसूक्तमंत्रांनीं प्रत्यक्ष देवाप्रमाणें पूजा भक्तिपूर्वक करि-

तात. त्या मुलाचे मुखांतून जसे शब्द निघतील तसे घडतें. असा अनुभव त्या प्रांतांतील भाविक लोकांस आला आहे. मुलाचे मातापितर व ज्येष्ठ बंधूसुद्धां केवळ त्याचेच इच्छेनें वर्तन करितात. असो.

या मुलास रघुनाथराव यानी पंचामृत स्नान घालून षोडशोपपचारें पूजा केली आणि दक्षणा पुढें ठेऊन रुप्याचें पंचपात्र उदकपानांस अर्पण केलें.

यास्थलीं रघुनाथराव यांची उत्तर व दक्षिण कानडा प्रदेशांतील यात्रा समाप्त झाली तेव्हां त्यानीं चिदंबरेश्वराची महा पूजा करून नैवेद्य समर्पण केला. नंतर चिदंबर दीक्षित यांचे यावत् वंशस्थ व त्या ग्रामांतील सर्व ब्राह्मण आणि स्त्रिया यांस भोजन घातलें. नंतर त्यांनीं संकल्पपूर्वक केलेल्या यात्रेची समाप्ती केली. पुढें चिदंबरेश्वराची व त्या मुलाची व त्याचे परिवाराची आज्ञा घेऊन रघुनाथराव हे नृसिंहपूरक्षेत्रीं जाण्यास्तव चालते झाले.

मार्गक्रमांत त्यांचा घटप्रभातीरीं मुधोळगांवीं मुक्काम झाला. तेथील जाहगीरदार घोरपडे हे स्वतः त्यांचे भेटीस येऊन त्यानीं त्यांस जाफत पाठविली. तिचा घोरपडे यांच्या मोठ्या आग्रहास्तव रघुनाथराव यांस स्वीकार करावा लागला. तेथून पुढें मार्गांत पटवर्धन यांचा जाहगीरगांव जमखिंडी लागला. तेथें मुक्काम न करितां रघुनाथराव हे फाल्गुन वद्य चतुर्दशीचे दिवशीं कृष्णातीरीं मुक्कामास गेले. दुसरे दिवशीं अमावास्येस कृष्णातीर्थप्रयुक्त विधीकरून दर्शश्राद्ध केलें. तिसरे दिवशीं संवत्सरप्रतिपदेस कृष्णेची महा पूजा करून ब्राह्मणभोजन घातलें. नंतर तेथून निघाले. त्या मार्गांत क्रमानें अथनी हा गांव मोठ्या पेठेचा लागला. यागांवीं मोठा व्यापार चालतो. येथील तूप बहुत प्रदेशीं विकण्यास जातें. तेथून क्रमानें डफळे यांचे मुख्य जहागिरीचे जतगांव लागलें तेथील जहागिरदार पुण्यास असल्यामुळें जतगांवी मुक्काम न करितां जहागिरदार यांचा वाडा व गांव रघुनाथराव यांनी पाहून क्रमानें पंढरपुरानजीक कासेगांवीं मुक्काम केला.

या कासेगांवी त्र्यंबकराव मामा पेठे व दादासाहेब पेशवे यांचे

मोठें घोरयुद्ध झालें होतें. या युद्धांत त्र्यंबकराव मामा पेठे मारले गेले तेंच हें कासेगांव; येथून चार मैल पंढरपूर राहतें. रघुनाथराव हे मागील प्रहररात्री निघोन पंढरपूरक्षेत्रास मागील चार घटिका रात्रीच चंद्रभागातीरावर पुंडरीकाचे मंदिरासमीप जाऊन पोहोंचले. नंतर प्रातःकालचे पूजेसमयीं परमेश्वराचें दर्शन करून देवाची पूजा केली. नंतर रुक्मिणी, सत्यभामा वगैरे परिवार देवतांचीं दर्शनें घेतलीं. तो दिवस रामनवमीचा असल्यामुळें पर्वदिवशीं देवदर्शनें व पूजा झाल्यानें रघुनाथराव यांस बहुत संतोष वाटला. नंतर पारण्याचे दिवशीं ब्राह्मणभोजन घालण्याची व्यवस्था बडव्यांचे मार्फत लावून लागलीच निघोन ते वाखरीगांवीं मुक्कामास आले. तेथून दुसरे दिवशीं निघाले ते नरसिंहपूरक्षेत्रीं चैत्र शुद्ध दशमी रोजीं मध्य रात्रीस जाऊन पोंहचले. शुद्ध एकादशीस केलेल्या यात्रेचें सांग फलप्राप्त्यर्थ श्रीनृसिंहाची महापूजा करून द्वादशीस ब्राह्मण भोजन घातलें. याप्रमाणें केलेल्या यात्रेची रघुनाथराव यानीं समाप्ति केली.

या तीर्थयात्रेंत रघुनाथराव यांनीं आपले मातुश्रीकडून प्रत्येक क्षेत्रीं उत्तम प्रकारें दानधर्म करविला. आणि सर्व क्षेत्रांतील देवतांचीं दर्शनें व तीर्थस्नानें त्यांजकडून करविलीं. दुसरे मार्गाचे श्रम मातुश्रीस न व्हावें या हेतुनें साधेल तितका स्वतः बंदोबस्त ठेवण्यास आळस केला नाहीं. असे प्रकारें मातृसेवा करून तीर्थयात्रा यांनीं केली.

शके १८०४ इसवी सालीं कार्तिक वद्य ९ [ तारिख ५ डिसेंबर सन १८८२ ] रोजीं तीर्थ यात्रेस नृसिंहपूरक्षेत्राहून रघुनाथराव निघाले ते सन १८८३ चे एप्रील महिन्यांत [ चैत्र शुद्ध दशमी ] रोजीं नृसिंहपूर क्षेत्रीं परत आले. एकंदर साडेचार महिने रघुनाथराव यांचा प्रवास झाला. हा प्रवास आगगाडीतील प्रवासाप्रमाणें सुखदायक नसून पायमार्गें मोठ्या बिकट प्रदेशाचे अरण्यांतील श्रम सायासाचा झाला. या प्रवासांत गोकर्णक्षेत्रीं १७ दिवस व शृंगेरीस गुरुचरणसन्निधानीं ७ दिवस इतके मुक्काम होऊन विश्रांती झाली. बाकीच्या क्षेत्रीं तीन तीन

दिवसाहून जास्त मुक्काम न होतां यातायातींत व प्रवासाचे खटपटींत दिवस गेले. या कारणामुळें बरोबरची मंडळी बहुत थकली. त्यांत मातुश्री ताईसाहेब व वृद्ध दिनकर शास्त्री बरोबर होते ते ही थकल्यासारखे झाले असून किती एक बरोबरचीं माणसें हवा-पाण्याची बद्दल झाल्यानें दुखणाईत झालीं होतीं. रघुनाथराव यांस ही मार्गपरिश्रम बहूत झाले होते यामुळें जरी त्यांस विंचुरास जाण्याची त्वरा होती तथापि नृसिंहपूरासच स्वस्थतेनें दीड महिना मुक्काम करणें भाग झालें.

या दीड महिन्याचे अवकाशांत वार्षीक नरसिंहजयंतीचा उत्सव नरसिंहपूरक्षेत्रीं करणें प्राप्त झालें. तेव्हां चालत आल्या क्रमानें उत्सवास वैशाख शुद्ध ७ रोजीं आरंभ होऊन शुद्ध १४ स मुख्य जन्मोत्सव झाला. दुसरें दिवशीं पौर्णिमेस श्रीनरसिंहाच्या पादुका पालखींत ठेवून मोठ्या समारंभानें गांवांत मिरवतात. तें कृत्य झाल्यावर प्रतिपदेस दिवसा मध्यान्हीं गोपालकाला व उत्तर रात्रीं द्वितीयेस तीर्थप्रसाद झाला. अशा प्रकारें जयंतीच्या उत्सवाची समाप्ती झाली. पुढें आठ दहा दिवस स्वस्थतेनें क्षेत्रीं मुक्काम झाला या अवकाशांत देवाची महापूजा ब्राह्मणभोजन वगैरे झालें. नंतर वैशाख वद्य एकादशीस कुलस्वामी नरसिंह यांचा निरोप घेऊन विंचुरास जाण्याकरितां रघुनाथराव चालते झाले. ते प्रथम केम स्टेशनावर येऊन आगगाडीमार्गें पुण्यास आले, तेथें सदाशिव पेठेंत विंचूरकर यांच्या वाड्यांत मुक्काम झाला.

तेथें कनिष्ट बंधूचे चिरंजीव बाळा साहेब यांस इंग्रजी अभ्यासाकरितां पुण्यास ठेविलें आहे. त्यांचे प्रेमसंबंधानें एक महिना भर पुण्यास मुकाम झाला. त्याच संधीस महामारीचा उपसर्ग सर्वत्र सुरू होता, हें ही मुकाम करण्यास योग्य कारण झालें. असो, नंतर तेथून ( पुण्याहून ) निघोन आगगाडीमार्गें जेष्ट वद्य दशमीस विंचूर मुकामीं रघुनाथराव हे सुखरूप येऊन पोंहोचले. येणें करून त्यांचे कनिष्ट बंधू माधवराव दादा साहेब यांस व पदरचे मंडळीस आणि विंचूर इलाख्यांतील सर्व प्रजाजनांस बहुत संतोष झाला.

कांही वर्षांपूर्वी विंचुरास रघुनाथराव यानी नवीन रथ करवून

श्री नरहरीस अर्पण केला. त्या रथोत्सवाचा वार्षीकक्रम असा आहे कीं अषाढ शुद्ध ४ दिवशीं नामसप्ताहास व श्रीमद्भागवत सप्ताहास आरंभ होऊन दशमीचे दिवशीं त्याची पूर्णता होतांच एकादशीस विष्णवागमपद्धतीनें रथमहोत्सव करावा असा नियम आहे. ते दिवस प्राप्त झाल्यामुळें नामसप्ताह व श्रीमद्भागवत सप्ताह आणि मोठ्या समारंभचा रथोत्सव हीं कृत्यें क्रमाप्रमाणें होऊन द्वादशीस ब्राह्मण भोजन झाल्यावर गोपालकाला झाला आणि उत्सवाची समात्पी झाली. त्याचदिवशीं रात्रीस रघुनाथराव यांनीं त्र्यंबक येथें चातुर्मास्यवास करण्याचे इछेनें जाण्याचा बेत केला. परंतु बहुत दिवसांनीं विंचूर येथे येणें झालें आहे त्या पेक्षा आतांच त्र्यंबकास नजातां पुढें जावें असें त्यांचे बंधूनीं व इतर मंडळींनीं आग्रहपूर्वक सांगितलें. तथापि सयुक्तिक सर्वांचें समाधान करून रघुनाथराव हे त्र्यंबकक्षेत्रीं जाण्यास निघाले.

कारण चातुर्मास्य त्र्यंबकक्षेत्री वास करून श्री त्र्यंबकेश्वराचीं यथाशक्ति सेवा करावी आणि आपण जन्मास आल्यांच सार्थक व्हावें या हेतूनें ते निघोन अषाढ शुद्ध चतुर्दशीस त्र्यंबकक्षेत्रीं पोहोंचले. दुसरे दिवशीं शुद्ध पौर्णमासी तो चातुर्मास्य आरंभाचा प्रथम दिवस तेंव्हा पासोन प्रत्यहीं प्रातःस्नान, त्रिकाल श्री त्र्यंबकेश्वराचें पूजन, वेदांतश्रवण, विष्णुपूजा, गीता, विष्णु सहस्त्रनामाचे पाठ, पुराणश्रवण अशा प्रकारें सत्कालक्षेपेंकरून रघुनाथराव यांनीं क्षेत्रवास केला.

कांहीं वर्षापूर्वी त्र्यंबकेक्षेत्रीं रघुनाथराव यांचे रहाणें सहामहिन्यावर झालें होतें. तेंव्हांपासून देवदर्शनाकरितां वरचे वर त्यांचें येणें जाणें असल्यामुळें क्षेत्रांतील सर्व विद्वान मंडळींशीं आणि इतर गृहस्थ, भिक्षुक, या सर्वांशीं फार परिचय वाढला. दुसरे काशीपंत बाबाचे चिरंजीव नाराणराव तात्या त्र्यंबक संस्थानचे कारभारी यांचा व रघुनाथराव यांचा स्वामिसेवकभाव पूर्वीं पासोन चालू आहे. त्यांत बालपणापासोन उभयतांचें अंतःकरण परस्परें सप्रेम असल्यामुळें घरापेक्षां ही त्र्यंबकेक्षत्रीं रहाणें रघुनाथराव यांस बरेंच सुखकारक झालें.

चातुर्मास्यक्रमांत कार्तिक मास प्राप्त झाला तेव्हां मासपर्यंत त्र्यंबकेश्वराचे मंदिरांत व कुशावर्ततीर्थीं प्रत्यहीं दीपोत्सव करून देवासमीप सांयकाळीं गवयी लोकांचें गाणें व प्रातःकाळीं कुशावर्ततीर्थीं कार्तिकस्नान वगैरे विशेषधर्मकृत्यांत तो मास रघुनाथराव यांनीं घालविला. पुढें कार्तिक शुद्ध पक्षांत नियमित दिवशीं शिवागमपद्धती प्रमाणें रथोत्सवकृत्यास आरंभ होऊन पौर्णिमेस त्रिपुरविजयरथमहोत्सवास आरंभ झाला. या उत्सवास विंचूर संस्थानचे आश्रित आणि गांवांतील भिक्षुक व गृहस्थ अशी पुष्कळ मंडळी शिवाय यात्रस्थ इतर जनसमुदाय ही बहुत जमला होता. वद्य प्रतीपदेस ब्राह्मण भोजन होऊन उत्सवाची समाप्ति झाली. हा रथोत्सव कांहीं वर्षांपूर्वीं रघुनाथराव यांनींच सुरू केला.

रघुनाथराव यांनीं दिनकर शास्त्री बावांपासोन ब्रह्म सूत्रभाष्य श्रवण करण्याचा आरंभ केल्यास एक वर्षावर कांहीं दिवस झाले असतील, त्याची समाप्ती अनायासें या क्षेत्रीं ( त्र्यंबकक्षेत्रीं ) प्राप्त झाली तेव्हां तो समारंभ कार्तिक वद्य २ शुक्रवारींच झाला. त्या प्रसंगीं सरस्वतीपूजा आणि वक्त्याची मधुपर्कपूर्वक पूजा केली. नंतर ब्राह्मण व सुवासिनी आणि यतीश्वर या सर्वांस भोजन घातलें. पूर्वीं दिनकर शास्त्रीबावा पासोन रघुनाथराव यांनीं प्रस्थानत्रय श्रवणास आरंभ केला. पैकीं गीताभाष्य व सूत्रभाष्य श्रवण झालें. आतां उपनिषद्भाष्य श्रवण करणें राहिलें तें ईश्वर इच्छेनें होईल. असो.

## नित्ययात्राक्रम.

त्र्यंबकक्षेत्रीं नित्ययात्राविधी आहे तो यात्रस्थ लोकांनीं व क्षेत्रस्थांनींही प्रतिदिवशीं अवश्य केला पाहिजे. असा क्षेत्रमहात्म्याचा आशय आहे. पण त्याप्रमाणें त्या त्या देवता कोणकोणते स्थलीं किती अंतरावर आहेत, अशाविषयीं काशीक्षेत्रस्थ देवतेचा अनुक्रम निबंध असल्याप्रमाणें येथें तशी स्थिति नाहीं वगैरे कारणानें या क्षेत्रीं हा यात्राविधी लुप्त झाल्यासारखाच आहे असें स्पष्ट दिसतें. यास्तव हा यात्राविधी प्रचारांत आला अस

तां लोकांस पुण्यप्रद होईल असें जाणून रघुनाथराव यांचें मानस ती यात्रा करण्याविषयीं उत्सुक होतें. परंतु त्यांचें त्र्यंबकक्षेत्रीं आगमन झाल्या वेळेपासोन सतत पर्जन्यवृष्टी असल्याकारणानें कित्येक दिवस तो हेतू सिद्धीस गेला नाहीं. पुढें कार्तीकमासांतर स्नानादि विशेष नियम असल्यामुळें ते दिवस यात्रेस प्रशस्त झाले नाहींत. जाणोन कार्तीक वद्य ३ शनिवार रोजीं तो यात्राविधी साधून घ्यावा अशा इच्छेनें ते तयार होऊन निघाले. तो विधी असा आहे कीं:—

नित्यक्रमाप्रमाणें पहाटेस शुचिर्भूत होऊन कुशावर्ततीर्थावर स्नान, व संध्यावंदन, पितृतर्पणादि नित्यविधी पूर्ण करावा. नंतर तेथेंच नित्ययात्रेचा संकल्प करून तो विधी निर्विघ्नपणें शेवटास जाण्यास्तव प्रथमतः श्रीगणपतीचें पूजन किंवा स्मरण करून पूर्वीं १ कुशेश्वर महादेव व त्याचे संनिध कोनाड्यांत २ श्री नरसिंह, या उभय देवांचें पूजन करून ३ गंगातीर्थ ( कुशावर्त ) यास सात किंवा तीन प्रदक्षणा भक्तिपूर्वक कराव्या. या पुढें जें तीर्थ लागेल त्याचें आचमन, मार्जन ( मंत्रांनीं प्रोक्षण ) व ज्या देवता लागतील त्यांची पूजा व त्यांस प्रदक्षिणा आणि नमस्कार व कोठें देवतेचे व तीर्थाचे प्रार्थना श्लोक आहेत ते त्या देवतेच्या नावांखालीं लिहिल्याप्रमाणें म्हणावेत. अशा अनुक्रमें ही यात्रा करावी.

### तीर्थांची व देवतेची अनुक्रमें नांवनिशी.

४ कनकल तीर्थ ५ नीलगंगा गोदावरी संगम, ६ नीलेश्वर महादेव ७ वागीश्वर गणपती ८ हनुमंत ९ हनुमत्तीर्थ १० शनैश्चर. पुढें श्री त्र्यंबकेश्वर देवाच्या देवळाचे पूर्वद्वारानें प्रवेश करून ११ भैरव १२ षडानन १३ त्रिसंध्येश्वर १४ त्रिसंध्येश्वरतीर्थ प्रार्थना.

#### श्लोक.

यस्य दर्शनमात्रेण संध्यालोपो भवेत्कचित् ॥
सद्यो गच्छे द्विशुद्धोपि ब्रह्मविद्या मवाप्नुयात्॥ १ ॥

१५ कपोतेश्वर महादेव १६ कपोतेश्वर तीर्थ १७ गायत्री

देवी. इचे संनिध अठावीस संख्ये पर्यंत तरी गायत्रीजप करावा. प्रार्थना.

### श्लोक

यस्या दर्शनतो देव्या गायत्रीजपकोटिभाक् ॥
सर्वमंत्रपुरश्चर्याफल माप्नोति मानवः ॥ १ ॥

१८ ऋण विमोचन तीर्थ १९ मोक्षेश्वर २० त्रिभुवनेश्वर महादेव. येथें क्षणभर शुद्ध मनानें देवाचें ध्यान करावें, प्रार्थना.

### श्लोक

सद्यःपापहरं मोक्षप्रदं लिंगं विभोरिदं ॥
कलौ पापात्मनां पुंसां दारिद्र्यफलभागिनां ॥ १ ॥
प्रायःश्रद्धा न लिंगेऽस्मिन् भुवनेशे भविष्यति ॥

२१ इंद्रेश्वर महादेव २२ शक्रतीर्थ २३ शक्रकूप २४ गंगागौरी, पुढ त्र्यंबकेश्वर देवाचे पूर्वद्वारानें देवळांत जाऊन २५ द्वारदेवता, यापुढें दरवाजांतील देवडीचे उंबऱ्यास पादस्पर्श न करितां उल्लंघन करून जावें. २६ विघ्नेश्वर देव, तेथून बाहेर आल्यावर शिखरदर्शन घ्यावें व शिव शिव असे शब्दोच्चार करावेत २७ भास्कर देव २८ पीठेश्वर २९ सिद्धेश्वर ३० विघ्नेश्वर ३१ दुर्गादेवी ३२ गौरीदेवी ३३ विश्वेश्वर ३४ भद्रेश्वर, देवाचे डावे बाजूस ३५ योगिनी ३६ चंडा देवी, त्यापुढें ३७चतुर्भुजा देवी ३८ अनंता देवी ३९ विश्वतोमुखा देवी ४० वराह देव ४१ विष्णू ४२ नरसिंह ४३ वामन ४४ अविमुक्तेश्वर ४५ गौरीश्वर, येथें क्षणमात्र बसावें; ४६ वक्रतुंड गणपती, देवाच्या उत्तरभागीं ४७ मोक्षपद ४८ मोक्षद्वार ४९ सनक ५० सनंदन ५१ सनातन ५२ ईश्वर ५३ सनत्कुमार ५४ योगींद्र ५५ दत्तात्रेय ५६ ईश्वरेश्वर ५७ कपिलेश्वर ५८ वामदेवेश्वर ५९ पिप्पलादेश्वर ६० दुर्वासेश्वर ६१ असितेश्वर ६२ मातुलिंगेश्वर ६३ नानादेशेश्वर ६४ देवेश्वर ६५ व्यासेश्वर ६६ शुकेश्वर ६७ गौतमेश्वर ६८ मुक्तिमंडप ६९ समस्तऋषीश्वर ७० नंदीश्वर ७१ पशुपतीश्वर ७२ मोक्षलक्ष्मी ७३ भैरव ७४ श्रीत्र्यंबकेश्वरांचें दर्शन व पूजन करून प्रार्थना.

### श्लोक

प्रणम्य त्र्यंबकं दृष्ट्वा भक्त्यार्पितमनोंबुजः ॥
विधिवद्व्रत मारभ्य भैरवं प्रणमेत्ततः ॥ १ ॥
यथेयं विहिता यात्रा नित्यपूजार्थ मीश ते ॥
जानता जानता वापि प्रसीद त्र्यंबक प्रभो ॥ २ ॥

अशा प्रकारें नित्ययात्राविधी करून त्याची पूर्णता करावी. पुढें मुक्तिमंडपांत सिद्ध ब्राह्मण, लक्ष्मीपती, गुरू या सर्वांस नमस्कार करावेत. नंतर तेथेंच पवित्र आसनावर बसून शुद्ध मनानें भगवत्ध्यान, रुद्राध्यायपाठ, षडक्षरजप, अघोरमंत्रजप, त्र्यंबकमहामंत्रजप, व आणखी सिद्ध मंत्र असतील त्यांचा जप करून पुढें आपले घरीं जावें. अशा प्रकारें नित्ययात्राविधी रघुनाथराव यांनीं करून ते दिवशीं यात्रेचे पूर्णते करितां ब्राह्मणसुवासिनींस उत्तम भोजन दिलें.

### ब्रह्मगिरिप्रदक्षिणा.

यात्रस्थांस व क्षेत्रस्थांस ही जशी नित्ययात्रा अवश्य आहे त्यापेक्षां ही विशेषपुण्यप्रद अशी ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा होय. असें स्कंद पुराणांतील सह्याद्रि खंडापर्यंत त्र्यंबकक्षेत्रमाहात्म्यांत स्पष्टपणें निदर्शन आहे. या प्रमाणेंच पद्मपुराणाची ही संमती आहे. पण उभय पुराणांच्या माहात्म्यांची एक संमती करण्यांत स्थलविशेषीं किंचित् अंतर भासतें. त्याची एकवाक्यता करून हा प्रदक्षिणाविधी लिहिण्याचें मानस होतें. परंतु तशी फुरसत सांप्रत नसल्यामुळें तो विचार कालांतरावर ठेवून केवळ स्कंदपुराणांतील क्षेत्रमाहात्म्याचे आधारा वरून हा प्रदक्षिणाविधी लिहिण्याचा उपक्रम केला आहे.

हा विधी ७, ५, ३, अथवा १ दिवसाचा आहे. त्यांत पांच दिवसांचा क्रम ठेविला ह्मणजे ठिकठिकाणीं तीर्थस्नान, पितृतर्पण, तत्तीर्थप्रयुक्त श्राद्ध, दानें वगैरे करून स्वस्थतेनें जाणें व मुक्काम ही वेतावेतानेंच होतात. परंतु पुष्कळ दिवसांपासोन हा प्रचार मोडला गेला. याचें कारण हेंच आहे कीं, मार्गांत मुक्काम करण्या जोगीं गांवें नसोन मुख्य मार्गाचे आजूबाजूस कोळी लोकांची डोंगरी

वस्ती प्रमाणें क्षुल्लक झोंपड्या आहेत. बांधीव कौलारू अशा जागा उतरण्यास कोठें नाहींत. तेव्हां शिधा सरंजाम मिळण्याची आशा कोणी ठेवावी ! अशा ठिकाणीं चोर व घातुक जीवांची धास्ती उघडच आहे अशा प्रकारच्या पुष्कळ अडचणी आहेत.

भाग्यशाली पुरुषांस प्राचीन पुण्योत्कर्षानें पूर्तादि ( विहिरी, बारवा, तलाव, धर्मशाळा इत्यादि ) धर्मकृत्यें करण्याची बुद्धी होईल तर त्यांनीं या प्रदक्षिणेच्या पांच मुकामीं पक्क्या बांधीव खपरेली अशा धर्मशाळा व ज्या मुक्कामीं उष्ण काळांत पाणी दुर्मिळ असेल तेथें विहिरी अगर कूप असे अवश्य करवावेत. अशीं धर्मकृत्यें करणाऱ्या पुण्यवान् पुरुषांस इहलोकीं सत्कीर्तीचा लाभ होईल येव्हढेंच नाहीं, तर परलोकीं अगाध सुखप्राप्ती होईल. असा धर्मशास्त्राचा सिद्धांत आहे. अस्तु.

आतां एक दिवसाचा प्रदक्षिणाक्रम चालू आहे. त्यांत तीर्थसंबंधी धर्मकृत्य ( श्राद्धदानादि ) हें बिलकुल घडत नसोन मार्गपरिश्रमानें देवतादर्शन सुद्धां सद्भावानें घ्यावें अशी उमेद राहत नाहीं. पण ( अकरणान्मंदकरणं श्रेयः ) ह्या शास्त्रीय ह्मणी प्रमाणें कांहीं तरी सुकृतांशप्राप्ति निश्चयानें आहे. ह्मणनच कित्येक नित्यप्रदक्षिणा करणारे व कित्येक तिथीपर्वणीस प्रदक्षिणा करणारे असे बहुत तपस्वी त्र्यंबकास आहत. बहु कालापासून पेशवे सरकारची ब्रह्मगिरीस नित्यप्रदक्षिणा चालू आहे. याप्रमाणें धनवान् अशा कितीएक लोकांकडून नवसाच्या वगैरे संबंधानें प्रदक्षिणा प्रत्यहीं सुरू आहेत. यात्रेकरी लोकही कोणी एक, कोणी अकरा, कोणी एकशें एकवीस अशा प्रदक्षिणा करितात पण सर्वांचा संप्रदाय एक दिवसाचाच प्रवृत्त आहे.

प्रत्यहीं पुराणश्रवणाचे क्रमांत रघुनाथराव यांनीं त्र्यंबकक्षेत्र माहात्म्याचे ग्रंथ श्रवण केल्या वेळेपासोन आपण पांच दिवसांचा क्रम विधिपूर्वक करावा, असें जरी त्यांचे मनांत घोटाळत होतें तरी चातुर्मास्य क्षेत्रवासाचा नियम असल्यामुळें तो प्रसंग कार्तिक वद्य पक्षीं बनून येईल असें त्यांनीं पूर्वींच कल्पिलें होतें. मग

कार्तिक मास प्राप्त झाला असतां पर्जन्यकाला वरून शीतकालाचें अनुमान करितां सालमजकुरीं शीतकालाचा बढाव होणार. प्रदक्षिणेस बरोबर मंडळीचा समुदाय अधिकच वाढणार या मुळें त्या रस्त्यांत मुक्कामाचे ठिकठिकाणीं निर्वात जागेचा मेळ चांगला लागून रसत बरदास्तीची वेळेवर अडचण पडेल असें त्यांस वाटून त्यांनीं त्या कामीं सुगर अशीं एक दोन मनुष्यें दिपवाळी होतांच अगाऊ पाठवून तपास करविला.

नंतर विंचूर संस्थानांतून जुजबी फरासखान्याचें सामान आणवून प्रदक्षिणेच्या मार्गांतील मुक्कामांचे गांवोगांवीं, स्नान संध्या, स्वयंपाक व भोजनाची जागा इतक्यापुरते मजबूद निवाऱ्याचे मंडप घालवून बिछायतीस व अरामीस आणि स्वतःच्या व मंडळीच्या निद्रेस वेगळालीं अशीं पटगृहें (डेरे राहुट्या इत्यादि ) योजिले होते. खुराकी व अरामीचें सामान नेणें आणण्यास गाडीमार्ग नसल्यामुळें हमाललोकांची तजवीज लावून ठेविली होती.

कार्तीक वद्य ३ शनिवारीं रघुनाथराव हे यात्रा करून घरीं आल्यावर तेच दिवशीं रात्रीं असा नियम झाला कीं उद्यां वद्य ४ रविवारीं ब्रह्मागिरिचे प्रदक्षिणेस निघावें. त्याप्रमाणें पुढें जाणारे वाकनीस कोठवळे वगैरे आपापल्या तयारीनिशीं निघोन प्रयागतीर्थावर चालते झाले.

या प्रदक्षिणेंत बरोबर पुष्कळ मंडळीचा समाज होता. पदरचे भिक्षुक, शास्त्री, पुराणीक. शिवाय कारखान्यांतील षागिर्द पेषाची मंडळी. गांवांतील नारायणराव तात्या जोगळेकर वगैरे प्रतिष्ठित गृहस्थ, पुरोहित मंडळी, यात्राविधिप्रदर्शक असे विद्वान ब्राह्मण तीर्थश्राद्धभोजी व दानप्रतिग्रह करणारे असे कित्येक ब्राह्मण; शिवाय हमाल लोक वगैरे मंडळीसह रघुनाथराव हे ब्रह्मागिरीप्रदाक्षिणेस जाण्याच्या तजविजीस लागले.

या प्रदक्षिणाविधींत साधारण सर्वांस असा नियम लागू आहे कीं, जेथें जेथें तीर्थ प्राप्त होईल तेथें स्नान व पितृतर्पण,व जेथें देवस्थान तेथें दर्शन, प्रदक्षिणा, नमस्कार ह्या गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत. ज्या तीर्थीं पितरोद्देशें श्राद्ध व पिंडदान अवश्य केलं पा-

हिजे, तेथें त्या तीर्थाच्या नांवा पुढें तें करण्याचें लिहिलें आहे. ज्या देवाचें विशेषोपचारें पूजन आहे तेथें त्या नांवापुढें तसें लिहिलें आहे. ज्या तीर्थाची किंवा देवतेची प्रार्थना आहे, ती त्या तीर्थाचे व देवतेच्या नांवा जवळ लिहिली आहे. हे नियम ध्यानांत ठेवून प्रदक्षिणेचे आरंभींच तीर्थ आणि देवता यांस लक्षून जसें जसें विधींत संकल्प लिहिले गेले आहेत त्याप्रमाणें करावें. मार्गांत लघुशंकेस किंवा शौचास वाटेल तर तो योग डावे बाजूस करावा. लघुशंका झाल्यावर हस्तपादप्रक्षालन व शौचविधी झाल्यावर स्नान असा नियम ठेविला पाहिजे.

रघुनाथराव हे कार्तिक वद्य ४ रविवारीं नित्यक्रमाप्रमाणें पहाटेस शुचिर्भूत होऊन कुशावर्ततीर्थावर प्राप्त झाले. तेथें स्नान संध्यादि नित्यविधी करून त्यांनीं प्रथमतः प्रदाक्षिणेचा संकल्प केला व तो निर्विघ्नपणें पूर्णतेस जाण्यास्तव विघ्नहर गणपतीचें पूजन करून आरंभीं श्रीत्र्यंबकेश्वराची प्रार्थना केली.

**प्रार्थनाश्लोक.**

एतत्प्रदक्षिणं कुर्वन् क्षेत्रं तव महेश्वर ॥
धर्मार्थकामसंसिध्यै शक्तिं देहि प्रसीद मे ॥
देहेंद्रियमनः प्राणः चेतनोखिलजीवनः ॥
भगवन् प्रेरय त्वं मां यन्मे सर्वं करोमि तत् ॥

नंतर मौनव्रत धारण करून कुशावर्ततीर्थास मोठे कोठा बाहेरून सात प्रदक्षणा केल्यावर प्रवाहिनीगंगेचे उत्तर तीरानें रस्त्यांतील देवतेस प्रदक्षणा व नमस्कार करून वर लिहिलेल्या मंडळीच्या समाजासह श्रीत्र्यंबकेश्वर देवाचे मंदिरांत येऊन त्यांनी एक प्रदाक्षिणा केल्यावर नंदिकेश्वरादि देवतांची नाममंत्रानें पूजा केली. नंतर मुख्य देवाचे गर्भगृहांत गेले. येथून जो साधारण प्रदाक्षिणाविधी तोच रघुनाथराव यांनीं मंडळीसह केला.

प्रदाक्षिणेचा साधारण विधी—

प्रथमतः श्रीत्र्यंबकेश्वर देवाची पूजा करून देवालयास सात प्रदक्षिणा केल्यावर पूर्वाभिमुख होत्सातां विष्णवेनमः, देवर्षि

---

१ उजवे हाताकडेस देवता कल्पिली आहे यामुळें.

भ्योनमः अशा नाममंत्रांनीं ह्या दोन देवतांस नमस्कार करून पूर्व द्वारानें बाहेर निघावें. व तेथें क्षेत्रपाल भैरवाचें स्मरण करून नमस्कार करावा. नंतर महाद्वारान डावे बाजूस विष्णूमंदीर आहे तेथें पूजा करून क्रमानें हनुमंताचें मंदिरीं यावें. तेथें त्याची पूजा केल्यावर प्रार्थना करावी.

### प्रार्थना श्लोक.

पराक्रमसमाक्रांतदिङमंडल महाबल ॥
यशोधौतत्रिभुवन गोष्पदीकृतवारिधे ॥ १ ॥
लंकाविदहनो ग्रास्य ध्वस्तराक्षसकानन ॥
लंकेशवंशतिमिरग्रस्तब्रम्हांडभास्कर ॥ २ ॥
रामोपकारक श्रीमन् सीताश्वासनपंडित ॥
अंजनागर्भसंभूत रुद्र रौद्रवपुर्धर ॥ ३ ॥
लक्ष्मणप्राणद प्राणनाथानाथैकपालक ॥
वीर मां पाहि देवेश हनुमन् कपिनायक ॥
त्वं प्राणदोऽसि बलद प्राणः प्राणभृतामसि ॥
पुण्यं देहि बलं कीर्तिं कामान् देहि हराशुभं ॥ ५ ॥

अशा प्रकारें हनुमंताची प्रार्थना व एक प्रदक्षिणा करून ब्रह्मगिरिप्रदक्षिणेची आज्ञा घ्यावी. नंतर हळुहळु भगवन्नामसंकीर्तनपुरःसर प्रयागतीर्थावर जावें. तेथें स्नान व वेणीमाधव देवाची पूजा करावी. तेथंच अक्षय्य वट या नामानें वटवृक्ष आहे त्या वृक्षाची पूजा व प्रदक्षिणा आणि नमस्कार करून विधीप्रमाणें तीर्थश्राद्ध करावें. येथें सोनें, गायी, वस्त्र, अशीं दानें ब्राह्मणांस द्यावींत. नंतर श्राद्धशेष अन्नानें स्वतः भोजन करून त्या तीर्थवैभवाची कथा श्रवण करावी. सायंकाळीं संध्यावंदन करून पुराणश्रवणानें, भगवन्नामोच्चारानें, गीतमंगलवाद्यादि घोषानें तीं सर्व रात्र तेथेंच काढावी. दुसरे दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें पहाटेस उठून त्याच तीर्थीं स्नानसंध्या करावी. नंतर वेणिमाधवास नमस्कार करून त्यांची आज्ञा घ्यावी. मग पूर्व दिवसाच्या क्रमाप्रमाणें नियमपूर्वक मार्गक्रमण करावें. मार्गानें रामतीर्थीं प्राप्त झाल्यावर स्नान, माध्यान्ह संध्या, ब्रम्हयज्ञ, पितृतर्पण, परिवार देव-

तेसह श्रीरामचंद्राचें योग्य पूजन, सपिंडश्राद्ध, श्रीरामकथा श्रवण वगैरे सर्व पूर्वदिवसाचे विधी प्रमाणें करून ती रात्र तेथेंच अतिक्रमिली पाहिजे. अनृत भाषण, अमंगलाचरण, इतरांच्या निंदा वगैरे करण्याचा नियम चांगले प्रकारें सर्व तीर्थीं ठेविले पाहिजेत. त्यांत रामतीर्थीं तर विशेषतः ते नियम राखिले पाहिजेत.

तिसरे दिवशीं पहाटेस उठून रामतीर्थीं स्नान, संध्या, रामपूजा, त्यांजपासून आज्ञाग्रहण इत्यादि विधि पूर्वदिवसांप्रमाणें करून प्रदक्षिणेस लागावें. मार्गांत विमलतीर्थ आहे तेथें स्नान, पितृतर्पण करून क्षणभर श्रीत्र्यंबकेश्वर देवाचें हृदयांत ध्यान करावें. नंतर शिव, विष्णु, अग्नि, चंद्र, सूर्य, शक्ति, गणेश, इश, त्रिपुरारि, ईश्वर, अघोर, नरसिंह, मृत्युंजय, सरस्वती, दुर्गा, श्रीराम, गोपाल, इत्यादि नाममंत्र हे सर्व चतुर्थ्यंत व सप्रणव आणि नमोंत असे उच्चारावेत. तसें होणें अशक्य असेल तर शिव, शंकर, त्र्यंबकेश्वर हरि, विष्णु, नारायण, इत्यादि शिव विष्णूंच्या नामघोषानें किंचित् वेळ तेथें काढावा. नंतर विमलतीर्थास नमस्कार करून वैतरणी तीर्थावर यावें. येथें पितरोद्देशानें तर्पण, सपिंडश्राद्ध, ब्राह्मणभोजन, व गाई, भूमी, तीळ, सोनें, वस्त्र, अश्व, गज, महिषी, दासी, अशीं दानें यथाशक्ति द्यावींत. नंतर ब्राह्मणभोजनाचे शेषान्नानें भोजन झाल्यावर गौतमऋषीचे सन्निध मुक्काम व्हावयास पाहिजे असा यात्राक्रम आहे. परंतु गौतमाचे सन्निधानीं उदक वगैरेची सोय नसल्यामुळें वैतरणीचे पश्चिमतीरीं मुक्काम करावा. गौतमाश्रमाचे सीमेवरच वैतरणी आहे. सबब रघुनाथराव यांनीं तेथेंच ती रात्र काढली. येथून चौथा मुक्काम बिल्वतीर्थावर येतो. यांत गौतमखिंड चढून तेथें ऋषिपूजन, त्याप्रमाणें मार्गांतील तीर्थांचीं स्नानें, पितृतर्पण इत्यादि विधी होऊन बिल्वतीर्थीं जावें. व तेथें श्राद्धादि नियम पाळावेत. हें सर्व कृत्य घडण्यास बहुत परिश्रम होतात याकरितां मध्यें पद्मतीर्थ आहे तेथें मुकाम केल्यास बाध नाहीं. कारण काशींतील पंचक्रोशीयात्रेचे नियमांत अशक्त मनुष्यें मध्येही मुक्काम करितात. या मर्यादेस अनुसरून रघुनाथराव यांनीं पद्मतीर्थीं मुक्काम केला. आतां वैतरणीपासोन

पद्मतीर्थी येण्याचा विधी चौथे दिवशीं पहाटेस पूर्वी प्रमाणें वैतरणी वर स्नान संध्या करावी. मग शिवस्मरण पूर्वक निवोन गौतमांचें दर्शन व पूजन झाल्यावर पाश्चिमवाहिनी नीलगंगा प्राप्त होतांच तेथें स्नान, तर्पण करून शिवगण आणि भैरव यांस नमस्कार करावे त्या देवता—

महेश्वर, महाकाल, वीरभद्र, गणेश्वर, चांडिकादेवी, चंडीश्वर, शृंगीरिटी, स्कंद, नंदी, घंटाकर्ण, महाबाहू, भद्रकेतू, वृकानन, पिंगाक्ष, सिंहपाद, महाकाल, असे गण व भैरव या सर्वांचे नाममंत्र चतुर्थ्यंत सप्रणव व नमोंत म्हणून नमस्कार करावे व पुढें सीमेचे गणपतीसंनिध जावून त्याची पूजा करावी. तेथून बिल्वतीर्थावर जाऊन तीर्थास व विश्वेश्वर आणि बिल्वकेश्वर यांस नमस्कार करावे. तेथें स्नान व पितृतर्पण, सपिंडश्राद्ध, ब्राह्मणभोजन, यथा शक्ति दानें करावीं. दीन, अंध, पंगु, कृपण, शूद्रादि या सर्वांस श्राद्धसंबंधी अन्नावेगळ इतर अन्नानें तृप्त करावें. पूर्वी सांगितलेल्या नियमाप्रमाणें येथें ही रात्र भगवच्चिंतनानें व आत्मानात्म विचारानें जागर पूर्वक घालावी. पांचवे दिवशीं बिल्वतीर्थां स्नान, विश्वेश्वराचें वंदन, व बिल्वेश्वराचा निरोप घेऊन नील पर्वतावरील नीलांबिका देवीची पूजा करून तीस नमस्कार करावा. तेथून मुकुंदतीर्थावर स्नान व मुकुंदेश्वराची पूजा करून हनुमंताचे निकट प्राप्त होऊन त्यास प्रदक्षिणा निवेदन करावी.

श्लोक.

यात्रेयं विहिता देव तव शक्त्या मया विभो ॥
त्वं सर्वकर्मणां साक्षी प्राणनाथ नमोस्तु ते ॥ १ ॥

नंतर त्र्यंबकेश्वराच्या देवळाचे पूर्वद्वारानें आंत जाऊन श्रीत्र्यंबकेश्वराची पूजा करावी. व त्यास प्रदक्षिणा निवेदन करावी.

श्लोक.

प्रदक्षिणा मया देव विहिता तव तुष्टये ॥
प्रीतोद्य भव मे कामान् पूरयाशु वरप्रद ॥ १ ॥

नंतर देवालयाचे पश्चिमद्वारानें निघून कुशावर्ततीर्थास प्रदक्षिणा करावी. तेथें प्रथमतः मार्जन, नंतर स्नान, पितृतर्पण व तेथील सर्व देवतेस नमस्कार इत्यादि करून घरीं आल्यावर कुशावर्ततीर्थप्रयुक्त सपिंड श्राद्ध करावें. ते दिवशीं किंवा दुसरे दिवशीं शक्तितारतम्यानें ब्राह्मणसुवासिनींस उत्तमान्नानें भोजन इत्यादि सर्व गोष्टी संपादून आप्त, इष्ट, मित्र, बांधव यांसह स्वतः मौनव्रतानें भोजन करावें.

इति ब्रह्मगिरि प्रदक्षिणा विधिः ॥

सदरीं लिहिलेला प्रदक्षिणाविधि त्र्यंबकमाहात्म्यांत आढळला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हा विधि रघुनाथराव यांनीं भक्तिपूर्वक सानंदपणें फार उत्तम केला.

पुढें कार्तिक वद्य एकादशी रविवारीं रघुनाथराव यानी ब्राह्मणद्वारा त्र्यंबकेश्वरादि क्षेत्रांतील देवांस रुद्राभिषेक व स्वतः मुख्य देवतेची विशेषोपचारानें व नानाविध धान्यानें उत्तम पूजा केली.

कार्तिक वद्य १२ द्वादशी इंदुवार रोजीं त्र्यंबकक्षेत्रवासाची पूर्णता लक्षून उत्तमान्नानें ब्राह्मण सुवासिनींची समाराधना केली. या दिवशीं पेशवे सरकारचे कोठींतील आश्रित, भिक्षुक, गृहस्थ शेवेकरी ब्राह्मण, षागिर्दपेषाचे लोक, शिबंदीकडील वगैरे सर्व मनुष्यांस रघुनाथराव यानीं भोजन देऊन, प्रदोषकालीं त्र्यंबकेश्वराचें दर्शन व निरोपघेऊन सर्व क्षेत्रस्थ ब्राम्हणमंडळी निरोप देण्यास आली असतां संतोषानें त्यांचे निरोप व आशीर्वाद गृहण करून रात्रीं नऊवाजतां संस्थान विंचूर येथें जाण्याकरितां निघाले. त्याच रात्रीं निजामसरकारची स्वारी कलकत्त्यास होणारें प्रदर्शन पाहण्याकरितां मनमाड स्टेशनावर मुक्कामास येणार व "त्यांस मी विंचुर संस्थानची जाफत स्वीकारण्याची विनंती केली आहे" वगैरे मजकूरचें पत्र रावसाहेब विंचूरकर यांचे आल्यामुळें नाशकास न जातां त्वरेनें देवळाली स्टेशनावरून संस्थानविंचूर येथें सानंदपणें परिवार मंडळींसह रघुनाथराव हे दाखल झाले. येणेंकरून पदरची व विंचूर इलाख्यां

तील प्रजा संतुष्ट होऊन ज्यांस जसा वेळ सांपडला त्यावेळीं त्यानीं रघुनाथराव यांची भेट घेऊन आपलीं सुखदुःखांची वृत्तें कळविलीं. या कृत्यांत पांच चार दिवस कालक्रम झाला.

## विंचूर इलाख्यांतील मनमाड गांवीं निजाम सरकारची स्वारी येण्याचें वृत्त.

रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधु कैलासवासी कृष्णराव विठ्ठल यांचे चिरंजीव नरसिंहराव हे दाहा बारा वर्षांपासोन निजाम सरकारचे रियासतींत दुय्यम तालूकदारीचे कामावर असोन हल्लीं ते मोठया सरतालूकदारीच्या हुद्यावर आहेत.

हिंदुस्थानची मुख्य राजधानी शहर कलकत्ता येथें राणी साहेबांचे प्रतिनिधी[२] ( गवरनर जनरल ) यांनीं राष्ट्राचें प्रदर्शन करण्याचा ठराव करून हिंदुस्थानांतील व युरोपांतील उत्कृष्ट पदार्थ एकत्र मिळविण्याच्या कमेट्या ठिकठिकाणीं नेमून सर्व पदार्थ एकत्र जमविले. तो अपूर्व चमत्कार पहाण्याकरितां बहुतेक हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, नव्वाब, अमीरउमराव रहीस, साहुकार,व्यापारी वगैरे सहस्रावधी लोक असेच युरोपांतीलही बहुत सभ्यगृहस्थ स्त्रियांसहवर्तमान तें प्रदर्शन पहाण्यास आले होते.

त्यांत दक्षिण हिंदुस्थानांतील हैदराबादचे निजाम सरकार हे तरुण वयाचे असून इंग्रजी वगैरे विद्येंत निपुण आहेत, त्यांस सदरहु प्रदर्शन पहावें अशी इच्छा झाल्यावरून हुजुरची स्वारी कलकत्यास जाण्याचा नियम ठरला. त्यासफरेंत ठिकठिकाणीं अरामीच्या तजविजीचे विचार सुरूझाले.त्याप्रसंगीं नरसिंहराव हे तेथें(हैद्राबादेस)असल्यामुळें रेलवेचे मार्गांत हवेनें, व पाण्यानें फार उत्तम असें विंचूर इलाख्यांतील मनमाड हें गांव स्वारीचा मुकाम होण्यास योग्य आहे असें कळवून हुजुरांस व पेष्कार वगैरे अमीर उमराव मंडळीस मनमाड येथें मुकाम होण्याची व विंचूरकर यांजकडील जाफत

---

१ यांसच रावसाहेब असें म्हणतात. २ प्रधान.

स्वीकारण्याची विचरचे चीफ( रघुनाथ राव ) यांचेवतीनें नरसिंह-राव यानीं विनंती केली; ती मान्य होऊन मनमाड येथील मुक्कामाच्या जागेची योग्य तजवीज ठेवण्याचे कामीं हुजुराकडून नरसिंहराव सरतालूकदारांचीच योजना झाली.

नरसिंहराव हे तारीख ७ माहे दिजंबर सन १८८१ इसवी रोजीं विंचुरास येऊन त्यानीं आपले वडील चुलते रघुनाथराव यांस हैद्राबाद मुक्कामीं जालेली सर्व हकीकत कळविली. त्यावर निजाम सरकाराची व त्यांच्या मंडळींची रसदबरदाष व जाफत वगैरेची तजवीज फार उत्तम प्रकारें तुह्मीं ठेविली पाहिजे; याकामांत निजामांकडून जशी तुमची योजना झाली तशीच इकडून ही त्यांची ( निजामांची ) तजवीज ठेवण्याचें काम तुम्हावर सोंपविलें आहे. तर याकामीं विंचूर संस्थानांतून जी मदत लागेल ती तुह्मी बरोबर घेऊन अगाऊ मनमाडेस जावें व तेथील सर्व व्यवस्था करावी; ही वडिलांचीआज्ञा मान्यकरून सर्व तयारीनिशीं नरसिंहराव हे मनमाडेस चालते झाले.

मनमाड मुक्कामीं दौंडरेल्वेचे दक्षिण बाजूस सोयकर अशी उतरण्याची जागा योजून तेथें मध्यभागीं हुजुरांचा खासडेरा व त्याचे पुढें दरबार होण्याची चौरस जागा त्यानीं ( नरसिंह-रावानीं ) रेखली. मग अमीर, उमराव,पेष्कार दप्तरदार वगैरेचे डेरे मिसली प्रमाणें लाविले. एकंदर ती सर्व जागा रमणीय करून ठिकाठिकाणीं पुष्पभरित वृक्षांचे दाट कुंडे, प्याले इत्यादि योजिल्यामुळे हा नवीन बगीचाच बनला आहे कींकाय असें पाहणारास भासूंलागलें. प्रत्येक डेऱ्याकडे जाण्यास वेगळाल्या सडका व सडकेच्या दुतर्फा पुष्पवल्ली तसेंच दोही बाजूस सोज्वल, वं दाट अशा कंदिलाच्या चिराकदानाची उत्तम रौषनाई करविली होती.

सदरहू जागेनजीक रेलरुळाजवळ नवीन प्लाटफार्म ( रेल गाडींतून उतरण्याची जागा )करवून त्याजवर सुंदर कमान व तिजवर निझाम सरकारचें महत्वसूचक अशीं फारशी व इंग्रजी अक्षरें सोनेरी शाईनें तयार करविलीं होतीं. प्लाटफार्मापासून डेऱ्यापर्यंत

चादरी व त्यावर मृदुसकलादी घातल्या होत्या. जागोजाग निषाणें व झेंडे, फरारे पुष्कळ लाविले होते. अशी योग्य तयारी नरसिंहराव यांनीं केल्यावर तारिख १६ रविवार रोजीं आगगाडी मार्गें विंचूरचे चीफ रघुनाथराव यांचें मनमाडेस येणें झालें.

राणी सरकाराकडून ही पोलिस सुप्रिंटेंडेंट व आशिष्टन्‌कलेक्टर, निफाड, चांदवड, येवलें, येथील मामलेदार व पोलिस लोक वगैरे बंदोबस्तास आले होते.

हा समारंभ पहाण्यासाठीं चांदोरीकर जाहगिरदार व नाशीक, येवलें, येथील सभ्य गृहस्थ व शेटसाहुकार शिवाय आसमंतांत् गांवचेही बहुत लोक जमले होते.

तारिख १८ रोजीं चारवाजतां स्पेशल गाडींतून निजाम सरकारची स्वारी प्लाट्‌फार्मावर आली. तेव्हां रघुनाथराव हे जुजबी मंडळीनिशीं पुढें होऊन रेल गाडींतूनच हुजुरांची व त्यांची प्रथम सलामी झाली. नंतर स्वारी रेलगाडींतून उतरली तेव्हां सन्माननीय असा परस्परांचा हस्तस्पर्श झाला. या समयीं विंचूर संस्थानचे वगैरे पोलिस लोकांची सलामी झाली. अशा स्थितीनें दरबारचे जागीं सुंदर व किंचित् उंच अशा सिंहासनावर निजामास बसविलें. मागून एकामागें एक अमीर उमराव लोकांच्या सवाऱ्या शिलशिल्याच्या वहिवाटी प्रमाणें आल्या. त्यांचे खिताब व नांवनिशीं थोडक्यांत लिहितों.

१ नव्वाबखुरषीद जाहा बाहादर, अमीरो कबीर, समशेर बाहादर, हे उभयतां चिरंजिवासह आले. हे समशेर बाहादर उमराव यांचे वंशांतील होत.

१ नव्वाबयकबाल उद्दौला बाहादर समशेर उमराव.

१ मीरलायख अलीखान मुनीरुद्दौला सालारजंग बाहादर जुनीयर आडमिनिष्ट्रेटर हे सरसालार्जंग यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत.

१ मीरसादत् अलीखान गयूरजंग बाहादर हे सरसलार्जंग यांचे कनिष्ठ चिरंजीव होत.

१ राजा राजा यान राजा नारायण प्रसाद नरेंद्र बाहादर

सिनीयर आडमिनिष्ट्रेटर हे पेष्कार होत. हे चंदूलाल यांचे नातू असोन हल्लीं हेच मुख्य दिवाण आहेत.

१ राजा मुरलीमनोहर बाहादर हे दप्तरदार होत.

१ क्याप्टन् क्लार्क प्रिनसिपल् टच्यूटर हे साशाचे मुख्यत्वें इंग्रजी विद्येचे शिक्षक होत.

१ मेजर डाबस् पोलिटिकल् आफिसर सदरी लिहिलेली मंडळी व याशिवाय कित्येक संभावित मानकरी लोक प्राप्त झाले असतां प्रथमतः सलामी व मागून परस्परांचे हस्तस्पर्श होऊन दरबारव्यवस्थापकांचे अनुमतें मिसली प्रमाणें कोणांस कोचांवर व कोणांस खुर्च्यांवर बसाविलें.

नंतर मुख्य मालक ( नवाब महबूबउद्दौला मीरमहबूब अलीखान बाहादूर निजाम उल् मुलूक असफ् जाहा ) यांस रघुनाथ राव यांनीं नजर पांच मोहरा व सत्का ( ओवाळणी ) करून निजामांच्या अगमनाचें प्रीति दर्शक व त्यांच्या वंशाचे महत्वसूचक वगैरे योग्य मजकुराचे असोन इंग्लिश लीपींत सोन्याच्या अक्षरांनीं तयार केलेलें असें मानपत्र नरसिंहराव विंचूरकर यांजकडून वाचवून उत्कृष्ट लिफाफ्यांनिशी भरगच्चीचे थैल्यांत घालून विंचूरचे चीफ यांनीं निजामसाहेब यांचे हातांत दिलें. तें त्यांनीं मोठ्या सन्मानानें प्रीतिपूर्वक स्वीकारिलें.

त्या मानपत्राचा तरजुमा.

बंदिगान अली नव्वाब मुस्तता बमौला अलकाब हजरत नव्वाब महबूब अलिखान असबना बाहादुर बादषाहे दखनदाम एकबालहू.

जनाबे अलि.

ही एक मान्य करण्या जोगी गोष्ट आहे की, आर्य लोकांचे (हिंदूलोकांचे) मुरकाविलायतेंत आमेहरबानांचे मानिंद आलीषान व उमदादर्जाचे कोणी ही नेटिव राज्याधिकारी फीलहाल विराजित नाहींत. असें असतां किब्ले अलम यांनीं या माझ्या गरीब खेड्यांत आगमन करून माझी ज्याफत स्वीकारण्याची मेहरबानगी करण्यांत

१ रंगी बेरंगी नळकांडे.

र्से खुश्क ( सौजन्य ) दर्शित केलें आहे तेणेंकरून माझा इतका मोठा मान झाला आहे कीं, त्याबद्दल आपली कृतज्ञता दर्शित करितां येईल अशा अर्थाचे शद्ब मजपाशीं नाहींत. आणखी त्यांचे बदला देण्यासारिखी मजपाशीं ऐपतहीं नाहीं. तथापि ज्याहां पन्हा यांस दीर्घायुष्य, पूर्ण आरोग्य, अक्षय्य ऐश्वर्य, अचुकयश, निरंतरचा संतोष, याप्रमाणें बक्षीस करण्याविषयीं मी सदोदीत त्या सर्व शक्तिमान विश्वनाथाची प्रार्थना करीत राहीन.

मोठ्या अदबीनें
मी आहें,

आमेहरबानाचा बिशीयार फरोतनव हुकुमबंदा
ताबेदार.

रघुनाथराव विठ्ठल विंचूरकर राजे उमदे तुल्मुलक
बाहादूर, कंप्यनियन ऑफ इन्डिया.

हें मानपत्र स्वीकारिल्या नंतर पेष्कार साहेब यांनीं सर्वांस श्रुत होण्यासारिखें त्याचें ( मानपत्राचें ) उत्तर दिलें तें:—

विंचूरचे चीफ यांनीं दिलेलें मानपत्र निजाम साहेब यांनीं मोठ्या संतोषानें स्वीकारून असें कळवितात कीं, या ठिकाणीं ( मनमाडेस ) सर्व प्रकारें अरामीच्या तजविजा आपले कडून राहिल्या व याकामीं आपण बरेच परिश्रम घेतले येणेंकरून आम्ही फार संतोषित आहोंत.

असें पेष्कार साहेब यांचें संभाषण झाल्यावर सर्व मंडळी पूर्ववत् आपापले ठिकाणीं बसली. रघुनाथराव हे निझाम सरकारचे निकट खुर्चीवर व त्यांचे पाठीमागें बरोबरची सभ्यमंडळी अशी ज्यांस जशी जागा मिळाली तसे ते बसले.

या पुढें थोडावेळ निझाम व विंचूरचे चीफ यांत आगत स्वागतांची योग्य भाषणें होऊन परस्परांनीं प्रीतिपूर्वक आभार मानिले.

नंतर निझाम साहेबांची स्वारी उठून खास अरामीचे डेऱ्यांत गेली. पुढें त्या सभेंतच सदरीं लिहिलेल्या अमीर, उमराव, पेष्कार, वगैरे सर्व मंडळींच्या व रघुनाथराव यांच्या थोड्या स्वस्थ-

तेंनें भेटी होऊन परस्पर प्रीतिपूर्वक व आभारसूचक अशा गोष्टी बऱ्याच झाल्या मग नरसिंहराव यांनीं प्रत्येकास आपापल्या डेऱ्यांत पोंहोचाविलें.

या पुढें सहा वाजतां परिवार मंडळींसह निझामांची स्वारी पुनः दरबारचे जागीं आली असतां कांहीं वेळ कसरती लोकांचा तमाशा पाहून खुष झाली. त्या लोकांनीं दोन तीन पकडी बहूत सुरेख व अचुक अशा दाखविल्यामुळें त्यांस हुजुरांकडून तीनशें रुपये बक्षीस देण्यांत आले. हे सर्व लोक विचूरचे असून त्या कामीं फार हुशार आहेत. नंतर कांहींवेळ कंचनी लोकांचीं सुस्वर गाणीं व मधुर वाद्यांचें ध्वनी श्रवणांत गेले असतां अतषबाजीचें (दारू उडविण्याचें) काम सुरू झालें. तें पहाण्यासाठीं निझाम साहेब सर्व मंडळीसह प्लाटफार्मावर आले. या वेळेस विचूरचे चीफ यांस स्वतः निजामानीं आपले जवळ बोलावून परस्परांत प्रेम-भावाची पुष्कळ बोलाचाल झाली. त्यांतील सारांशः—

विचूरकराच्या खानदानींची मला सर्व माहिती जाली आहे. तुमच्या पूर्वजांनीं आपले मालीक पेशवे यां करितां मोठ्या जवाम-र्दीचींकामें करून कीर्तीं संपादन केली. व त्यांचे (पेशव्यांचे) तर्फे बादशाह अलमगीरसांनीं यांस उत्कृष्ट साह्य देऊन त्यां पासोन उमदा किताब संपादन केला. तुह्मी ही कालानुरूप इंग्रज सर-कारासीं योग्य राज्यनिष्ठेनें वर्तत आहां. या मुळें राणीसाहेबानीं उंच्यादरज्याचें चिन्ह (पदक) तुह्मांस दिलें. अशीं थोर आणि शूर घराणी उदाहरणास फार थोडीं आढळतील.

नंतर नरसिंहरावास लक्षून हे तुमचे कोण होत ? अणखी तुमचे वंशांतील पुरूषहल्लीं विचूरकरास कोण आहेत ? व येथून विचूर किती दूर आहे ? वगैरे गोष्टी होऊन निजामसाहेब व त्यांची मंड ळी अपापल्या डेऱ्यांत गेली.

नंतर भोजनाचे वेळीं ब्राम्हण, व कायस्थ, आणि इतर हिंदू लोक यांचें मुद्बख स्वतंत्र असोन तेथें षड्रसअन्नाची तयारी होती. पंक्तीमात्र वेगळाल्या जाल्या. बरोबरचे अमीर उमराव खेरीज मोठ्या दरजाचे मुसलमान लोक, स्वारी बरोबरचे साहेब

लोक, आणि बंदोबस्तास आलेले पोलिस सूपरिंटेंडेंट वगैरे सर्वांचा खाना इंग्रेजी रितीचा तयार करविला होता. या सर्वांची पंक्ती एक झाली. निजामसाहेबांचा खाना मात्र साहेब लोकांच्या रितीस अनुसरून वेगळ्या जागीं झाला होता. व तेही वेगळ्या ठिकाणीं भोजनास बसले होते. यादेशाचे रीतीप्रमाणें उंची-पक्वान्नें ( निलेबी, मोतीचूर, केशरीभात वगैरे ) तयार करवून वेळेवर सर्व ठिकाणीं प्रविष्ट केले होते.

अशा प्रकारें रात्रीचे आठवाजतां सर्वांचीं भोजनें होऊन निजामसाहेब यांची स्वारी दरबारचे जागीं आली. नंतर पान, सुपारी,अत्तर, गुलाब,हार, गजरे, तुरे इत्यादि सर्वांस देऊन किंचित् वेळ कांहीं बोलाचाल चालू आहे तोंच गाडीची तयारी होऊन स्वारी प्लाटफार्मावर आली. नंतर दरबारबरखास्त झाला. तेव्हां प्लाट-फार्मापर्यंत निजामसाहेबांबरोबर विंचूरचे चीफ यांचे येणें होऊन स्वारी परत येतांना येथेंच मुक्काम व्हावा वगैरे बरींच बोलणीं झालीं. शेवटीं परस्परांत सलाम व हस्तस्पर्श होऊन निजामास गाडींत बसविलें. तेव्हां आह्मी फार संतोषी झालों, आम्ही फार अभारी अहोंत असे निजामसाहेब बोलले. नंतर अमीर उमराव इत्यादि सर्व मंडळीचे सलाम होऊन सर्व आपापले ठिकाणीं गाडींत जाऊन बसले. इतक्यांत गाडी चालती झाली.

या समाजांत हा चमत्कार पाहण्याकरितां इतिहास लिहिणारा हा निजाम सरकारची स्वारी मनमाडेस येऊन पुढें जाईपर्यंत विंचूरचे चीफ यांचे मागें हजर असोन त्यानें प्रत्यक्ष दृष्टीनें पाहिलेलें हें सर्व वृत्त लिहिलें आहे.

दुसरे दिवशीं रघुनाथराव यानीं समारंभ पाहण्यास आलेले चांदोरीकर जाहगिरदार वगैरे सभ्य लोकांस मेजवानी देऊन सर्वांस बिदा केलें.

तारिख २० दिजंबर रोजीं रघुनाथराव यांची स्वारी परिवार मंडळीसह बेटकोपरगांव येथें आली.

येथील बेटांत श्रीविष्णु व शुक्रेश्वर हीं दोन संस्थानें आहेत. पश्चिम वाहिनी गोदेच्या उत्तरतीरानजीक कचेश्वराचें संस्थान

आहे. कोपर गांवास गोवर्धनधारी या नावानें कृष्णाचें संस्थान आहे. या चारी संस्थानांस पेशवाई पासोन उत्सवासुद्धां सात हजार रुपयांचीं नेमणूक आहे. त्याची सर्व व्यवस्था ठेवण्याचा अधिकार रघुनाथराव याजकडे असोन अलीकडे बरेच दिवसांत त्यांचे येथे येणे झालें नाहीं. सबब ती व्यवस्था पाहावी व कांही दिवस या क्षेत्रवास करून भगवत् सेवा-करावी अशा उद्देशानें येथें राहिले.

या क्षेत्रास लक्षून स्कंद पुराणांतील गोदामाहात्म्यांत फार वैभव दर्शित केलें आहे. त्यांतील.

### श्लोक

दिशश्चाष्टौ प्रपश्यंति रम्या गोदोद्भवा स्तटाः ॥
तीर्थान्ययुत संख्यानि शुक्रतीर्थे वसांति हि ॥ १ ॥

### अर्थ

रमणीय अशागोदेच्या उदक प्रवाहाने झालेली तीरें ( तट ) हीं पूर्वादि अष्टदिशेप्रत पाहतात. तात्पर्य कोठे दक्षिणेस व कोठे पश्चिमेस अशास्थितीने पूर्वादि अष्ट दिशेसही गोदेचा प्रवाह दिसतो. असे निदर्शन आहे. त्यात बेटातील पश्चिम वाहिनी गोदेंत जे शुक्रेश्वराचे संनीध शुक्रतीर्थ आहे त्यामध्यें दाहा हजार तीर्थें आहेत.

कचभार्गवयोर्मध्ये यत्र गोदा विराजते ॥
मृतसंजीविनीतीर्थें लभते वांछितं फलं ॥२॥

### अर्थ

कचेश्वर आणि शुक्रेश्वर यांच्यामध्यें. सुशोभित गोदेचा प्रवाह आहे. त्यांत मृत संजीविनी नामक तीर्थाचे ठायीं जो-स्नान करणारा पुरुष तो इछित फल सिद्धीस पावतो.

### श्लोक

यत्र यत्र मुने गोदापदे पश्चिमवाहिनी ॥
तत्र तत्र जलं पीत्वा न मातुः पिबते पयः ॥ ३ ॥

## अर्थ

पुराणांत ग्रंथवक्त्यांनीं श्रवण करणाऱ्या ऋषींस असे सांगितले आहे कीं, हे ऋषे, ज्या ज्या ठिकाणीं पश्चिम वाहिनी गोदा आहे त्या त्या स्थानीं गोदा जलपान करून पवित्र झालेला पुरुष, मातेच्या स्तन संबंधी, दुग्धपान करीत नाहीं. तात्पर्य, पुनर्जन्म नाहीं अशा मुक्त स्थितीस पावतो.

या स्थली पश्चिम वाहिनी गोदेचें अतिशय माहात्म्य वर्णित आहे. परंतु अलीकडेस अजमासें १०० शंभर वर्षांपासोन पश्चिमवाहिनी गंगेचा ओघ कमी पडत जाऊन त्यांत भर पडत चालली. पूर्वीं बाजीराव साहेब पेशवे यांची या क्षेत्रावर फार प्रीती होती या कारणानें, ते प्रतिवर्षीं गाळ काढवून ओघ शुरू करित असत, परंतु त्यासमयीं व्हावा तसा अक्षय राहण्याचा यत्न न झाल्यामुळें हल्लीं तो ओघ अगदीं बंद होऊन त्यांत शेतें झालीं आहेत. परजन्यकालीं कांहीं पाणी वाहतें. अशी स्थिती झाल्यामुळें त्या प्रवाहांतील जीं तीर्थें आहेत त्या सर्वांचा लोप झाला. ही ईश्वरइच्छा म्हटली पाहिजे. असो.

या क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं प्रस्थानत्रयांपैकीं उपनिषद् भाष्यें श्रवण करण्याचीं राहिलीं होतीं तीं श्रवण करण्याचा आरंभ दिनकरशास्त्री बावा पासोन सुमुहूर्तावर करून प्रति दिवशीं श्रवण करूं लागले. याच प्रमाणें प्रति दिवशीं त्रिकाल श्री शुक्रेश्वराची पूजा वगैरे सत्कृत्य निष्ठेनें करून रघुनाथराव हे क्षेत्रवास करित झाले.

याच संधीस एक विशेष गोष्ट झाली ती वाचकांकरितां लिहिणें अवश्य वाटल्यावरून लिहितों.

सन १८८१ सालीं नृसिंहपूर मुकामीं रघुनाथराव यांचे पत्नीस देवाज्ञा होऊन त्यांचें अग्निहोत्र विच्छिन्न झालें. त्या वेळपासोन त्यांनीं शेषायुष्याचा व्यय केवल परलोक साधनांतच घालावयाचा असा निश्चय करून विंचूरसंस्थान संबंधी सर्व कारभार, व स्वतःच्या इस्टेटीची व्यवस्था वगैरे करण्याचें काम, आपले कनिष्ठ बंधु माधवराव यांजवर सोंपून क्षेत्रवास व भगवत्सेवा करण्याविषयीं जो त्यांचा सदृढ संकल्प होता त्यास प्राचीनकर्मसंबंधानें थोडे दिवस विघ्न आलें तें असें.

रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधु माधवराव दादासाहेब यांचे मनांत बहुत दिवसा पासोन महायात्रा करण्याचें होतें पण तसा योग अनेक कारणानीं आजपर्यंत बनून आला नाहीं. सालमजकुरीं पिकाची अबादी, व देशाची चांगल्या प्रकारें स्वस्थता ह्या गोष्टी लक्षून त्रिस्थली यात्राविधी संपादन कारण्याविषयीं त्यांची अतिशय उत्सुकता वाढली. तेव्हां त्यानीं मोठ्या त्वरेनें महायात्रेस जाण्याचा जो आपला दृढ निश्चय तो कोपरगांवीं रघुनाथराव यांस कळविला नंतर रघुनाथराव हे विंचूरास येऊन त्यांनीं तारिख ४ जानेवारि सन १८८४ इसवी रोजीं कनिष्ठ मातुश्रीसह माधवराव यांची महायात्रेस रवानगी केली. तेव्हां ते परत येईपर्यंत रघुनाथराव यांस संस्थानीं राहून सर्व कामकाज पाहणें अवश्यकर्तेंन प्राप्त झालें. या मुळें ते विंचूर इलाख्यांतील मनमाड गांवीं आगगाडीचें स्टेशन असोन हरवक्त तेथें तंटेबखेडे चालू असतात त्यांचे बंदोबस्ता करितां राहून भाष्यश्रवण वगैरे सत्कर्मांत कांहीं वेळ व कांहीं वेळ इलाख्यांतील गांवचे इन्साफी व बंदोबस्ताचे वगैरे कामांत घालू लागले.

पूर्वीं मनमाड येथें रघुनाथराव यांचा कांहीं वेळ मुक्काम होऊन निजाम हैदराबाद यांची सवारी कलकत्यास प्रदर्शन पाहण्याचे उद्देशें गेली त्यासमयीं परत जातानां येथेंच ( मनमाडयेथें ) खाना वगैरे होऊन जाणें व्हावें असें त्यांनीं त्यांस सुचविलें होतें. त्याचें स्मरण ठेऊन कूच व मुक्कामाचे लिष्ट तयार झालें त्यांत मनमाड येथें पूर्वी प्रमाणें खाना वगैरे होण्याचे दाखल केलें. आणि ती व्यवस्था करण्या करितां नरसिंहराव विंचूरकर यांस कलकत्याहून पुढे रवाना केलें.

यशवंतराव महाराज देवमामलेदार ज्यांचें औदार्य, शम, विचार, संतोष, परोपकार बुद्धि, भगवद्भक्ति, इत्यादि लोकोत्तर गुणानीं हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत निर्मल यशाचा ध्वज उभारिला. ही सत्किर्ती आबाल वृद्ध प्रजाजनांचे मुखांनीं प्रसिद्ध आहे. प्रत्यहीं देशोदेशींचे सहस्त्रावधीं लोक येऊन त्यांच्या चरणदर्शनानें कृतार्थ होत्सातां अपापल्या इष्ट सिद्धीस पावतात. हे एक

ग्रंथ हिंदुस्थानांतील अमोलिक रत्न आहे असें ह्मणणें निर्दोष होईल यांत संशय नाहीं.

होळकर महाराज यांनीं या सत्पुरुषास इंदुरास घेऊन जाण्याकरितां बहुकाल दीर्घयत्न व द्रव्यव्ययही पुष्कळ केला. तरी-तो योग बनला नाहीं. शेवटीं त्यांचें ( होळकराचें ) येणें दक्षिण देशीं झालें. तेव्हां मोठ्या सन्मानानें व नानातजविजीनें आपल्या राजधानीचे गावीं यशवंतराव महाराजांस नेऊन ठेविलें आहे.

या लोकमान्य पुरुषांचे दर्शना विषयीं निजाम सरकारचे दिवाणराजेनरेंद्रबाहादर यांची उत्कंठा वाढून त्यांनीं नरसिंहराव विंचूरकर यांस सांगितलें कीं तुह्मी परत जातांना इंदुरास जाऊन मोठ्या नम्रतेनें येण्याविषयींची विनंती करावी आणि त्यांस ( यशवंतराव माहराज यांस ) खांडवे स्टेशनावर घेऊन यावें. त्या प्रमाणें नरसिंहराव हे कलकत्त्याहून परत येतांना इंदुरास जाऊन प्रथमतः माहराजांचें दर्शन घेतलें. नंतर होळकर सरकारांस भेटून त्यांचे संमतीनें त्यांस खांडवे मुक्कामीं घेऊन आले. त्यांचे बरोबर एकंदर परिचारक वगैरे मंडळीं सुमारें २९ होती.

तारिख ८ माहे जानेवारी संन १८८४ रोजीं सकाळीं सात वाजतां नियमाप्रमाणें निजाम सरकारची स्पेशल खांडवे स्टेशनावर दाखल होतांच पेष्कार साहेब हे गाडी खालीं उतरून महाराजांचे चरणारविंदीं नम्र झाले. तेंव्हा त्यांनीं आपणास धन्य व कृतार्थ[1] असें मानिले. नंतर गाडी सुटण्याचा वेळ होतांच पेष्कारानीं महाराजास व नरसिंव्हराव यांस आपले गाडींत घेऊन स्पेशल चालती झाली या अवकाशांत महाराजांचा व पेष्कर साहेबांचा बहुतवेळ भाषणव्यवहार फार उत्तम प्रकारचा झाला.

रेलवे गाडीचे वरिष्ट अधिकारी साहेब लोकांनीं नांदगाव स्टेशनावर निजाम सरकारास मेजवानी देण्याची तयारी करविली होती. व तसें करण्यास त्यांनीं भुसावळीचे स्टेशनावर निजामसरकारची आज्ञा मिळविली तो मजकूर नरसिंहराव यांस समजल्यामुळें मनमाड मुक्कामीं खान्याची तयारी बंद ठे-

---

१ फारमोठे

वावी अशी तार करणें अवश्य झालें. व त्याप्रमाणें ह्यांनी तार ही दिली. पण तेथें लाइट (रोषनाई) व खान्याची वगैरे सर्व तयारी होऊन राहिली होती यामुळें तो खाना वगैरे सामान येथील स्टेशनमास्तर पोलीस इनस्पेक्टर जिल्हा नाशीक वगैरे सर्व साहेब लोकांकडे त्याचा उपयोग करावा. असा विंचूरचे चीफ यांनीं हुकूम दिला. व त्या प्रमाणें ती व्यवस्था झाली.

तारीख ८ ज्यानेवारी रोजीं दिवसा ९ वाजतां स्पेशल गाडी नांदगांव स्टेशनावर दाखल झाली. त्या संधीस पेष्कार साहेब हे गाडी खाली उतरून त्यांनीं यशवंतराव महाराजाबद्दल सर्व हकीकत निजाम साहेब यांस कळविली. तेव्हां खुद् नबाब साहेब हे पेषकाराच्या आगगाडीचे डब्या जवळ येऊन मोठ्या सन्मानानें त्या सत्पुरुषास भेटले. व त्यांसहवर्तमान थोडी बोलाचालही झाली. या प्रमाणेंच सवारी बरोबरचे अमीर उमराव आणि कामगार मानकरी वगैरे सर्व लोक मोठ्या नम्रतेनें महाराज यांस भेटले. नंतर महाराज यांजकडून खुद्द निजाम साहेब पेष्कार आणि अमीर उमराव या मंडळीस प्रसादरूप वस्त्रें यथायोग्य सत्काराची मिळाली. निजाम सरकाराकडूनही पेष्कार साहेबांच्या हस्तें महाराजांचा सन्मान झाला. अशा प्रकारें परस्परांच्या भेटी व सन्मान वगैरे झाले. इतक्यांत खाना वगैरे होऊन गाडीची तयारी झाली तों ९ वाजून गेले.

तारिख मजकूर रोजीं रात्रीं दहावाजून पंधरा मिनीटांनीं स्पेशल मनमाड स्टेशनावर दाखल झाली. तेव्हां विंचूरचे चीफ यांची व निजाम सरकार आणि पेष्कार व अमीर उमराव वगैरे लोकांच्या परस्पर भेटी गाडींतूनच होऊन साधारण बोलाचाल झाली. येथेंच यशवंतराव महाराज व नरसिंहराव हे पेष्कारांच्या गाडींतून उतरून रघुनाथराव यांस भेटले. अशा प्रकारें परस्पर भेटी होतात तो ११ वाजले. नंतर स्पेशलगाडी नगरलैनीनें चालती झाली. पुढें विंचूरचे चीफ हे यशवंतराव महाराज आणि त्यांचे बरोबरील सर्व मंडळी यांस बरोबर घेऊन गांवांत आले. तो दिवस व ती वेळ लहान थोर प्रजा जनांनीं मोठी आनंदाची मानिली.

पुढें नरसिंहराव हे एक दोन दिवसांतच रघुनाथराव यांची आज्ञा घेऊन जिल्हा नागर कर्नूल इलाखा हैद्राबाद येथें अव्वल तालुकदारीचे कामाचा चार्ज घेण्याकरितां चालते झाले.

रघुनाथराव यांचे कनिष्ठ बंधु माधवराव हे त्रिस्थली यात्रोद्देशें रवाना झाल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्यांचे मार्गक्रमणांत जे पूर्व कालीं सार्वभौम पदारूढ असून ( काकति वीररुद्र ) या नामानें लोक प्रसिद्ध अलंकार ग्रंथाचे कर्ते झाले, त्यांचे वंशस्थ रामराय नांवाचे राजे राजमहेंद्र जिल्ह्यांत ( पीठपूर क्षेत्र ) पिठापूर या नामाचे प्रसिद्ध क्षेत्रांत राहणारे होत. त्याच प्रदेशांत १२ लक्ष रुपयांचे ते संस्थानिक असून त्यांचे सांगण्यांत पिठापुरा विषयीं असें आलें कीं, पिठापूर ( पादगया ) या प्रमाणेंच एक नाभिगया स्थान आहे. शिरोगया स्थान तर प्रत्यक्ष गयापुरच ह्मणवितें. असो, त्या राजाचा आणि माधवराव यांचा विशेष परिचय जडला. तेव्हां आपले जेष्ठ बंधु जे विंचूर संस्थानचे चीफ त्यांची मुलाकात व्हावी असें राजे साहेबांचें मानस लक्षून माधवराव यांनीं गोष्ट कबूल केली.

पुढें तारीख ३० जानेवारी सन १८८४ रोजीं माधवराव हे मातुश्रीसह त्रिस्थली यात्रा करून मनमाडास आले. दुसरे दिवशीं पिठापुरचे राजेसाहेब ही तेथेंच रेलवेंतून दाखल झाल्या वेळीं स्टेशनावर योग्य समारंभानें ( विंचुरचे चीफांची ) व राजेसाहेबांची मुलाकात होऊन तो दिवस तेथेंच मुक्काम होण्याचा ठरला. रसदबरदाषेचा बंदोबस्त चीफ यांजकडून उत्तम राहिला.

तारीख १ फेब्रुवारी सन १८८४ इसवी रोजीं मनमाडेहून निघून रेलमार्गें संस्थान विंचूर येथें राजेसाहेबांसह जाण्याचा निश्चय ठरल्या प्रमाणें दिवसा एक वाजण्याचे गाडींतून लासलगांवचे स्टेशनावर स्वाऱ्या उतरल्या. तेव्हां घोडे, गाड्या, बग्या, स्वार, शिबंदीचे लोक वगैरे स्टेशनावर हजीर असून उभयतां राजांच्या सवाऱ्या समारंभानें संस्थान विंचुरास दाखल झाल्या. स्वतः राजेसाहेब व त्यांचा खटला उतरण्यास गांवचे पश्चिमेस मोठा बगीचा असून तेथें बंगला वगैरे जागा हवा पाण्यास फार सोयकर

आणि अदबीची असल्यामुळें तेथं राजेसाहेब उतरले. त्या ठिका-णीं सर्व प्रकारची तयारी पूर्वींच होऊन राहिली होती.

राजेसाहेब हे रामानुज संप्रदायाचे असल्या कारणानें आपल्या लोकांशीं त्यांचा पंक्तिव्यवहार नाहीं. यामुळें मेजवानीचा थाट बंगल्यांतच उत्तम झाला. नंतर दिवसा चार वाजतां गांव, वाडा, नहर, हौद वगैरे पाहण्यास स्वारी गांवांत येऊन चोहींकडे फिरणें झालें. वाड्यांत कचेरीच्या जागा वगैरे पाहणें झालें. मध्य चौकांत जाफतीची तयारी असून पुढें कसरतवाले लोकांचा उत्तम तमाशा सुरूं होता. त्या प्रसंगीं गांवांतील व पदरचे संभावित लोकांचा मोठा समाज चित्रा प्रमाणें बसला होता.

कांहीं वेळ तमाशा होऊन पुढें राजेसाहेबांस सन्माना प्रमाणें पोषाखाचीं वस्त्रें व बरोबरील मंडळीस ही देणग्या वगैरे देऊन गुलाब, अत्तर, पानसुपारी, हार, गजरे, तुरे, सर्वांस देण्यांत आले.

राजेसाहेब हे रघुनाथराव यांस बांधीव सफेत पागोट्यावर मोत्याचे पदरांत गुंतविलेला हिरे, पांच, मोती, व इतर कांहीं रत्नांनीं जडलेला असा उत्तम शिरपेंच सुमारें दोन हजार रुपये किमतीचा होईल तो उलट सत्काराबद्दल देऊं लागले. तो सत्कार स्वीकारण्याचे रघुनाथराव यांनीं नाकबूल केलें. त्या प्रसंगीं राजेसाहेबांनीं अत्यंत आग्रह करून शिरपेंचासह तें पागोटें रघुनाथराव यांचे हातीं दिलें. तेव्हां मुरवतीस्तव स्वीकारून त्यांनीं ( रघुनाथराव यांनीं ) माधवराव यांचे जेष्ठ चिरंजीव गणपतराव यांस आपले निकट बोलावून त्याचे मस्तकावर शिरपेंचासह तें पागोटें घातलें. अशा प्रकारें मानसन्मान परस्परांत होऊन दरबार खुला झाला. तेव्हांच परस्परांत निरोपानिरोपी होऊन वाड्या बाहेर राजेसाहेबांस पोहोंचविण्यास्तव चीफ यांचे येणें झालें. तेथें किंचित् वेळ प्रेमाचीं भाषणें होऊन शेवटचा निरोप झाला. तेव्हां लागलीच घोड्यांचे गाडींत राजेसाहेबास बसवून लवाजम्यानिशीं लासलगांव स्टेशनावर पावते केले. नंतर त्याच रात्रीचे गाडींतून राजेसाहेब हे मुंबईस चालते झाले.

तारीख ६ फेब्रुवारी सन १८८४ इसवी रोजीं काशीयात्रेचे मावंदें करण्याचें माधवराव यांनीं ठरविल्यामुळें विंचुरास दोन दिवस रघुनाथराव यांचा मुक्काम होऊन मावंद्याचा समारंभ माघ शुद्ध १० बुधवार रोजीं फार उत्तम झाला. या दिवशीं सोवळ्यांचे कद व धोतरजोडे, शेले पागोटीं, गंगाजळ्या, वगैरे देणग्या लोकांस बऱ्याच झाल्या. तो प्रसंग झाल्यावर तेच दिवशीं तीन वाजण्याचे गाडींतून रघुनाथराव हे कचभार्गवक्षेत्रीं [ कोपरगांवीं ] जाण्याकरितां मनमाडेस चालते झाले.

पूर्वीं व हल्लीं मिळून बरेच दिवस मनमाडास राहणें झालें, त्या दिवसांत विंचूर इलाख्याचें इन्साफी काम पाहून फुरसतवक्तीं आसपासचा सर्व प्रदेश त्यांनीं [ रघुनाथराव यांनीं ] पाहिला. त्यांत मनमाडापासून दीड कोसाचे अंतरावर नागापूर ह्मणून एक अगदीं खेडें आहे. त्या खेड्यापासून थोडे अंतरावर लहान ओढा वाहत असून त्यास [ ओढ्यास ] घाटासारखा तट प्राचीन काळचा बांधीव आहे. त्याचे संनिध जुन्या काळचे एक लहान मंदिर आहे. त्यांत नागेश्वर म्हणून प्रसिद्ध शिवालिंग असून त्या शिवमंदिरांत सार्वकाल कंबरे बरोबर पाणी असतें. त्या पाण्यांतच दगडी शाळुंखा व तिजवर शिवलिंग आहे तें चैर[1] असून पक्कें केलेलें नाहीं. या देवाविषयीं तेथील लोक असें सांगतात कीं, मनांत कामना धरून त्या मंदिरांतील पाण्यांत जावें आणि दोन हातांनीं तें शिवलिंग उचलण्याचा यत्न करावा. जर त्याची मनेप्सित कामना पूर्ण होण्याचा योग असेल तर ते शिवलिंग उचलून सहज हातांत घेतां येतें. अन्यथा[2] बहुत यत्न केला असतांही तें शिवलिंग पाण्यांतून उचललें जात नाहीं. याप्रमाणें त्या स्थलीं कितीएक भाविक लोक जाऊन आपल्या इष्ट कामनेची फलसिद्धी याचा वर लिहिल्याप्रमाणें निर्णय करून घेतात.

पौष वद्यांत सोमवती आमावास्या पर्व प्राप्त झालें. तेव्हां मनमाडापासून तीन कोसावर अणकई या नांवाचा एक किल्ला आ-

१ पाहिजे तेव्हां काढण्यासारखे. २ कामना पूर्ण होणें नाहीं तर.

हे. त्या पहाडी किल्ल्यावर अगस्ति ऋषीचा आश्रम असून तेथें अगस्ति तीर्थ आहे. त्याचे स्नानास रघुनाथराव गेले होते.

संक्राती, व्यतिपात, एकादशी, अशीं पर्वें लक्षून मनमाड गांवापासून पश्चिमेस गांवचे संनीध दोन नद्यांचा संगम झाला आहे. त्या स्थलीं स्नानास जात असत.

याप्रमाणें रघुनाथराव यांचा मनमाडास एकंदर ४० दिवस मुक्काम झाला. त्या मुक्कामांत झालेलें वृत्त संक्षिप्त रीतीनें लिहिलें. आतां पुढील वृत्त लिहूं.

कोपरगांवासंनीध बेटांत शुक्रेश्वराचें मंदिर आहे. त्याचे चौफेर श्रीमंत कैलासवासी महाराज बाजीराव साहेब पेशवे यांनीं दुजोडी असोन मजबूत अशा उत्कृष्ट धर्मशाळा बांधिल्या आहेत. संस्थानांतलि कामदार मंडळींनीं त्या चौसोपींत रघुनाथराव यांस राहण्याला योग्य अशा अदबीच्या जागा ठिकठिकाणीं पडदे वगैरे लावून पूर्वींच तयार करविल्या होत्या.

तारीख ११ फेब्रुवारी सन १८८४ इसवी रोजीं रघुनाथराव हे मनमाडेहून निघून आगगाडीमार्गें दिवसा चार वाजतां कोपरगांवानजिक बेट येथें शुक्रेश्वर देवाचे संनीध धर्मशाळेंत येऊन पोंहचले.

त्या क्षेत्रीं गोदास्नान त्रिकाल शुक्रेश्वराचें अर्चन, उपनिषत्भाष्य श्रवण, तृतीय प्रहरीं पुराण श्रवण पुनः कचेश्वरादि देवता दर्शन, पर्वकाल लक्षून दान धर्म, आणि ब्राह्मण भोजन इत्यादि पुण्यकर्मांत त्यांचा ( रघुनाथराव यांचा ) कालक्षेप होऊं लागला.

बाजीराव साहेब पेशवे यांनीं पश्चिम वाहिनी गोदेच्या तीरीं विष्णु मंदीर बांधून त्यांत चतुर्भुज विष्णूची उभी मूर्ति संगमरवरी पाषाणाची स्थापन केली. त्या मूर्तीचे उजवे बाजूस श्री माहालक्ष्मी आणि डावे बाजूस राधिका देवी आहे. ह्या मूर्ति संगमरवरी पाषाणाच्याच आहेत. या विष्णु मंदीरावर पांच कलश ( कळस ) पेशव्यांनीं स्थापन केले. ते एक मध्यभागीं व चार बाजूस चार असे पांच कलश पूर्वींचे असून दीर्घ कालातिक्रमानें त्यावरील सोन्याचा मुलामा उडून ते निस्तेज दिसूं लागले हें

रघुनाथराव यांनीं लक्षून पांचही कळसावर मुलामा करविला. व माघ वद्य ११ शुक्रवार शके १८०५ ( तारीख २२ फेब्रुवारी सन १८८४ इसवी ) रोजीं विधिपूर्वक श्री वासुदेवाची महापूजा करून नवीन तयार केलल्या कलशांची स्थापना करविली. आणि द्वादशीस ब्राह्मणभोजन करून त्या कृत्याची समाप्ती केली.

श्री गोदातीरीं बेट, कोपरगांव, कोकमठाण मिळून चार संस्थानें आहेत. पैकीं बेटांतील शुक्रेश्वर महादेवाचें संस्थानांत प्रति वर्षी दोन उत्साव होतात. एक माघ वद्यपक्षीं शिवरात्रीस, शुक्रेश्वराचा दुसरा कार्तिक शुद्ध १५ पौर्णिमेस गोदावरीचा,या प्रत्येक उत्सवास सरकारांतून ५००रुपये नेमणूक आहे.शिवरात्री संबंधी उत्सवास वद्य १४ स आरंभ होतो तेव्हां मध्यरात्रीं देवास लघुरुद्राभिषेक होऊन देवाची महापूजा होते. प्रत्यही देवापुढें रात्रीं कथा,सकाळीं ९वाजतां गवई लोकांच्या गाण्याची चक्री,दुपारीं ब्राह्मण भोजन, असा क्रम आहे. महा शिवरात्रीस बेटांत पुष्कळ आसपासची यात्रा गंगास्नान करून देवाचें दर्शनास जमते ते दिवशीं तिसरे प्रहरीं पालखींत भोगमूर्ति बसवून गंगास्नानास देवाची स्वारी निघते. तेव्हां नानाप्रकारचीं वाद्यें वाजतात. पालखी मागें यात्रेकरू लोकअसोन मोठ्या समारंभानें स्वारी गंगेसंन्निध आल्यावर नेमलेला ब्राह्मण भोगमूर्तीची षोडशोपचारें पूजाकरितो त्यासमयीं गवई लोकांचें गाणें, अनेक वाद्यांचे गजर, होत असोन गंगेच्या उभय तीरावर यात्रस्थ लोकांची गर्दी, मध्यभागीं गंगेचा ओघ हा सर्व देखावा पाहून मनास मोठा आनंद वाटतो.आर्ती झाल्यावर देवास पालखींत बसवून समारंभानें देवळांत आणितात.

प्रतीपदेस पक्वान्नाचें ब्राह्मन भोजन होतें. यासालीं एकंदर एक हजारावर पात्र झाल असावे. तेच दिवशीं उत्तररात्रीं तीर्थ प्रसाद झाल्यावर आलेल्या विद्वान ब्राह्मणांची संभावना होऊन उत्सावाची समाप्ति होते.

यावर्षी उत्सवाची टापटीप व ब्राह्मण भोजनाचा बंदोबस्त उत्तम प्रकारें राहिला असें संस्थानांतील व यात्रस्थ लोक ही बोलत होते.

कोपरगांवापासून तीन कोसांचे अंतरावर गोदातीरीं श्री नृसिंह-स्थान आहे. ते अगदीं गंगातीरीं असोन देवाचे मंदीरा लगत लहान ९।४ खणांची लांकडी धर्मशाळा आहे. त्या मंदिरांत योग नृसिंहाची मुर्ती फार प्राचीन कालची आहे. मंदिरा जवळ लाहान खेडें आसोन त्यास कान्हेगांव असें ह्मणतात. त्या नृसिंहाचें दर्शनास रघुनाथराव हे गेले होते.

याच प्रमाणें कोपरगांवापासून सुमारें दीडकोसाचे अंतरावर श्रीमंत दादासाहेब पेशवे ज्यांस राघोबा दादा ह्मणत असत व ज्या पुरुषाची सविस्तर माहिती मराठ्यांचे इतिहासांत आहे त्यांचा गोदातीरीं "हिंगणी" नावांचे गांवासनीध अंतकाल होऊन त्यांचें दहन ज्या स्थलीं केलें तेथें मोठा चिरेबंदी पक्का कोट बांधीव असोन आंत लहान चौमौळी मंदिरांत शिवलिंग स्थापन केलें आहे. त्याचे दर्शनास रघुनाथराव हे गेले होते. या स्थला विषयीं माहितगारा पासून शोध लागला तो खालीं लिहीत आहों.

या ठिकाणीं अगदीं गंगेचे प्रवाहांत मोठा कोटा चिरे बंदी तीन बाजुनें बांधिव आहे. त्या तीन भिंतीस तिनलाख रुपये खर्च लागला असें सांगतात. पूर्वेचे बाजुनें मोठा तट आहे. हें काम श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांनीं इंग्रेजाशीं लढाई सुरु होण्या पूर्वी बांधिलें. परंतु हेतु प्रमाणें त्यास्थलीं (आपले वडिलांचे दहनस्थानीं) मोठें भव्य मंदिर करून रघुनाथेश्वर नामानें शिवलिंगस्थापन करण्याची त्यांस (बाजीरावांस) इच्छाहोती ती शेवटास गेली नाहीं, बाजीरावसाहेब कैलासवासी जाल्यावर दादासाहेबांचे नातु बाजीराव साहेबांचे दत्तपुत्र ज्यांसनानासाहेब असें ह्मणतात त्यानीं सन१८५७ इसवी सालीं जेंमोठें भयंकर बंड उद्भवलें त्यांत मिश्र होऊन त्याणीं त्या बंडाचा प्रसार दक्षिण व उत्तर हिंदुस्थानांत मोठ्या तेजानें केला त्या शूर पुरुषाची माहिती बहूतेक हिंदुस्थानांतील लोकांस आहेच. त्यांनीं (नानासाहेब यांनीं) अपले अजाचे दहन स्थानीं बाजीरावसाहेबाचे अमलांत जी इमारत बनलीगेली त्यास्थलीं त्यांचे (बाजीरावांचे) मरणोत्तर ब्रह्मवर्ताहून कारकुनास पाठविलें आणि

त्यांचे मार्फत लहान लांकडी चौमोली मंदीर करवून आंत आपल्या अजाचें नांवे शिवालिंग स्थापन करविलें. पूजा नैवेद्याची जुजबी नेमणुक ही त्यादेवास करून दिली होती. परंतु थोडे दिवसांतच ती नेमणुक बंद पडली. अशी माहिती रघुनाथराव यांनीं तेथें ऐकिली.

रघुनाथराव यांचा मुक्काम शुक्रेश्वराचे संनीध असतां एक विशेष गोष्ट घडली ती अशी— देवासकर पवारांचीं दोनघराणी मोठी पाती व धाकटी पाती अशा संज्ञेने प्रसिद्ध आहेत. पैकीं धाकटे पातीचे संस्थानीकांस अक्कलकोट येथील राजेसाहेब हल्लीं जे संस्थानावर मालिक आहेत यांची भागिनी दिली होती. ती गत झाल्यामुळें दक्षिण प्रांती कोपरगांव व जेऊर यागांवीं पवारांचे पाटिलकीचें वतन आहे. त्या वतनाचे जेऊरगांवीं लग्न करण्यास्तव पवार साहेबांची स्वारी जुजबी खटल्यानिशीं येऊन माघ वद्य पक्षीं लग्नसमारंभ झाल्यावर रघुनाथराव यांचे मुलाकातीस आले. तेव्हां शुक्रेश्वराचे संनीध धर्मशाळेंतच उभय सरदारांच्या भेटी मोठ्या प्रेमसंबंधानें झाल्या. या भेटींत परस्परें अगत्य वादाची व प्राचीन घरोब्याची बहुत भाषणें होऊन पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे रीतीप्रमाणें देण्यांत आले. अशा प्रकारें रघुनाथराव यांनीं सर्व मंडळीसह पवार साहेबांचा उत्तम सत्कार केला. व परस्परें निरोप होऊन स्वारी चालती झाली.

वर लिहिल्याप्रकारें धर्मकृत्यांत व लोकव्यवहारकृत्यांत रघुनाथराव यांचा उत्तम कालक्षेप मोठ्या आनंदानें गोदातिरीं चालू असतां एकाएकीं मनास क्षोभ करणारी अशी एक भयंकर वार्ता तारीख ६ मार्च सन १८८४ इसवी रोजीं ऐकिली. त्यामुळें ते ताबडतोब आगगाडीमार्गें त्र्यंबकक्षेत्रीं गेले.

वर लिहिलेल्या मजकुराबद्दल थोडा खुलासा येथें लिहिला असतां अप्रासंगिक होणार नाहीं असे समजून तो खालीं लिहित आहे.

कलकत्त्यास झालेलें प्रदर्शन पाहून निजाम साहेबांची स्वारी परत येतांना खांडवे स्टेशनापासून देवमान्य यशवंतराव महाराज

हे नरेंद्र बहादुर पेष्कार यांजबरोबर मनमाडपर्यंत आल्याचा मजकूर आह्मी वर लिहिलाच आहे. पुढें निजाम साहेबांची स्वारी हैद्राबादेस रवाना झाल्यावर महाराज ( यशवतराव महादेव ) हे कांहीं जरूरीचे कारणास्तव पुण्यास गेले होते. ते परत कल्याणमार्गें येतांना संस्थान त्र्यंबक येथील कारभारी नारायणराव तात्या जोगळेकर हे नुकतेच काशी यात्रा करून परत आले होते. त्यांनीं मांवद्याचे समारंभास क्षेत्र त्र्यंबक येथें महाराजांस मोठ्या आग्रहानें नेलें. त्या क्षेत्रीं जे दिवशीं महाराजांचे जाणें झालें ते दिवशीं महाराचांचे सत्कारार्थ गांवांतील आबालवृद्ध प्रजा जनांनीं सामोरे येऊन मोठ्या थाटामाटानें जोगळेकर नारायणराव यांचे येथें पोहोंचविलें. पुढें जोगळेकर यांचें मांवदें झाल्यावर महाराजांनीं तीर्थविधि व ब्राह्मणभोजन वगैरे धर्मकृत्य अत्युत्तम केलें. महा शिवरात्री पर्व क्षेत्रीं झाल्यावर तेथून निघण्याची सिद्धता झाली. तेच दिवशीं मध्यान्ह पूजोत्तर महाराज हे देवास प्रदक्षिणा घालीत असतां माडीचे खिडकींतून झोक जाऊन खालीं तीन पुरुष चौकाचे फर्शीवर पडले. यामुळें त्यांस फार दुखापत झाली. भगवत्कृपेनें तो प्रसंग वाईट प्रकारचा न होता खैर झाली हें वृत्त रघुनाथराव यांस कळतांच त्र्यंबकास जाऊन त्यांनीं महाराजांची प्रकृती पाहून औषधोपचाराची वैद्याकडून उत्तम तजवीज सुरू केली. आरोग्यार्थ उदकशांति, मृत्युंजयजप, त्र्यंबकेश्वरास रुद्राभिषेक, भागवत पारायण वगैरे धर्मकृत्याचा आरंभ करवून महाराजांचे हातानीं दान प्रसंगही करविला. या अवकाशांत त्यांचे कुटुंब बंधु इत्यादि मंडळीही इंदुराहून आली. महाराज होळकर सरकार यांनींही समाचारार्थ कारकून वगैरे पाठविले. भगवत्कृपेनें दिवसेंदिवस महाराजांस आराम वाटूं लागला. यामुळें सर्व मंडळींच्या अंतःकरणाची स्वस्थता झाली.

त्र्यंबकेश्वराचे त्रिकाल पूजेचे अंतीं तोफेचा बार करण्याची वहिवाट बहुत दिवसापासून चालत होती. ती दरम्यान हत्यार बाळगण्याविषयीं नवीन कायद्याचा इंडिया कौन्सिलांत पसार झाल्या दिवसापासून बार करण्याची वहिवाट संस्थानचे कारभारी

यांनीं बंद केली होती. त्याविषयीं हिंदुस्थानचे गवर्नर जनरल यांस रघुनाथराव यांनीं मुंबई सरकारचे मार्फत कळविल्यावरून तोफ वाळगून बार करण्याचा परवाना विंचूरकर यांचे नांवे कलकत्याहून नुकताच आला होता. त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं महाराजांचे प्रकृतीची स्वस्थता लक्षून बंद झालेल्या तोफेचा बार करण्याची वहिवाट सुरू करविली. या कारणानें क्षेत्रस्थ लोकांस बहुत संतोष वाटला.

महाराजांची प्रकृती किंचित् क्रमास लागल्याची पाहून कोंपरगावीं परत जाण्याचा निरोप रघुनाथराव यांनी घेतला. नंतर श्री त्र्यंबकेश्वरास लघुरुद्र इतर देवतेस रुद्राभिषेक व फाल्गुन शुद्ध १४ सोमवारीं प्रदोषकालीं महा पूजा करून ब्राह्मण भोजन करविले. नंतर दुसरे दिवशीं सायंकालीं हुताशनीची पूजा झाल्यावर नाशिकक्षेत्रीं जाण्यास्तव रघुनाथराव चालते झाले.

पूर्वकालीं नाशिकक्षेत्रीं अजगर बावा नांवाचे मोठे सिद्ध पुरूष होऊन गेले. या पुरुषाची माहिती विंचूर संस्थानचे इंग्लिश क्लार्क हरिपंत गाडगीळ यांनीं विंचुरकर यांचे घराण्याचा इतिहास लिहिला त्यांतील ११५ वे पृष्ट.वर त्याजबद्दल सविस्तर खुलासा लिहिला आहे. या सिद्ध पुरुषाची समाधी रघुनाथराव यांचे पूर्वजांनीं बांधिली तिचें काम जीर्ण दशेस आल्याचें पाहून त्यांनीं मोठ्या भव्य इमारतींचा जीर्णोद्धार करण्याची सुरुवात करविली. नंतर गोदातीरीं सायखेडें या नांवाचे गांवीं आले.

हें गांव विंचुरकर यास इनाम असोन त्यांचे पूर्वजांनीं येथें नरहरीचे मंदिर बांधिलें आहे. त्या ही मंदिराचें काम जीर्ण होऊन बहुत खराब झालें होतें यास्तव त्याचा जीर्णोद्धार करण्याची सुरुवात करविली. रघुनाथराव यांची सापत्न मातुश्री लक्ष्मीबाई साहेब या पुण्यश्लोक बाईचा अंतकाल गोदातीरीं सायखेडे गांवासंनीध चांदोरी गांवीं झाला. ज्या स्थलीं मातुश्रींचें दहन झालें तेथें मंदिर करवून त्यांत लक्ष्मीबाई यांचे नामें शिवलिंग स्थापावें या हेतूनें त्या ठिकाणीं मंदिर बांधण्याची सुरवात करविली.

अशा प्रकारें स्तुत्य कृत्यें करून रघुनाथराव हे परत कोपरगांवीं आले. तेथें रंगपंचमीचा सण उत्तम प्रकारें झाल्यावर रघुनाथराव यांनीं बेट व कोपरगांव येथील गृहस्थ मंडळी आणि संस्थानांतील सर्व नौकर लोक यांस उत्तम भोजन देऊन चैत्र शुद्ध १ रोजीं शुक्रेश्वर देवाची महापूजा केली व उत्तम प्रकारें ब्राह्मण भोजन करविलें.

या वर्षारंभ प्रतिपदेचे दिवशीं एक लिहिण्या सारखी गोष्ट झाली ती लिहून इतिहास पूर्ण करूं.

श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य मठ शृंगेरी यांनी रघुनाथराव यांची सुजनता, औदार्य, स्वधर्म दक्षता इत्यादि उत्कृष्ट गुणांतें लक्षून सन्मानार्थ मित्ती फाल्गुन शुद्ध १३ रविवार शके १८०५ रोजीं मानपत्रांसहित एक करदीपिका[१] रवाना केली. ती चैत्र शुद्ध १ रोजीं येऊन पोंहचली.

मठांत असलेल्या अधिकारी स्वामी पुढेंच ही करदीपिका असावी किंवा ते(स्वामी)कृपा करून ज्यांस हा मान देतील त्यांनी वापरावी असा त्या मठांतील नियम आहे. तो योग्य सन्मान जगद्गुरू आचार्य यांजकडून प्राप्त झाल्यामुळें रघुनाथराव यांस मोठा संतोष वाटून त्यांनीं तो प्रसाद सद्भावानें स्वीकारिल्या बद्दल उपकार सूचक अशा महत्वाचें पत्र स्वामीकडे रवाना केलें.

सन १८८० इसवी सालचे फेब्रुवारी महिन्यांत शके १८०२ माघ शुद्ध १३ स रघुनाथराव यांनीं अग्निहोत्र ग्रहण केल्या दिवसांपासून आजपर्यंत ह्मणजे सन १८८४ इसवी सालचे मार्च आखेर शके १८०६ तारणनामसंवत्सराच्या चैत्र शुद्ध १ पदेपर्यंत त्यांनी केलेल्या तीर्थ यात्रेचे व धर्मकृत्याचे वगैरे यथामती वर्णन इतिहास रूपानें लिहिलें आहे. या पुढें आपल्या तर्फे रघुनाथराव अण्णासाहेब यांचे विषयीं किंचित् लिहून या ग्रंथाची पूर्णता करीत आहोंत.

विंचूर इलाख्यांतील सर्व जातीच्या प्रजा व पिढीजाद पदरचे असे विद्वान भिक्षुक गृहस्थ आणि कालपरत्वें सेवा धर्मास अनुसरलेली अशी षागीर्द पेषांतील वगैरे मंडळी या सर्वांचे यथायोग्य

---

१ सन्मानाची मशाल.

लालन, पालन, पोषण, प्रीणन इत्यादि गोष्टी मोठ्या प्रेमानें व निष्कपट पणानें समयोचित अण्णासाहेब यांनीं आजपर्यंत केल्या व पुढें ही करतील. या प्रमाणेंच भावी वंशधुरवाहणारें कुलरत्न असें त्यांचें ( रघुनाथरावांचे ) वंशोद्भव दयाळू पुरुष आमच्या वंशजांचे पिढीजाद रक्षण करोत अशा विषयीं स्त्री पुरुष भेदानें आबाल वृद्ध सर्व प्रजाजन सरळ मनानें परमेश्वराची अहर्निश प्रार्थना करितात त्या पुरूषाचे औदार्य, धर्म तत्परता परोपकार बुद्धि इत्यादि लोकोत्तर गुण असल्यामुळें सर्वोत्तम देवानें निरंतर त्यांचें कल्याण करून इष्ट मनोरथ पूर्ण करावेत. अशी ग्रंथकर्त्याची ईश्वरास विनयपूर्वक प्रार्थना आहे.

याग्रंथाचे मुख्य नायक रघुरानाथराव अण्णासाहेब विंचूरकर आहेत. यास्तव श्लोकबद्ध कवितेनें त्यांस आशिर्वाद देऊन याग्रंथाची पूर्णता केली आहे.

॥ आशीर्वादात्मकश्लोक ॥

पृथ्वींछंद.

॥ प्रजेस निजतोकसें[1] सतत रक्षिती प्रीतिनें ॥
॥ धन त्यजुनि सत्पथीं भरिति विश्वसत्कीर्तिनें ॥
॥ क्षमाधृति दया इहीं करूनि युक्त जे सर्वदा ॥
॥ चिरायु रघुनाथ भूपति असोत ते कामदा[2] ॥ १ ॥
॥ सुधेनु गज अश्वया नृपति मंदिरीं साजवी ॥
॥ अखंडधनदे प्रभो धनपतीस जे लाजवी ॥
॥ सुपंडित सुसंगती सुमति दास दासी रसा[3] ॥
॥ सुनीति सुगुणज्ञता तनय दे कुलोद्धार सा[4] ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

दाता भलातूंच कृपा कराया ॥ ही देणगी दे रघुनाथराया
त्वत्प्रेम भावांकित शंकराया ॥ आशा न अन्याजगदेकराया

---

१ स्वपुत्रवत. २ मनोरथ पूर्ण करणारा. ३ पृथ्वी. ४ वंशकीर्तीवाढविणारा.

समाप्त.